श्रीविठ्ठल आणि पंढरपूर

(दुसरी आवृत्ति)

लेखक व प्रकाशक

श्री. गणेश हरि खरे

क्यूरेटर : भा. इ. सं. मंडळ, पुणें.

श. १८७५] **मूल्य १ रुपया** [इ. १९५३

अनुक्रम

निवेदन

या पुस्तकाची पहिली आवृत्ति श. १८६० मध्यें प्रकाशित झाली. तदनंतर गेल्या पंधरा वर्षांत पंढरपूर व विठ्ठल यासंबंधीं मी आणखी माहिती जमवीत राहिलों. पण त्यांत म्हणावें तसें यश आलें नाहीं. सुमारें १६ पृष्ठें म्हणजे मूळ संशोधनात्मक मजकुराच्या एक तृतीयांशाहून थोडी अधिक माहिती मिळाली ती या आवृत्तींत समाविष्ट केली आहे. अजून तेन्नालि रामकृष्णकृत 'पांडुरंगमहात्म्यमु' पुरंदरदासादींचीं कीर्तनें, पदें इत्यादि तेलगुकानडी साधनें पहावयाचीं राहिलीं आहेत. त्यांत अधिक माहिती मिळण्याचा संभव आहे. तथापि कांहीं कालापूर्वीं स्थापन झालेल्या पंढरपूर-संशोधन-मंडळाच्या प्रयत्नांकडे मी मोठ्या आशेनें पहात आहे. विठ्ठलाविषयीं महत्त्वाची व प्रमाणभूत अशी माहिती प्रायः त्या मंडळाच्या प्रयत्नानेंच प्रकाशांत येण्याचा संभव आहे. या वेळींही मंडळांत मिळालेल्या साधनांचा मी उपयोग करून घेतला आहे. मंडळाच्या प्रयत्नास मी यश चिंतितों व केलेल्या साहाय्याबद्दल त्याचे आभार मानतों. हें पुस्तक छापून होत असतां पंढरपूरचे कमाविसदार लिमये यांच्या घराण्याचा पत्ता लागला. त्यांजकडे विचारणा करतां त्यांनीं आपलेकडील पंढरपूरसंबंधीं सर्व कागदपत्र पाठवून दिले. ते तपासण्याचें काम चालू आहे. त्यांचें फलित या आवृत्तींत घालतां आलें नाहीं. तिसऱ्या आवृत्तींत अवश्यमेव घालीन.

या पुस्तकाची पहिली आवृत्ति मी कोणत्या परिस्थितींत लिहिली व प्रकाशित केली हें तिच्या निवेदनांत स्पष्ट केलें आहे. त्या आवृत्तीच्या खपाविषयीं एक गोष्ट येथें नमूद करण्यास हरकत नाहीं. पुस्तकविक्रेत्यांचा नेहमींचा अनुभव येथेंही आला. ते पुस्तकाच्या पुष्कळ प्रति खपविण्याची कोणतीही जबाबदारी न घेतां भरपूर दलालीची मात्र बिनदिकत मागणी करीत. यामुळें माझें व त्यांचें बनलें नाहीं. तेव्हां हीं पुस्तकें प्रायः स्वप्रयत्नानें खपलीं. एका पुस्तकविक्रेत्यानें थोड्या मोठ्या प्रमाणांत पुस्तकें खरीदिलीं हें खरें. पण त्यासाठीं मला दलाली तर अधिक द्यावी लागलीच. शिवाय त्यानें त्यांतील कांहीं पुस्तकें तरी दुप्पट किंमतीला विकल्याचें समजलें. मी मात्र मजकडील शेवटची प्रत संपेतों प्रत्येक पुस्तक मूळ किंमतीसच विकलें.

ही झाली विक्रीविषयींची एक गोष्ट. आतां यांतील संशोधनाविषयीं एक गोष्ट सांगावयास हरकत नाहीं. याची पहिली आवृत्ति श. १८६० मध्यें प्रकाशित झाली. तींत मी विस्तारानें चर्चा करून विठ्ठल आणि रखुमाई या नांवांच्या व्युत्पत्ति दिल्या आहेत. तदनंतर चौदा वर्षांनीं डॉ. म. अ. मेहेंदळे


यांनीं या दोन नांवांच्या बरोबर त्याच व्युत्पत्ति पुढें मांडणारें एक टिपण नवभारत मासिकाच्या इ. १९५२ आक्टोबरच्या अंकांत प्रसिद्ध केलें. तें पाहिल्यावर त्या टिपणांतील दोष व अनावश्यकता दाखविणारें सुमारें २०० शब्दांचें टिपण मी नवभारतचे कार्यकारी संपादक श्री. वि. म. बेडेकर यांजकडे प्रसिद्धीसाठीं पाठविलें. डॉ. मेहेंदळे सध्या येथें नाहींत हें कारण देऊन त्यांनीं तें टिपण परत केलें. डॉ. मेहेंदळे व श्री. बेडेकर दोघेही सत्प्रवृत्तीचे आहेत याविषयीं माझी खात्री आहे. तथापि दोघांच्याही कृति ज्ञानोपासनेस मारक झाल्या याविषयीं मला शंका नाहीं. प्रा. मेहेंदळे यांजवर माझा मुख्य आक्षेप हा आहे कीं, त्यांनीं सर्व प्रकारची अनुकूलता असूनही आवश्यक तें पूर्वावलोकन न करतां प्रायः अनावश्यक असें टिपण लिहिलें आणि श्री. बेडेकर यांच्याविरुद्ध आक्षेप असा कीं, त्यांनीं माझ्या लहानशा खुलाशासही प्रसिद्धि न दिल्यामुळें ज्ञानोपासनेंत व्यत्यय आला. डॉ. मेहेंदळे यांच्या अनुपस्थितींत जर त्यांचें टिपण प्रसिद्ध होऊं शकतें तर त्यावरील आक्षेप कां प्रसिद्ध होऊं नये ? यावाबत माझी बैठक किती भक्कम आहे याची वाचकांनीं अवश्य खात्री करून घ्यावी. त्यांतून प्रा. मेहेंदळे यांच्याविरुद्ध मी सदभिरुचीस सोडून कांहीं लिहितों तर गोष्ट वेगळी होती.पण त्यांचें टिपण प्रायः पूर्वावलोकनविरहित व अनावश्यक होतें हें दाखविणारा खुलासाही प्रसिद्ध होऊं नये हें मला पटत नाहीं. मी स्वतःचीच एक घटना सांगतों. मी बरेच वर्षांपूर्वी अभिलषितार्थचिंतामणि व शिल्परत्न यावर न्यू इंडियन अँटिक्वेरीच्या पहिल्या खंडांत लेख लिहिला. त्याच विषयावर माझ्यापूर्वी डॉ. व्ही. राघवन् आणि त्यांच्यापूर्वी डॉ. आनंद कुमारस्वामी यांनीं लेख लिहिले होते. ही गोष्ट त्या दोघांनींही न्यू इं. अँ. च्या संपादकांच्या ध्यानांत आणून दिली. त्यांनीं त्यांचे खुलासे आनंदानें प्रकाशित केले. त्याबद्दल कोणासही वैषम्य वाटलें नाहीं, वाटूंही नये. पण येथें येवढें होऊं शकलें नाहीं.

या पुस्तकांत छापलेल्या प्रतिमांपैकीं क्र. ६ व ७ या आर्किऑलॉजी खात्यांतील असून त्या छापण्यास परवानगी दिल्याबद्दल मी त्या खात्याचे आभार मानतों. क्र. ४ हें विठ्ठलाचें अत्यंत प्रामाणिक चित्र आहे. फक्त त्यांत जानवें व गंध यांमुळें थोडें वैगुण्य उत्पन्न झालें आहे. हें मला पंढरपूरच्या संशोधनमंडळाकडून मिळालें. याबद्दलही मी त्याचा आभारी आहे.


श. १८७५ अक्षय्य तृतीया; ता. १६।४।१९५३ **गणेश हरी खरे**



१ चंद्रभागेचा एक देखावा पंढरपूर



२ पुंडलीकाची समाधि (मधली वास्तु) पंढरपूर



३ श्रीविठ्ठल व रखुमाई देवालयें पंढरपूर

श्रीविठ्ठल आणि पंढरपूर

१ क्षेत्रवर्णन

१. महाराष्ट्रांत ब्राह्मणांपासून अंत्यजांपर्यंत सर्व जातींच्या लोकांना माहीत असलेलें कोणतें क्षेत्र असेल तर तें पंढरपूर हें होय. येथील मुख्य दैवत जो विठोबा त्याच्या दर्शनासाठीं मराठी प्रांतांतील हिंदुधर्मीयांपैकीं सर्व जातींचे लोक येतातच. पण महाराष्ट्राच्या बाहेरून विशेषत: कर्नाटक व तेलंगण या प्रांतांतील लोक हजारांनीं मोजण्याइतके या देवाच्या यात्रेस येतात. याचें कारण उघड आहे. भक्तिमार्गांतील ज्ञानदेव, तुकाराम, चोखामेळा, इत्यादि महाराष्ट्रीय संतांनीं ज्याप्रमाणें विठोबा हेंच आपलें आराध्य दैवत मानलें त्याप्रमाणें चौंडरस, पुरंदरदास, कनकदास, इत्यादि स्पृश्यास्पृश्य कर्नाटकी संत व कवि हेही विठ्ठलासच आपलें एकमेव दैवत समजल्यामुळें कर्नाटक, तेलंगण इत्यादि भागांतून भक्तगण पंढरपुरास यावे हें साहजिक आहे. अशा या दैवताविषयीं व गांवाविषयीं येथें कांहीं माहिती देतों.

२. पंढरपुरास जाण्यास रेल्वेचे दोन रस्ते आहेत ते असे— (१) सेन्ट्रल रेल्वेच्या पुणें-सोलापूर रस्त्यावरील कुर्डूवाडी या स्टेशनापासून बार्शी लाइट रेल्वेचा फाटा पंढरपुरास गेला आहे. (२) सदर्न (मराठा) रेल्वेच्या पुणें-बंगळूर रस्त्यावरील मिरज स्टेशनपासून बार्शी लाइट रेल्वेचा फाटा पंढरपुरास गेला आहे. कुर्डूवाडी व मिरज या दोन्ही ठिकाणांहून मेल गाड्यांना जोडून बार्शी लाइट रेल्वेच्या गाड्या आहेत. या शिवाय मोटर, बैलगाड्या वगैरे जाण्याचे रस्ते आहेत ते असे—(१) हा रस्ता कुर्डूवाडीहून रेल्वे रस्त्याशीं समांतर असा पंढरपूरपर्यंत गेला आहे. (२) हा रस्ता अहमदनगर, कर्माळें, वांगी, सापटणें, करकम या गांवांवरून पंढरपुरास गेला आहे. (३) हा रस्ता पुणें, इंदापूर, टेंभुर्णी या गांवांवरून सापटणें येथें वरील रस्त्यास मिळतो. (४)

हा रस्ता पुणें, फलटण, नातेंपुतें, माळशिरस, वेळापूर या गांवांवरून पंढरपुरास गेला आहे. (५) हा रस्ता सातारा, कोरेगांव, म्हसवड, भाळवणी इत्यादि गांवांवरून पंढरपुरास पोहोंचला आहे. (६) हा रस्ता चिपळूण, हेळवाक, मल्हारपेठ, उंब्रज, मसूर, मायणी, दिघंची वगैरे गांवांवरून पंढरपुरास गेला आहे. (७) हा रस्ता मिरजेहून बार्शी लाइट रेल्वेच्या कडेनें पंढरपुरास गेला आहे. (८,९) हे रस्ते जतवरून निघून अनुक्रमें सांगोलें व शेटफळ या गांवांपाशीं ७ व्या रस्त्यास येऊन मिळतात. (१०) हा रस्ता विजापूरहून निघून बोरगी, उमदी, मंगळवेढें वगैरे गांवांवरून पंढरपुरास गेला आहे. (११) हा रस्ता सोलापुराहून निघून कुरुल वगैरे गांवांहून थेट पंढरपुरास गेला आहे. (१२) हा रस्ता सोलापुराहून प्रथम मोहोळ येथें व नंतर पंढरपुरास गेला आहे. सध्या यांपैकीं बहुतेक रस्त्यावरून एस. टी. च्या गाड्या चालू आहेत. त्यांचें भाडें मैली पाऊण आणा आहे.

३. पंढरपुरास गेल्यावर यात्रेकरूनें कोठें उतरावयाचें हा प्रश्न पडत नाहीं. श्रीमंत यात्रेकरू विठोबाच्या सेवेकऱ्यांपैकीं कोणाकडे तरी उतरतो. गरीब यात्रेकरू देवळें, मठ, धर्मशाळा किंवा एखादें खाजगी ओळखीचें घर अशा ठिकाणीं उतरतो. हल्लीं ब्राह्मणेतर जातींसाठीं आपआपल्या जातीपुरत्या अनेक धर्मशाळा झाल्या आहेत.

४. पंढरपुरांतील[१] मुख्य व मोठें देऊळ म्हटलें म्हणजे विठोबाचें होय. हें मध्यवस्तींत असून याची पूर्वपश्चिम लांबी ३५० फूट

---

१ मी या प्रकरणांत माहिती दिली आहे ती मुख्यतः सोलापूर गॅझेटियर आणि—मला वाटतें श्री. गोखले या नांवाच्या एका गृहस्थांनीं लिहिलेलें—'श्रीक्षेत्र पंढरपूर वर्णन' या दोन पुस्तकांवर आधारलेली आहे. मात्र स्थलवर्णनांतील कित्येक विधानें पंढरपुरास गेलों असतां तपासून आवश्यक तेथें दुरुस्त केलीं आहेत. मराठी पंढरपूर वर्णनांतील स्थलविषयक बहुतेक माहिती सोलापूर गॅझेटियरमधून घेतलेली दिसते. हींत आलेले कर्ता व काल यांचे निर्देश गॅझेटियरकारांनीं कोठून मिळविले तें समजत नाहीं. प्रत्यक्ष कागदपत्र पहावयास मिळाले तर त्यांत सुधारणा करणें शक्य आहे पण असे कागदपत्र मला पहावयास न मिळाल्यानें हे निर्देश कच्चे समजावे

व दक्षिणोत्तर रुंदी १७० फूट आहे. देवळाच्या सभोंवतीं फरसबंदी रस्ता आहे. त्याची जास्तींत जास्त रुंदी २५ फूट आहे. देवळाच्या पुढच्या भागाला गड म्हणतात. देवळाला पूर्वेस तीन, दक्षिणेस एक, पश्चिमेस एक व उत्तरेस तीन असे आठ दरवाजे आहेत. पूर्वेकडच्या दरवाज्यानें लोक फार जातात व येतात. यास **महाद्वार** अथवा नामदेव दरवाजा म्हणतात. महाद्वाराचे पायऱ्यांजवळ उजवीकडे (=पूर्व-ईशान्य) चोखोबाची समाधी आहे. यापर्यंत जाण्यास १२ पायऱ्या चढाव्या लागतात. पहिल्या पायरीस **नामदेवाची पायरी** म्हणतात. हें नांव पडण्याचें कारण येथें नामदेवांनीं समाधि घेतली. ती येथेंच घेण्याचें कारण असें सांगतात कीं, पांडुरंगाचे दर्शनास अनेक भक्त येतात त्यांचे पाय आपल्या मस्तकास लागले तर आपण उद्धरूं. म्हणून नामदेवांनीं आपण होऊन देवाजवळ या जागेची मागणी केली व ती जागा त्यांस मिळाली. नामदेव पायरीवर व तिच्या वरचे पायरीच्या समोरच्या बाजूस पितळेचा पत्रा बसविलेला आहे. या पायरीवर चढणाऱ्या मनुष्याच्या उजव्या हातास नामदेवाचा एक पितळेचा मुखवटा लागतो. वरच्या पायरीच्या दर्शनी बाजूस पत्रा आहे त्यावर चौदा मनुष्याकृति उठविल्या आहेत. त्या नामदेवांनीं ज्या वेळेस येथें समाधि घेतली त्याच वेळेस त्यांच्या चवदा नातलगांनीं चंद्रभागेंत **उड्या घेतल्या** असें दाखवितात ! नामदेवाच्या मुखवट्यास मराठेशाही पोषाख घालून माळा घालितात व गंध लावितात. हा मुखवटा शिंपी गुमास्त्याच्या देखरेखींत असून यापुढें येणारें उत्पन्न बडव्यांकडे जातें. नामदेव पायरीपुढें संगमरवरी फरशी केली असून तेथें कीर्तन वगैरे होतें. नामदेव मोठे साधु व भगवद्भक्त होऊन गेले म्हणून त्यांच्या पायरीवर पाय देऊन कोणी जात नाहीं. पायऱ्या चढून दरवाज्याचे आंत गेलें कीं, **मुक्ति(मुख)मंडप** लागतो. हा फार अरुंद व लहान आहे. ह्याच्या दोन्ही भिंतींत समोरासमोर तीन तीन खोल्या असून त्यांत देवाचे कोणी भक्त राहातात. येथेंच डाव्या बाजूच्या भिंतीमध्यें मोठें फडताळ असून त्यांत एक गणपति आहे. या मंडपाच्या वर नगारखाना आहे.] मुक्तिमंडपाच्या चार

पायऱ्या उतरून गेलें कीं, एक मोठा फरशी केलेला चौक लागतो. ह्याचें क्षेत्र १२०×६० फुटांचें आहे. ह्याच्या दक्षिण व उत्तर बाजूंस ओवऱ्या असून देवळांत प्रयोजनें होतात तेव्हां येथें स्वयंपाक होतो. इतर वेळीं ह्या दोन्ही जागा विद्यार्थी अभ्यास करण्यास आणि वारकरी भजन करण्यास उपयोगांत आणितात. यावरील लाकडी मंडप बडव्यांनीं बांधिला. येथेंच साधु गुंडोजीबोवा यांचें भजन चातुर्मास्यांत दिवसां चार वाजल्यापासून संध्याकाळपर्यंत चालतें. पायऱ्यांच्या उजव्या हातास प्रख्यात साधु प्रल्हादबोवा बडवे यांची समाधि आहे. जवळच कान्हया हरिदास याचीही समाधि आहे. ह्या मंडपांत एक लहान व उत्तरेस मंडपाबाहेर एक तीस फूट उंचीची अशा दोन दीपमाळा आहेत. ह्या दीपमाळांजवळच एक दगडी रांजण आहे. तो बोधलेबोवांचा आहे. मंडपाच्या पश्चिम बाजूस समोरासमोर दोन दीपमाळा आहेत. ह्यापुढें लाकडी सभामंडप लागतो. यांत एक गरुडाचें व एक मारुतीचें अशीं दोन लहान देवळें आहेत. गरुडाचें देऊळ नीट विठोबाच्या मूर्तीसमोर आहे. गरुडाच्या पुढें पण किंचित उजव्या अंगास मारुतीचें देऊळ आहे. उजव्या हाताच्या ओवरींत भयंकर मुद्रा दिसणारी मारुतीची एक मूर्ति आहे. श्रीसमर्थ रामदास स्वामी यांनीं तिची स्थापना केली. जवळच एक तुळशीवृंदावन आहे. ह्या मंडपांत दक्षिण बाजूस माळणी फुलाच्या माळा करीत व विकीत बसतात. येथें कथाकीर्तनेंही होतात. गुंडोजीबोवांच्या दुसऱ्या शाखेचें भजन येथेंच दक्षिण भागांत घाटीपाशीं होतें. येथपर्यंत देऊळ पहात येणारास दगडाच्या फरशीवर असंख्य नांवें खोदलेलीं आढळतात. हीं नांवें खोदविण्यांत भाविक लोकांचा असा समज आहे कीं, आपलें नांव पांडुरंगदर्शनास येणाऱ्या भक्तांच्या चरणधूलीनें पवित्र होतें. नांवाप्रमाणेंच पायऱ्यांवरून व इतर जागीं गोल भोकें आढळतात. हीं भोकें लोक रुप्याचीं नाणीं हातोड्यानें नवसाकरितां ठोकवितात त्यामुळें झालीं आहेत. रुतलेलें रुपें पैशाच्या आशेनें लोकांनीं काढून घेतल्यामुळें आतां भोकें मात्र राहिलीं आहेत. चौकांतून पायऱ्या चढून वर जातांना डाव्या बाजस लोळी पडलेली घाटी

लागते. ही २॥ फूट उंचीची असून हिचा व्यासही तितकाच आहे. पायऱ्या चढून आलें म्हणजे एक दालन लागतें. ह्या दालनांतून आंतील मंडपांत जाण्यास तीन दरवाजे आहेत. ह्या दरवाज्यांसमोर चौकांतून वर येण्यास पायऱ्या आहेत. मधल्या दरवाज्यासमोरील पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंस जयविजय व ओटे आहेत. तेथें माणसें देवाचें दर्शन घेऊन आल्यावर टेकतात. मधल्या दरवाज्यावर पितळेचे पत्रे कुशलतेनें बसविले असून त्याच्या एका बाजूस जय व दुसऱ्या बाजूस विजय ह्यांच्या मूर्ति आहेत. दरवाज्याकडे तोंड करून उभें राहिलें असतां डाव्या हातास दालनाच्या भिंतींत एका कोनाड्यांत एक गणपति आहे व उजव्या हातास सरस्वती आहे. ही चतुर्भुजा असून हिच्या वरच्या उजव्या हातांत कमल, खालच्या उजव्या हातांत माळ, वरच्या डाव्या हातांत परशु व खालच्या डाव्या हातांत पुस्तक आहे. दरवाजे लाकडी असून त्यांत लोखंडी गज बसविले आहेत. ह्या दरवाजांतून आंत गेलें म्हणजे **सोळखांबी** मंडप लागतो. मंडपाला हें नांव पडण्याचें कारण याला सोळा खांब आहेत. ह्याचें क्षेत्र ४१॥×४५॥ फूट आहे. सर्व खांब दगडी असून त्यांच्या मधल्या चौकोनी चिऱ्यावर कोठें फुलें, तर कोठें कृष्णलीलेचीं व मत्स्यकूर्मादि अवतारांचीं चित्रें खोदलीं आहेत. एका खांबावर बंदूक घेतलेल्या मनुष्याचें चित्र आहे, त्यावरून मंडप मुसलमानी अमदानींत बांधला असावा असें ठरतें. दक्षिण व पूर्व या बाजूंकडून दुसऱ्या ओळींतील खांब रुप्याच्या व सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेला आहे. यास **गरुडखांब** म्हणतात. गरूड हा देवाचें वाहन व भक्त म्हणून सर्व लोक ह्यास आलिंगन देऊन पांडुरंगाचे दर्शनास जातात. ह्या मंडपाचे दक्षिणेच्या भिंतीला दोन व उत्तरेच्या भिंतीला तीन दरवाजे आहेत. पश्चिमेच्या भिंतींत पलीकडे जाण्यास दरवाजा आहे त्याला रुप्याचा दरवाजा म्हणतात. हा पूर्वी लहान होता व त्यावर रुप्याचा पत्रा होता. आतां फक्त कडी व तिचें कमळ हीं रुप्यानें मढविलेलीं आहेत. रुप्याचे दरवाज्यानें आंत गेलें कीं, **चौखांबी** मंडप लागतो. या चार खांबांपैकीं तीन खांबांना पश्चिम

व उत्तर बाजूस कठडा लावतात. चौखांबी मंडपाचे दक्षिण बाजूच्या भिंतींत हत्ती दरवाजा आहे. हा लहान असून त्याचे पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंना दगडी हत्ती आहेत. देवाचे उपचार करण्याकरितां लोक सोंवळ्यानें यावयाचे असतात त्यांना हत्ती दरवाज्यानें आंत घेतात. देवळांत मोठी दाटी असते त्या वेळी ह्याचा विशेष उपयोग होतो. कित्येक लोकांना बडव्यांच्या ओळखीनें दाटीचा त्रास चुकवून यानें चौखांबी मंडपांत जातां येतें. या मंडपाच्या उत्तरेकडच्या भिंतींत एक मोठें फडताळ आहे. त्यांत पांडुरंगाचें शेजघर आहे. ह्या शेजघरांत एक रुप्याचा पलंग असून बहुमूल्य वस्त्रांनीं युक्त अशी शय्या आहे. शेजघराचें दार लाकडी जाळीचें असून त्याला शेजारतीच्या खेरीज इतर वेळी कुलूप असतें. मंडपाच्या छपराला हवा व उजेड येण्याकरितां जाळ्या व गवाक्षें ठेवलीं आहेत. याची जमीन संगमरवरी आहे. चौखांबी मंडपांतून पुढें गेलें म्हणजे एक चौरस जागा लागते. हिला **कमान** म्हणतात. कमानीच्या पुढें गर्भागाराचा दरवाजा आहे. गर्भागार व कमान ह्यांची जमीन संगमरवरी आहे. गर्भागारामध्यें एक आठ इंच व्यासाची पितळेच्या पत्र्याची दांडी आहे. दांडीच्या पुढें भिंतीला लागून एक प्रभावळ आहे. तिज-पुढें दगडी चौथऱ्यावर रुपेरी चौरेडोलाच्या आंत विटेवर उभी असलेली मूर्ति आहे. हीच पांडुरंगाची मूर्ति होय. सिंहासनाच्या दोन्ही बाजूंस लहानसे दगडी ओटे देवाचे पुजारी बसण्याकरितां केले आहेत. ज्या मूर्तीच्या दर्शनाकरितां लांबलांबून पंढरपुरास लोक येतात आणि देवळांत आल्यावर गर्दी व धक्काबुक्की सहन करतात तीच ही मूर्ति होय. हिचें नांव विठ्ठल, पांडुरंग, पंढरीनाथ, विठ्ठलनाथ इत्यादि प्रकारानें उच्चारलें जातें. ही[१] साडेतीन फूट उंच असून हिच्या डोक्यावर महादेवाचें लिंग, पाठीवर शिंकें, गळ्यांत कौस्तुभमणि, हृदयावर वत्सलांछन, पोटावर त्रिवळी, पायावर ध्वज, अंकुश, यव, वज्र व रोवलेली काठी इत्यादि खुणा व

१ येथें केलेलें मूर्तीचें वर्णन भाविक यात्रेकरूंनीं कल्पिलेलें आहे. चिकित्सक दृष्टीनें केलेलें वर्णन व त्यावरील चर्चा ही पुढील भागांत आली आहे.

कमरेस कमरबंद असून त्याचा एक शेवट उजव्या मांडीवर पडला आहे. इ. स. १८७३ सालापर्यंत देवाच्या पायांस कवटाळतां येई. परंतु त्या सालीं पांडुरंगाचे दर्शनास कोणी बैरागी आले होते. दर्शनाचे वेळीं त्यांनीं देवाच्या पायांवर धोंडा टाकला. त्यामुळें मूर्ति दुखावली. त्यानंतर पायाला मागें धीरा दिला गेल्यामुळें आतां फक्त पायांवर डोकें मात्र ठेवितां येतें. कवटाळतां येत नाहीं. विठोबाचें दर्शन घेऊन सोळखांबी मंडपाच्या दक्षिणेचे दरवाज्यानें बाहेर आलें म्हणजे दक्षिण व पूर्व बाजूंस एक सलग ओसरी आहे. सोळखांबी मंडपांतील खांबांप्रमाणेंच येथें खांब आहेत. या ओसरीच्या पूर्वेकडील भिंतींत मोठ्या कोनाड्यांतून चार मूर्ति आहेत. पलीकडे दक्षिणेकडे जाऊं लागलें म्हणजे एक तरटीचें झाड लागतें. ह्या झाडाच्या उत्पत्तीची हकीगत सांगतात ती अशी–कान्हू नांवाची एक पांडुरंगाची पात्रा म्हणजे दासी होती. ती पंढरपुरानजीक मंगळवेढें गांवांत राहात असे. तिच्या सौंदर्याची ख्याति ऐकून त्या वेळच्या एका बादशाहानें तिला धरणें पाठविलें. कान्हू पात्रेचें मन पांडुरंगीं तन्मय झालें असल्यामुळें बादशाहाकडे जाऊन आपलें शरीर भ्रष्ट करून घेण्यापेक्षां भक्ताची लाज राखणाऱ्या पांडुरंगास शरण जाऊन आपला देह त्याचे चरणीं ठेवावा असा विचार करून व धरणें करणाऱ्यांस 'फक्त पांडुरंगदर्शन घेऊन येते असें सांगून ती विठ्ठलदर्शनास देवळांत आली व पांडुरंगाचे चरणांवर मस्तक ठेवून तिनें प्रार्थना केली कीं, 'विठ्ठला, मला तुजजवळ ठाव दे.' आपल्या भक्तेची विनंती ऐकून करुणाघन पांडुरंगाचें अंतःकरण द्रवलें व त्यानें तिला आपल्या मांडीत गुप्त करून टाकिलें. ह्याच प्रसंगीं हें तरटीचें झाड येथें उत्पन्न झालें. ह्या झाडाच्या खालीं एका कोनाड्यांत कान्हू पात्रेची प्रतिमा बसविली आहे. तरटीच्या झाडाजवळ दरवाजा आहे त्याला ह्या झाडाच्या सान्निध्यामुळें तरटीचा दरवाजा म्हणतात. कान्हू पात्रेच्या पुढें जवळच उजव्या हातास व्यंकटेशाचें लहान मंदिर आहे. व्यंकटेशाची मूर्ति गंडकी शिळेची असून हिनें आपल्या चार हातांत शंख, चक्र, गदा व पद्म हीं आयुधें धारण केलीं आहेत. व्यंकोबासमोर

ओटयावर एक नागोबा आहे. व्यंकटेशास उजवें घालून जवळच्या मंडपांत यावें. ह्या मंडपाच्या दक्षिण बाजूंतील ओवरी बाजीराव पेशव्यानें बांधिली. मंडपांत मध्यभागीं लक्ष्मीचें देऊळ आहे. या देवळाचे सभामंडप, मध्यगृह व गाभारा असे भाग आहेत. गाभाऱ्यांत गारेच्या शिलेची फारच सुन्दर लक्ष्मीची मूर्ति आहे. हिच्या डाव्या अंगच्या खोलींत अन्नपूर्णा आहे. लक्ष्मीचें देऊळ इ. १८३० मध्यें गुरसाळयाच्या कवडे नांवाच्या कोणी गृहस्थांनीं बांधिलें. बाजीरावाच्या ओवरींत नारद आहे. या ओवरीच्या शेजारीं कोपऱ्यांत वर चढून गेलें म्हणजे एक शिवलिंग लागतें. ह्याचें रामेश्वर असें नांव आहे. पश्चिमेच्या भिंतींतील ओवऱ्यांतून सूर्य, गणेश, खंडोबा व नागोबा हे देव आहेत.

५. विठोबाचे देवळामागें वायव्य कोपऱ्यांत पूर्वेकडे तोंड करून रुक्मिणीचें देऊळ आहे. ह्यांत गाभारा, मध्यगृह, मुख्य मंडप व लाकडी सभामंडप ह्यांचा समावेश होतो. लाकडी सभामंडपांत देवीपुढें कथाकीर्तनें होतात. येथें एक दीपमाळ आहे. मुख्य मंडपाला सहा खांब आहेत. मध्यगृहाच्या उत्तरेकडील भिंतींत एक खोली आहे. तें रुक्मिणीचें शेजघर होय. मध्यगृहाच्या दक्षिणेकडील भिंतीस दरवाजा आहे. तिकडून सत्यभामा व राही ह्यांच्या मंदिराकडे रस्ता जातो. मध्यगृहाच्या पलीकडे गर्भागार आहे. त्यांत रुक्मिणीची सिंहासनस्थ मूर्ति आहे. या मंदिराच्या जवळच रस्ता टाकून दोन दोन खोल्या आहेत. त्यांपैकीं एकींत सत्यभामा व दुसरींत राही आहे. रुक्मिणीकडून दक्षिणेकडच्या दरवाज्यानें येतांना डाव्या हातास नवग्रहांची (मातृकांची ?) एक शिला आहे. रुक्मिणीचे सभामंडपाच्या पायऱ्या चढून वर आलें म्हणजे समोर अश्वत्थ वृक्ष लागतो. ह्याचें नांव सुवर्णपिंपळ. येथून रुक्मिणीचें पुनः मुखदर्शन घेतात. याला पार आहे. ह्या वृक्षाजवळचे ओवरींत डावीकडून उजवीकडे जाऊं लागलें म्हणजे सहा खोल्यांतून पुढील देव दिसतात. पहिलींत काशी विश्वनाथ, दुसरींत रामलक्ष्मण, तिसरींत पितळेच्या पत्र्यानें मढविलेल्या कुत्र्यावर आरूढ झालेली कालभैरवाची मूर्ति, चौथींत रामेश्वराचें लिंग, पांचवींत दत्तात्रय, सहावींत नरसोबा असून सातवी

रिकामी आहे. या खोल्या कानबावा बडव्यानें बांधिल्या. ह्या खोल्या व सोळखांबी मंडप यांमध्यें अरुंद रस्ता आहे. त्याच्या पूर्व टोकास भिंतींत एक शिलालेख आहे. त्याला चौऱ्याऐंशीचा लेख म्हणतात. ह्याच्या वरच देवी बसविली आहे. चौऱ्याऐंशीचा शिलालेख व देवी ह्यांवरून या ठिकाणास चौऱ्याऐंशीची देवी असें म्हणतात. ह्या दगडास पाठ घासली असतां तितक्या लक्ष जन्मांचा फेरा चुकतो असा भाविक लोकांचा समज आहे. चौऱ्याऐंशीचें दर्शन घेऊन सोळखांबी मंडपांत आलें असतां वायव्येकडील कोपऱ्यांत दोन पादुकाजोड आहेत. एक जोड सूर्यनारायणाच्या मूर्तीसमोर उत्तरेकडील दरवाज्याजवळ आहे. त्याच्या अलीकडे दुसरा जोड आहे. त्याला गारेच्या पादुका असें म्हणतात. दामाजीपंताच्या विनंतीवरून महाराचे वेषांत पांडुरंगानें बादशाहाला दर्शन दिलें तें ह्या जागीं. त्याचें निदर्शक ह्या पादुका होत. पांडुरंगाचें मुखदर्शन घेण्याच्या तीन जागा आहेत. पहिली चौखांबी मंडपांतील रंगशिला; दुसरी गरुड खांबाजवळची व तिसरी मुक्तिमंडपांतील गणपतीजवळची जागा. मुक्तिमंडपांतून बाहेर येऊन उजवीकडे वळलें म्हणजे जो भाग लागतो तेथील खोलींत तेहतीस कोटि देव आहेत. या ठिकाणीं कोटि या शब्दाचा अर्थ संख्या असा न धरतां प्रकार असा धरावयाचा. ह्यांची पूजा वगैरे रामानुजपंथी लोकांकडून होते व उत्पन्नही त्यांनाच मिळतें. ह्या देवांसमोर एक मारुती आहे. तसेंच येथें जवळच एक मोठा वटवृक्ष आहे. हा जुनाट असून वटसावित्रीचे दिवशीं सर्व स्त्रिया ह्याचें पूजन करतात. विठोबाच्या देवळाच्या शिखरदर्शनाचें माहात्म्य मोठें असून यात्रेच्या दिवसांत लोकांस विठोबाचें दर्शन होणें शक्य नसतें. त्या वेळीं शिखरदर्शनावर आपली तहान भागवितात.

६. विठोबाच्या उपचारांचे नित्य व नैमित्तिक असे दोन भाग होतात. पैकी नित्योपचारांत काकडआरती, पंचामृतपूजा, माध्याह्नपूजा, अपराह्णपूजा, धूपारती, शेजारती, हे समाविष्ट होतात. **काकड आरती**—हींत देवास जागे करणें, त्याचे पाय धुणें, गंध लावणें, माळा घालणें, धूप, दीप, नैवेद्य, काकड्यानें आरती व मंत्रपुष्प हे

विधि असतात. **पंचामृतपूजा**—या पूजेंत जुन्या माळा व वस्त्रें उतरणें, पंचामृतस्नान, शुद्धोदकस्नान, वस्त्रपरिधान, आदर्शदर्शन इत्यादि षोडश उपचार असतात. **मध्याह्नपूजा**—हींत देवास महानैवेद्य अर्पण करणें हेंच मुख्य काम असतें. **अपराह्णपूजा**—ही दिवसा तिसऱ्या प्रहरीं होत असून हींत पादप्रक्षालन व नवीन वस्त्रपरिधान हे विधि मुख्य असतात. **धूपारती, शेजारती**—ह्या पूजा इतरत्र प्रचलित असल्याप्रमाणेंच आहेत.

७. देवास बुधवारीं व शनिवारीं अभ्यंगस्नान घालतात. एकादशीला रोजच्या प्रमाणें शेजारती होऊन देव झोंपण्यास जात नाहींत. या दिवशीं देवाला उपवासाच्या जिनसांचा नैवेद्य दाखवितात. धनसंक्रांतीपासून मकरसंक्रांतीपर्यंत खिचडीचा नैवेद्य असतो व पोषाखाचे वेळीं देवास कानपट्टी बांधितात. माघ शुद्ध पंचमीपासून रंगपंचमीपर्यंत देवाच्या पायांवर गुलाल टाकितात व डोक्यास बत्ती पागोटें बांधतात. उन्हाळ्यांत तिसरे प्रहरीं देवास गार पाणी, उपाहारार्थं कांहीं फराळाचे पदार्थ व तांबूल अर्पण करतात. पूर्वीं पाडव्यापासून मृगनक्षत्र निघेपर्यंत देवास तिसरे प्रहरीं गंधाची उटी करीत असत. आतां शेजारतीचे वेळीं करतात. गोकुळअष्टमीचे नऊ दिवस देवाकडे चांगला उत्सव होतो. त्या वेळीं कथा, कीर्तन व ब्राह्मणभोजन होतें. आषाढ वद्य १ स व कार्तिक वद्य २ स देवळांत काला होतो.[१] तेव्हां हरिदासाचे डोक्यास पादुका बांधून वाजत गाजत त्याला देवळांत आणितात. काला मारुतीपाशीं होतो. काल्याची दही हंडी फोडतात व सर्वांस तीमधील दही प्रसाद म्हणून देतात.

८. देवाप्रमाणें रुक्मिणीला मंगळवारीं व शुक्रवारीं अभ्यंगस्नान असतें. उन्हाळ्यांत तिसरे प्रहरीं पाणी अर्पण करितात व उटी

---

१ ह्यास नामदेवकाला असेंही म्हणतात. हा काला साधू नामदेव करीत असत; पुढें तो त्यांच्या वंशजांकडे चालू होता. नंतर कांहीं कारणांनीं हरिदासांनीं करण्याची वहिवाट पडली. काल्याचे वेळीं गोकुळांत कृष्ण खेळ खेळले त्यांपैकीं कांहीं करून दाखवितात.

लावितात. धनसंक्रांतीपासून महिनाभर खिचडीचा नैवेद्य दाखवितात. नवरात्रांत देवीचा नऊ दिवस उत्सव होतो. रोज दागिने घालतात. देवीपुढें नऊ दिवस पुराण, गायन, कथा व ब्राह्मणभोजन हीं चालतात. सर्व सण, भोगी, संक्रांत व किंक्रांत ह्या दिवशीं देवीस सर्व दागिने आणि राखी पौर्णिमेस राखी व इतर अलंकार घालतात.

९. आषाढी व कार्तिकी या यात्रा पंढरपुरास दांडग्या भरतात व त्या वेळीं हजारों लोक दर्शनास येतात. त्या सर्वांना देवाचे नित्य उपचार चालल्यास दर्शन व्हावयाचें नाहीं; ह्यासाठीं यात्रा भरूं लागण्याचे पूर्वीं म्हणजे शुद्ध पंचमीस देवाचा व देवीचा पलंग बाहेर निघतो. तेव्हांपासून प्रक्षाळपूजा होईपर्यंत दोघांचे सर्व नित्योपचार बंद असतात. फक्त सकाळचें स्नान व पूजा दोहोंकडे होते आणि देवाचे दर्शनास नंतर सर्वकाळ मोकळीक मिळते. यात्रेच्या दिवसांत भक्तांस अहोरात्र दर्शन दिल्यामुळें पांडुरंगास शीण येतो अशी समजूत आहे. म्हणून प्रक्षाळपूजेचे दिवशीं उंची उटण्यांनीं व साखरेनें देवाचें अंग चोळून स्वच्छ करितात. ह्या दिवशीं गांवांतल्या लोकांकडून साखरपाणी देवास स्नान घालण्यासाठीं येतें आणि देवास पुष्कळ स्नानें घालतात. हेतु हा कीं देवाचा शीण जावा. ज्या वेळीं देवाचे अंगास घाम सुटलासा दिसतो तेव्हां स्नान घालणें बंद करून व पोषाख घालून धूप, दीप, नैवेद्य अर्पण करितात. देवाचे स्नानानंतर बडवे लक्ष्मीसमोर स्नानें करितात.

१०. ह्याशिवाय देवळांत गौरी व गणपति ह्यांचा उत्सव होतो. महालक्ष्मीच्या समोरील ओट्यावर गणपति बसवितात. ह्याचें विसर्जन अनंतचतुर्दशीस होतें. बडवे मोठ्या घाटीजवळ व उत्पात रुक्मिणीकडे गौर बसवितात.

११. **पांडुरंगाचे अलंकार: सोन्याचे**—पायांत पैंजण व साखळ्या, हातांत कडींतोडे, दंडांत बाहुभूषणें, सोन्याचा मुकूट, नाम, नेत्र, बोराएवढ्या सोन्याच्या मण्यांच्या पांच चार माळा, पुतळ्या व मोहरा यांच्या माळा, सूर्यहार, चंद्रहार, जानवें, मुरली. **जडावाचे**—कानांत चौकडा, व मकरकुंडलें शिरपेंच, नाम, कौस्तुभमणि व कमळाचा हार. **मोत्याचे**-बोराएवढ्या मोत्यांची एकावळी, कंठे, इत्यादि.

१२. **रुक्मिणीचे अलंकार** : **सोन्याचे**–पैंजण, साखळ्या, गोट, पाटल्या, तोडे, वाकी, सरी, कंठा, चंद्रहार, मोहरा व पुतळ्या यांच्या माळा, चौकटी पेट्यांची माळ (हायकोल), तानवडीं, कर्णफूल व मंगळसूत्र. **जडावाचे**–कमरपट्टा, शिद्यांचा हार (ह्यास पाचू लावले असून ते खारकेएवढे लांब आहेत. यास मोत्यांचे पांच पांच सर आहेत. हा गळ्यापासून मांड्यांपर्यंत लांब पडतो), ठुशी (वर मोती व खालीं पाचू), बाजूबंद, बिंदी, बिजवरा, कर्णफुलें, मुकूट, मत्स्य व तन्मणी. **मोत्याचे**–कंठे, पेट्या, पोतपेट्या, पाटल्या, जवे, बांगड्या, बाजूबंद, बिंदी, बिजवरा, मोठी नथ, काप, पुतळी.

१३. महाद्वारावर असलेल्या एका लेखावरून तो दरवाजा रखमाजी अनंत पिंगळे यानें कृष्णाजी मुरार याच्या हस्तें शक १५४० (इ. १६१८) मध्यें बांधला असें दिसतें. फरशी सभामंडपाचा पूर्वेचा कांहीं भाग दुसरे बाजीराव पेशवे यांच्या कारकिर्दींत गुंडोजी बुवांच्या भजनासाठीं बांधला गेला असें म्हणतात. याच मंडपांतील उत्तर बाजूच्या ओवऱ्यांपैकीं दोन कोणा शिवदेव आडनांवाचे किंवा कोणा शिवदेवाचे मुलगे पांडुरंग व निळो यांनीं शक १६६० च्या कार्तिकांत (इ. १७३८) व दोन त्रिंबकराव मामा पेठे यांनीं याच सालीं पौषामध्यें बांधल्या असें त्या ओवऱ्यांवरील लेखांमुळें समजतें. फरशी मंडपामधून पायऱ्या चढून आलें असतां लागणारा सोपा त्यामधील उत्तरेच्या भिंतींत असलेल्या लेखावरून श. १५४३ (इ. १६२१) मध्यें माणकोजी नारायण व आपाजी या नांवाच्या कोणी पेड नांवाच्या गांवीं राहणाऱ्या सावकारांनीं बांधला असें दिसतें. सोळखांबी मंडप सुमारें १५० वर्षांपूर्वी दौंडकर नांवाच्या कोणी इसमानें बांधला असें म्हणतात. सोळखांबी मंडपाच्या बाहेरील दक्षिणेकडचा भाग शक १७७१ (इ.१८४९) च्या सुमारास मैनाबाई आनंदराव पवार यांनीं बांधला. विठोबाच्या देवळाचें शिखर भोरच्या संस्थानिकांनीं शक १७५२ (इ.१८३०) सालीं बांधलें. रुक्मिणीच्या देवळाचें शिल्पही अर्वाचीन म्हणजे १६ व्या शतकाअलीकडचें असून त्या देवळाचा सभामंडप निजामाचा

दिवाण चंदूलाल यानें बांधला आहे. पांडुरंगाच्या दक्षिणद्वाराकडील ओवऱ्या श. १७२९ (इ. १८०७) च्या कार्तिकांत व मंडप श. १७३३--३४ (इ. १८११) मध्यें झाला.

१४. **विष्णुपद--वेणुनाद**—पुंडलीकाचे देवळापासून दक्षिणेस सुमारें पाऊण मैलावर नदीचे पात्रांत हें देऊळ आहे. विष्णुपदाची मूळ बांधणी इ. १६४० सालीं कोणी धामणगांवकर बुवांनीं केली व इ. १७८५ मध्यें चिंतो नागेश बडवे यांनीं हल्लींचें स्वरूप दिलें. **गोपाळपूर**—पंढरपूरच्या दक्षिणेस सुमारें एक मैलावर गोपाळपूर हें वाडीवजा गांव असून तेथें गोपालकृष्णाचें देऊळ आहे. हें बांधण्यास सुरवात इ. १६६६ सालीं शामजी अनंत नांदिवरेकर व त्याचे नातलग यांनीं केली आणि कोणी गजेंद्र यशवंतानें संपविलें. याचे उत्तरेस भीमक राजाचें, त्याचे पूर्वेस लक्ष्मीनारायणाचें देऊळ आहे व जवळच जनाबाईची गुहा आहे. **पंचमुखी मारुति**—दत्ताच्या घाटाच्या दक्षिणेस कांहीं अंतरावर हें देऊळ आहे. हें दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत बांधलें. **भुलेश्वर**—पंचमुखी मारुतीच्या पलीकडे व घाटग्यांच्या बागेजवळ हें स्थान आहे. हें इ. १७८७ मध्यें जनाजी बाजी घाटगे यांनीं बांधलें. यासच गॅझेटियरमध्यें बेलीचा महादेव म्हटलें आहे. **पद्मावती**—पंढरपूरच्या पश्चिमेस अर्ध्या मैलावर या नांवाचें तळें व देऊळ आहे. हें सकवारबाई भरतार यशवंतराव पवार यांनीं इ.१७७८ मध्यें बांधलें. **व्यास**—पंढरपूरच्या उत्तरेस हें देऊळ आहे. हें ज्योतिपंतदादा महाभागवत यांनीं बांधलें असें म्हणतात. **अंबाबाई**—ही व्यासाचे देवळापासून बरेच अंतरावर पूर्वेस आहे. मूळ देऊळ सिदू कोळ्यानें बांधलें. त्याचा जीर्णोद्धार लिंबा नांवाच्या नर्तकीनें इ. १८५४ च्या सुमारास केला. **लखूबाई**—हें देऊळ पंढरपूरच्या पूर्वेस वाळवंटांत आहे. जुन्या देवळाचा जीर्णोद्धार धोंडभट कटके नांवाच्या कोणी गृहस्थानें इ. १७८० च्या सुमारास केला. **यमाई व ज्योतिबा**—हीं देवळें पंढरपूरच्या दक्षिण भागांत आहेत. **श्रीधर स्वामींची समाधि**—कुंभार घाटावर रामविजय, हरिविजय इत्यादि ग्रंथांचे कर्ते श्रीधरस्वामी नाझरेकर यांची समाधि आहे. **नगरेश्वर**—कासारघाट चढल्यावर उजव्या हातास हें देऊळ आहे. **सरकारवाडा महादेव**—

चंद्रभागा घाटावरील सरकारवाड्यास जातांना डाव्या हातास हें देऊळ आहे. **त्र्यंबकेश्वर**–रोकडोबाच्या वेशीजवळ हें देऊळ आहे. **ताकपिठ्या विठोबा**–विठोबाच्या देवळाच्या पश्चिमेस एका बोळांत हें देऊळ आहे. हें श. १५४० च्या सुमारास राधाबाई नांवाच्या एका ब्राह्मण विधवेनें बांधिलें. **कोटेश्वर**–होळकर रामाच्या उत्तरेस हें स्थान आहे. **खाजगीवाले मूर्ती**–सरदार खाजगीवाले यांच्या घरीं विठ्ठल, राधा व रुक्मिणी यांच्या सोन्याच्या मूर्ती आहेत. आषाढी व कार्तिकी एकादशीस यांचीच रथांतून मिरवणूक काढतात. **गोंदवलेकर राम**–कोमटी आळींत भडगांवकरांचे वाड्यांत हें देऊळ आहे. **नामदेव**–हें देऊळ कासार घाटावर आहे. **महाप्रभूची बैठक**–हें स्थान नदीच्या पलीकडील तीरास आहे. **काळभैरव**–विठोबाच्या देवळांतून महाद्वारानें बाहेर पडून पूर्वेस जाऊं लागलें असतां डाव्या हातास दुकानांच्या ओळींत हें देऊळ आहे. हें इ. १७३० च्या सुमारास कोंकणे नांवाच्या कोणी ब्राह्मणानें बांधलें. **गणपती**–काळभैरवाचे देवळाजवळच हा आहे. **शाकंभरी**–काळभैरवाच्या पूर्वेस हें देऊळ आहे. हिला बनशंकरीही म्हणतात. **मल्लिकार्जुन**–शाकंभरीचे देवळापुढील एक दुकान टाकलें कीं हें देऊळ लागतें. हें लिंगायतांचें असून बरेंच जुनें आहे. याचा कांहीं भाग अतिशय जुना आहे. कांहीं भाग नरहर नांवाच्या लिंगायत सोनारानें बांधला व कांहीं भाग इ. १८२० व १८५४ सालीं बांधला गेला. **तांबडा मारुति**–महाद्वार वेशींतून बाहेर पडतांच डाव्या हातास हें देऊळ आहे. याची स्थापना रामदास स्वामींनीं केली. पहिला जीर्णोद्धार पांढरे यांनीं इ.१७३० च्या सुमारास केला व २ रा इ. १८५५ च्या सुमारास झाला. **राम**–महाद्वार वेशींतून पूर्वेस जातांना चौक ओलांडल्यावर डाव्या हातास होळकरवाड्याची हद्द आहे तींतच नदीच्या बाजूस हें देऊळ आहे. हें अहिल्याबाई होळकर यांनीं बांधलें आहे. **मुरलीधर**–रामाच्या देवळासमोर चंद्रभागेकडे जातांना उजव्या हातास हें देऊळ आहे. हें बायजाबाई शिंदे यांनीं इ. १८४९ च्या सुमारास बांधिलें. **गारेचा महादेव**–हें देऊळ मुरलीधराच्या देवळाजवळच आहे. हें पहिले बाजीराव पेशवे यांनीं बांधलें असा प्रवाद आहे. **पुंडलीक**–विठो-

बाच्या देवळासमोर चंद्रभागेच्या वाळवंटांत हें देऊळ आहे. याचें मूळ काम इ. १७५० मध्यें होळकरांनीं केलें. त्याची दुरुस्ती इ. १८५० मध्यें नंदराम यांनीं केली व श्रीधर कृष्ण भाटे यांनीं इ. १८७८ मध्यें त्यास मंडप जोडला. **चंद्रभागा**–चंद्रभागा घाटावर हें देऊळ आहे. हें इ. १८५७ च्या सुमारास गोविंदबुवा चोपडेकर यांनीं बांधलें. **दत्त**–चंद्रभागेच्या देवळाच्या दक्षिणेस दत्ताचे घाटावर हें देऊळ आहे. **वटेश्वर महादेव**–दत्ताचे देवळाजवळ हें आहे. **बेरीचा महादेव**–वटेश्वर महादेवाच्या पश्चिमेकडील रस्त्यावर डाव्या हातास बऱ्याच अंतरावर हें आहे. हें कोतवाल बेरी यांनीं इ. १७८५ मध्यें दुरुस्त केलें. पूर्वीं यास भद्रेश्वर म्हणत. **काळा मारुति**–याच रस्त्यानें पुढें गेलें असतां कोपऱ्यावर हें देऊळ लागतें. हें इ. १७९९ च्या सुमारास एका गरीब ब्राह्मणानें बांधलें व सभामंडपाचें काम इ. १८६० च्या सुमारास मुंबईच्या एका भाटिया गृहस्थानें केलें. **चोफाळा**–काळ्या मारुतीपासून उत्तरेकडे जो रस्ता जातो त्यावर कांहीं अंतरावर हें देऊळ आहे. यांतील देव विष्णुपंचायतन. हें इ. १७७० च्या सुमारास इंदापूर येथील नारायण नाखरे यांनीं बांधलें. **पारावरील दत्त**–हरिदास घाटावर हा आहे. **बाभळ्याचा महादेव**–उद्धव घाटावर हें देऊळ आहे. हें उपर्युक्त बेरी यांनीं इ. १७७२ मध्यें बांधलें. **अमृतेश्वर**–रामायणाचे गेटावरून चाटीआळींत येत असतां कुंभार वेशींतील रस्ता ओलांडतांच उजव्या हातास हें देऊळ आहे. हें जुनें असून त्याची दुरुस्ती इ. १७८० सालीं गोविंद नाईक केसकर यांनीं केली व मंडपाचें काम इ. १८१० मध्यें एका गोसाव्यानें पुरें केलें.

१५. पंढरपूर येथें इतर मोठमोठ्या क्षेत्रांप्रमाणें चंद्रभागा अथवा भीमा नदीस घाट बांधले असून त्यांचा यात्रेकरूंना अतिशय उपयोग होतो. हे घाट पुढीलप्रमाणें आहेत.[१] (१) कृष्णाजीचा घाट (कृष्णाजी नाईक नरगुंदकर–इ. १८२५), (२) हा हल्लीं जमिनींत गाडला गेला आहे (नरगुंदकर–इ. १८२५), (३) उद्धवघाट

१ प्रत्येक घाटापुढें कंसांत तो बांधणाऱ्या इसमाचें नांव व बांधल्याचें वर्ष दिलें आहे. ही माहिती सोलापूर गॅझेटियरमध्यें आहे.

(गोपाळ नाईक तांबवेकर–इ. १७८०), (४) हरिदासघाट (हरि जानाई आप्पा हरिदास–इ. १७८५), (५) कुंभारघाट (रामचंद्र कृष्ण लिमये–इ. १७७०), (६) हा अपुरा आहे (इ. १७९०), (७) महाद्वारघाट (चितो नागेश बडवे–इ. १७८५), (८) कासारघाट (रामराव जवळेकर–इ. १७९८), (९) चंद्रभागा घाट (धाकटे बाजीराव पेशवे व गोविंदबुवा चोपडेकर–इ. १८२०), (१०) दत्ताचा घाट (चिंतामणराव आप्पासाहेब सांगलीकर–इ. १८२०), (११) या घाटास विशेष नांव नाहीं (गोपाळ नाईक जांभेकर–इ. १७७०).

१६. येथें म्युनिसिपल कमेटीनें लोकमान्य टिळक हायस्कूल, उद्योगशाळा, संस्कृत पाठशाळा, नेटिव्ह जनरल लायब्ररी या लोकोपयोगी संस्था चालविल्या असून त्याशिवाय गोरक्षण, अनाथ-बालकाश्रम, फाउंडलिंग होम, श्री. आपटे व कवठेकर यांचीं हायस्कुलें, ट्रेनिंग कॉलेज, इत्यादि संस्था उपयुक्त काम करीत आहेत.

१७. येथील लोकांचे मुख्य धंदे यात्रेकरूंची व्यवस्था करणें, खडी काढणें, कुंकू, बुक्का, तपकीर, जर्दा, लाखेच्या बांगड्या, तुळशीच्या मण्यांच्या माळा, विणे, चिपळ्या वगैरे वारकरी सांप्रदायिकांस उपयुक्त अशा वस्तू तयार करणें हे आहेत. सध्या जिनिंगच्या गिरण्याही निघाल्या आहेत. येथील आठवड्याचा बाजार मंगळ-वारीं भरतो; त्या वेळीं व यात्रेच्या दिवसांत वरील वस्तूंची फार मोठी देवघेव होते.

२ अर्वाचीन उल्लेख

१. सामान्यतः मराठेशाहींत व विशेषतः पेशवाईंत स्वतः छत्र-पति व पेशवे आणि त्यांचे किंवा त्यांच्या प्रतिपक्षाचे अनेक सरदार कित्येक वेळां पंढरपूर, तुळजापूर वगैरे क्षेत्रांच्या यात्रेस गेले होते. उ. राजवाडे खंड ६ पृ. १४ वर श. १६६१ (इ. १७३९) मध्यें

राजश्री स्वामी (बहुधा शाहू छत्रपति) मिरजेहून आणि राणोजी शिंदे चांभारगोंद्याहून प्रथम पंढरपूरच्या आषाढी यात्रेस आणि नंतर तुळजापुरास गेल्याचें नमूद आहे. याच खंडांत पृ. १०९ वर रामचंद्रबावा सुखटणकर श. १६७६ (इ. १७५४) च्या आषाढीस पंढरपूरच्या यात्रेस गेले असतां तेथें बहुधा जिवाजीपंतांचे (खाजगीवाल्यांचे) पुतणे गोपाळराव यांची व बावाच्या लोकांची बोलाचाली झाली. तेव्हां बावांनीं रागावून माणसें लावून गोपाळरायास मारलें अशी हकीकत आली आहे. पेशवे रोजनिशांचे शेवटीं पेशव्यांचे मुक्काम दिले आहेत त्यांवरून पेशवे व त्यांचे सरदार कर्नाटकाच्या स्वारीस जातांना व परततांना अनेकदां पंढरपुरावरून जात येत असें दिसतें. पण अशा सर्व उल्लेखांचा विठ्ठल देवस्थानाची माहिती समजण्यास तादृश उपयोग नसल्यामुळें येथें ते गाळले आहेत. देवस्थान किंवा क्षेत्र यांविषयीं माहिती देणारे तेवढेच निर्देश येथें घेतले आहेत. मराठी साधनग्रंथांना प्रायः सूची नसल्यामुळें अशा ग्रंथांतील झाडून सारे निर्देश एकत्र करणें अतिशय कालावधीचें काम आहे. निरनिराळ्या कारणांनीं उपर्युक्त साधनग्रंथ चाळीत असतां आढळले तेवढे निर्देश येथें दिले आहेत.

२. श. १४९० विभव श्रावण शुद्ध १ रविवार (इ. १५६८ जुलै २५) या दिवशीं इंदापूर येथें झालेला एक महजर उपलब्ध आहे. यांत पंढरपूरचे बडवे व उत्पात यांमध्यें देवाच्या वृत्तीसंबंधीं भांडण लागलें असतां बडव्यांनीं सांगितलेला व गांवसभेनें मान्य केलेला असा विठ्ठलाचे बडवे, उत्पात, पुजारी, बेणारी, डिंगरे, परिचारक, हरिदास, दिवटे हे सेवेकरी व त्यांचे हक्क यासंबंधीं तपशील आला आहे.[1]

२ अ. सु. १०४१ सफर १६ (अव्वल साल श. १५६२ ज्येष्ठ वद्य ४, इ. १६४० मे २८), सु. १०४६ सफर १२ (श. १५६८ चैत्र शुद्ध १४, इ. १६४६ मार्च २०) व सु. १०९४, फ. ११०३ रबिलाखर ५ (श. १६१५ मार्गशीर्ष शुद्ध ६, इ. १६९३ नोव्हेंबर

१ बडवे प्रकाशित-कागद क्र. १

२३) या कालनिर्देशांचे तीन महजर आणि सु. १०९४, फ. ११०३ रबिलाखर ७ (श. १६१५ मार्गशीर्ष शुद्ध ८, इ. १६९३ नोव्हेंबर २५) या कालनिर्देशाचें दुय्यम अधिकाऱ्याचें एक अस्सल पत्र उपलब्ध आहे. त्यांवरून असें दिसतें कीं, पांडुरंगाची पालखी व पालखीचें उत्पन्न यांवर आणि पांडुरंगास कोणी घोडें वगैरे वाहिलें तर त्यावर मालकी कोणाची याविषयीं बडवे व बेणारे यामध्यें अनेक वेळां भांडण लागलें असतां प्रत्येक वेळीं त्याचा निकाल साक्षी-पुराव्याचा विचार करून बडव्यांच्या बाजूनें दिला गेला. आणि गांवानें तसे महजर करून दिल्यानें अधिकाऱ्यानेंही पत्र करून दिलें. विसाजी देशमूख भूमकर याच्या मुलीनें वाचादत्त घोडें देवास अर्पिल्यामुळें हा प्रश्न नव्यानें उत्पन्न झाला होता असें शेवटच्या पत्रांत नमूद आहे.[1]

३. पंढरपुरास पालख्या व दिंड्या जाण्याचा प्रघात बराच जुना आहे असें दिसतें. श. १५६०।६१ (इ. १६३९) सालच्या ३ पत्रांत पालखी व दिंडी पंढरपुरास गेली असतां लागलेल्या खर्चाचा तपशील दिला आहे.[2]

४. भविष्य सांगणाऱ्या श. १५८१ (इ. १६५९) च्या एका पत्रांत 'वैशा [ख] पंढरपुरीचा विठ्ठलमूर्ति काडि(ढि)ली' असा उल्लेख आहे. यांतच तुळजापूरची मूर्ती, कोल्हापूरची महालक्ष्मी व विजापूरचा रवळनाथ यांनाही त्रास पोहोंचल्याचें नमूद आहे.[3]

४ अ. श. १५९९ नंतर केव्हां तरी लिहिलेल्या एका स्मरणपत्रावरून असें दिसतें कीं, श. १५९१ पौष शुद्ध २ (इ. १६६९ डिसेंबर १४) रोजीं देवानें पंढरपूर हें स्थळ सोडलें. पुढें श. १५९४ आषाढ शुद्ध १० स (इ. १६७२ जून २४) देवास बाहेर काढून चिंचोळी गांवांत ठेविलें; तों गडबड झाल्यानें पुनः त्यास लपविलें. नंतर भाद्रपदांत (ऑगस्ट–सप्टेंबर) कोणा त्रिंबक बहिरवा-

१ पंढरपूर संशोधन मंडळांतील श्री. विश्वनाथ गोपाळ बडवे यांचे कागद; क्र. ३ चा महजर वनिप पृ. ६५ वर प्रकाशित झाला आहे.

२ शिचप्र ८७, ८८. ३ शिचसा. १।४७

करितां त्यास बाहेर काढिलें. नंतर श. १५९५ वैशाख शुद्ध सप्तमीस (इ. १६७३ एप्रिल १३) देवास कोणा (बडवे) बापभावांच्या स्वाधीन केलें. पुढें श. १५९७ चैत्र वद्य सप्तमीस (इ. १६७५ एप्रिल ६) कोणा रंगोजीनें देवाची चोरी केली; पण कांहीं पैसे घेऊन आषाढ शुद्ध दशमीस (जून २२) देव परत दिला. पुढें भाद्रपदांत (ऑगस्ट–सप्टेंबर) भानजी बडवे व रंगोजी यांनीं संगनमत करून पुनः देव पळविला. पण पैसे दिल्यामुळें भोसेकर व परंडेकर यांच्या मध्यस्थीनें दिवाळीसाठीं देव ज्याचा त्यास परत दिला. नंतर आश्विन वद्य एकादशी ते कार्तिक बळिप्रतिपदेपर्यंत (ऑक्टोबर ५ ते ९) पूजा झाली. पण द्वितीयेस (ऑक्टोबर १०) मुघली सेनापति बहादुरखान याचें सैन्य आल्यामुळें पुनः देवास लपविलें आणि एकादशीस (ऑक्टोबर १९) गुळसऱ्यास नेलें. तेथें तो पुढील दिवाळी (इ. १६७६ आक्टोबर २७) पर्यंत कसाबसा प्रकट होता. पण दिवाळीच्या सुमारास देव लपवून त्याच्या पादुका मात्र ठेविल्या. पुढें श. १५९९ आषाढ शुद्ध १५ (इ. १६७७ जुलै ४) रोजीं देव परत स्वस्थानीं म्हणजे पंढरपुरास परतला. या वेळच्या मुसलमानी परचक्रामुळें विठ्ठलमूर्तीची केवढी ही तारांबळ व लोकांची देव चोरण्याइतकी किती हीन धनाशा! हा कागद सर्व दृष्टींनीं अतिशय उद्‌बोधक आहे.[1]

४ आ. छत्रपति राजारामानें राज श.२० वैशाख शुद्ध नवमीस (इ. १६९४ एप्रिल २३) काढलेलें एक अभयपत्र व एक आज्ञापत्र आहे. त्यांवरून असें दिसतें कीं, तांब्रांचा (मुघल-मुसलमानांचा) ज्या ज्या वेळीं पंढरपुरास त्रास होई तेव्हां तेव्हां विठ्ठलाची मूर्ति पंढरपूरजवळच्या देगांव या खेड्यांत लपवून ठेवीत. पण या खेड्यास मराठी लश्कराच्या वर्दळीमुळेंच वारंवार उपद्रव होई. तेथें मूर्ति ठेविल्या असतांनाच उपद्रव झाला तर देवाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें बरें नव्हे म्हणून हीं पत्रें आहेत. या पत्रांच्या अनुरोधानें मराठा सेनापति संताजी घोरपडे यानेंही सु. १०९६ जिल्हेज २२ (श. १६१७ आषाढ वद्य ९, इ. १६९५ जुलै २४)

१ पंढरपूर संशोधन मंडळ–वि. गो. बडवे यांजकडील कागद.

रोजीं उपर्युक्त गावास कोणत्याही प्रकारें उपद्रव न देण्याबद्दल आणि कोणी दिला तर त्याचें पारिपत्य करण्याबद्दल पागेस आज्ञा केली आहे. श. १६१७ आश्विन शुद्ध पंचमी (इ. १६९५ ऑक्टोबर २) चें व पंढरपूरच्या सर्व गांवकऱ्यांनीं लिहून दिलेलें एक पत्र आहे. त्यावरून असें दिसतें कीं, बडव्यांनीं मुसलमानी परचक्राच्या धामधुमीमुळें एकदां मूर्ति लपवून ठेवण्यासाठीं देगाव येथें नेली असतां देगावकरांनीं देव सर्व पंढरपूरकरांचा आहे तर सर्व पंढरपूर गावानें विनंति केल्याखेरीज आम्ही मूर्ति ठेवून घेत नाहीं असा आक्षेप घेतला. तेव्हां देव बडव्यांचा असें समस्त पंढरपूरकरांनीं लिहून दिल्याचें हें पत्र आहे. यामुळें केवळ बडव्यांच्या विनंतीवरून मूर्ति देगावांत ठेविली गेली. पुढें धामधूम शांत झाल्यावर बडवे मूर्ति परत पंढरपुरास नेऊं लागले असतां देगावकरांनीं मूर्ति पोंचल्याची पावती मागितली. तेव्हां प्रल्हादबुवा, गोपाळ विठ्ठल इत्यादि सात बडव्यांनीं श. १६२१ कार्तिक शुद्ध प्रतिपदेस (इ. १६९९ ऑक्टोबर १३) पावती दिली व ते मूर्ति घेऊन गेले.[१]

५. औरंगजेबाची दक्षिणेवरील चढाई चालू असतां इ. १६९५ ते १६९९ पर्यंत त्याची छावणी पंढरपुराजवळ ब्रह्मपुरी अथवा बेगमपूर येथें होती. या कालांत पंढरपूरच्या देवस्थानास त्रास झाला असलाच पाहिजे. म्हणून पंढरपूरच्या विठ्ठलाची मूर्ति चंद्रभागेपलीकडील देगाव येथें दडविली होती असें नव्यानेंच सांपडलेल्या उपर्युक्त कागदपत्रांवरून सिद्ध होऊं पहात आहे. मुसलमानांच्या मूर्तिभंजनाच्या धाकामुळें अनेक ठिकाणच्या मूर्ति वर्षानुवर्षें लपविल्या गेल्याचेही दाखले आहेत. उदाहरणार्थ श्रीरंगम् येथील मूर्तीविषयीं प्रचलित असलेल्या दोन कथा साउथ इंडिया अँड हर मुहम्मदन इनव्हेडर्स या पुस्तकांत दिल्या असून एकींत तर श्रीरंगम्च्या मूर्तीनें सुमारें ६० वर्षें वनवासांत काढल्यावर तिची पुनः पूर्वीच्या ठिकाणीं स्थापना झाली असें सांगितलें आहे (पृ. ११२–११६, १५७–१६४). या वनवासाच्या कालांत

१ पंढरपूर संशोधन मंडळ–बडवे दप्तरांतील पांच कागद.

अतिशयोक्ति असण्याचा संभव आहे. पण परचक्राचे वेळीं सुरक्षिततेसाठीं अशा तऱ्हेनें मूर्ति हलविणें शक्य असतें.

५ अ. राज शक ३५ माघ वद्य ५, बुधवार (इ. १७०९ जानेवारी १९) या मितीस शाहू छत्रपतीनें दिलेल्या एका सनदेची नकल उपलब्ध आहे. तीवरून असें दिसतें कीं, छत्रपति राजारामानें श्रीविठ्ठलाचा अभिषेक, पूजा, नैवेद्य व दीपाराधना यांसाठीं आणि श्री. गोपाळ विठ्ठल बडवे यानें श्रीविठ्ठलाची पूजा सांग करावी म्हणून प्रत्येकीं १८० पादशाही होनांचें वर्षासन दिलें होतें. त्याविषयीं राजारामाचें पत्र आणून दाखविल्यामुळें शाहूनेंही प्रस्तुत सनद करून दिली.[1]

६. श. १६३३ खर संवत्सर आश्विन वद्य १०, फसली ११२१ रमजान २१ (२३) (=इ. १७११ आक्टोबर २५) या दिवशींचा एक कौलनामा (अभयपत्र) आहे. हा बहुधा पंढरपुरावर अमल चालविणाऱ्या मुसलमान अधिकाऱ्यानें दिला असावा. त्या वेळीं पंढरपूर कासेगांव परगण्यांत मोडत असल्यामुळें त्या परगण्याच्या देशमूखदेशपांड्यांनीं त्या अमलदारास विनंति केली कीं, श्रीस (विठ्ठलास) सिंहासनीं बैसवावा, मोहछाव राहिला आहे, पूर्वीप्रमाणें चालविलें पाहिजे. त्यावरून अमलदारानें अभय दिलें कीं, तुम्ही देव सिंहासनीं बैसवून मोहोछाव करणें, पूर्वींप्रमाणें चालवूं. संशय धरूं नये. हें अभयपत्र मिळालें तरी आणखी चार वर्षेपर्यंत विठ्ठल देवाची सिंहासनावर स्थापना होऊन महोत्सव सुरू झाला नाहीं असें दिसतें. कारण फसली ११२५, रमजान २५ (श. १६३७ भाद्रपद वद्य १२, इ. १७१५ सप्टेंबर १३) या दिवशीं पंढरपूरच्या बडव्यांच्या विनंतीवरून पूर्वीप्रमाणें देव देवळांत बसवून व देवाची सेवा करून सुखें असणें अशा अर्थाचें अभयपत्र पुनः दिलें आहे. या दोन्ही पत्रांवरून येवढें दिसतें कीं, औरंगजेबासारख्या धर्मवेड्या मुसलमान बादशाहाच्या दक्षिणेंत स्वाऱ्या चालू झाल्यावर त्याच्या तडाक्यांत उत्सव तर राहूं द्याच, पण देवाची मूर्तीही सुरक्षित राहणें अशक्य असें वाटून बडव्यांनीं तेव्हां मूर्ति जी एकदां लपविली ती

१ पंढरपूर संशोधन मंडळ—श्री. विश्वनाथ गोपाळ बडवे कागद.

औरंगजेब मेल्यावर चार वर्षांनीं मूर्तिस्थापनेविषयीं अभयपत्र मिळालें तरीही मुसलमान अधिकाऱ्याच्या आश्वासनावर विश्वास ठेवणें योग्य नाहीं असें वाटून निदान आणखी चार वर्षें तरी मूर्तीची पंढरपुरास पुनः स्थापना करण्याचें धैर्य बडव्यांस झालें नाहीं.[1]

७. सु. ११४५ जिल्हेज १७ (श. १६६६ पौष वद्य ४, इ. १७४५ जानेवारी १०) या तारखेस पेशव्यांनीं पंढरपूरचे रामचंद्र हरीस पत्रानें कळविलें आहे कीं, तेथील मागें ऐवज तुम्हाकडे जमा जाला आहे तो व पुढें जमा होईल तो व डांगे, बेणारे, बडवे यांची हरकी-गुन्हेगारी येईल तो ऐवज खर्च करून चंद्रभागेचा घाट उतम बांधणें.[2]

८. विठोबाविषयीं आणखी एक गमतीची नोंद आढळली आहे. दासोजी पवार यानें पंढरपुराहून येऊन पेशव्यांस सांगितलें कीं, काशीपंत धरणकरी यासाठीं पुण्याहून पेशव्यांकडून पंचवीस मोहरा घेऊन ये असें विठोबानें मला स्वप्नांत सांगितल्यामुळें मी येथें आलों आहे. त्यावरून बाळाजी बाजीरावानें सु. ११५० सवाल २७ (श. १६७१ भाद्रपद वद्य १४, इ. १७४९ सप्टेंबर २९) रोजीं पंढरपूरचा कमाविसदार रामचंद्र कृष्ण यास पत्र घालून कळविलें कीं, तुम्हांस स्वप्न पडल्यास काशीपंतास पंचवीस मोहरा द्याव्या.[3]

९. इ. १७५१ मध्यें मे महिन्याच्या अखेरी अखेरीस पंढरपुरांत बडवे मंडळींचें इतरांशीं किंवा आपसांत भांडण उत्पन्न होऊन एका पक्षानें छत्रपति रामराजाकडे किंवा अधिक बरोबर म्हणजे ताराबाईकडे धाव घेतली. तेव्हां तिनें पंढरपूरच्या देवळांत व्यवस्थेसाठीं स्वतःचे कारकून व हुजरे बसविले. म्हणून दुसऱ्या पक्षानें बहुधा पेशव्यांकडे धाव घेतली. तेव्हां त्यांनीं जानोजी निंबाळकराकरवीं हुजऱ्यांस हाकलून देऊन बडव्यांचा अमल चालू केला असें दिसतें.[4]

१०. महाराष्ट्रांत मराठी अमल सुरू झाल्यावर विठ्ठलाचा वनवास संपून व त्याची पुनः स्थापना होऊन पूजा-अर्चा सुरू झाली. पण सु. ११५४ जिल्काद १६ (श. १६७५ भाद्रपद वद्य २, इ.

१ बडवे प्रकाशित कागद क्र. २ व ३. २ बाबापेरो २।१२५. ३ बाबापेरो २।२०२. ४ पेशवे दप्तर २३।४४, ४५.

१७५३ सप्टेंबर १४)चें बाळाजी बाजीरावानें परशुराम रामचंद्राचे तर्फेनें पंढरपुरास असलेला कमाविसदार रामचंद्र कृष्ण यास धाडलेलें पत्र उपलब्ध आहे. त्यावरून दिसतें कीं, बडवे देवापुढील उत्पन्न घेत, त्यांत अलंकार व वस्त्रें आलीं तर तीं देवास न देतां त्यांचा स्वत:च उपभोग घेत किंवा विकत. यामुळें सरकारी कारकून देवालयावर नेमिला आणि देवाच्या उत्पन्नाची नोंद करून त्यापैकीं देवाचें कोणतें व बडव्यांचें कोणतें हें ठरवून द्यावें लागलें. पुढें बडव्यांनीं सरकारी आज्ञेप्रमाणें चालण्याचें कबूल केल्यामुळें देवालयांतील नोंद व वाटणी करणारा कारकून उठविण्यांत आला. फक्त देखरेख करणारा कारकून ठेवला. बडव्यांनीं कबूल केलें तें असें—(१) श्रीपुढें पाचशें रुपयांपर्यंत रोख येईल त्यांतून प्रथम पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणें देवाचे उपचार करूं आणि राहील तें न्यायत: वाटून घेऊं. (२) एकदम एकाकडूनच पांचशेंहून अधिक रुपये आल्यास ते देवाचे अलंकार व इतर साहित्य यासाठीं खर्चूं. (३) वस्त्रें येतील त्यांपैकीं उंचीं देवाचीं व सामान्य बडव्यांचीं. (४) अलंकारांपैकीं देवास उपयोगी पडण्यासारखे असतील ते देवाचे (इतर बडव्यांचे कीं काय?). (५) वाहनें वगैरे वस्तू देवाच्या.[१]

१०अ. सु. ११७० साबान १३ (श. १६९१ मार्गशीर्ष शुद्ध १४, इ. १७६९ नोव्हेंबर १२)चा व थोरल्या माधवरावाच्या शिक्कामोर्तबाचा एक जाबता आहे. त्यांत पंढरीनाथाचें दर्शन व त्याची पूजा करणें यांविषयीं पुढील चार कलमें दिलीं आहेत. १ श्रीदेवाची पूजा–अभिषेक करणें तो ब्राह्मण व सेणवी याणी करावा. २ परभू, वैश्य, शूद्र, याणी पायास हात लावून नमस्कार करावा, पाणी घालणें, पूजा करणे ब्राह्मणाकडून करवावी. ३ बायकांनीं देवाचें मस्तकीं पाणी घालूं नये; ब्राह्मण बायकांनीं पाणी घालणें तर पायावर मात्र घालावें. ४ चांभार, परीट, बुरूड, तेली, मुसलमान व महार वगैरे यांस नगारखान्याचे दरवाज्यांत जाऊं देऊं नये.[२]

---

१ बडवे प्रकाशित कागद, क्र ४. २ पंढरपूर संशोधन मंडळ–बाबूराव बडवे कागद.

११. सु. ११७१ रजब ९ (श. १६९२ कार्तिक शुद्ध १०, इ. १७७० आक्टोबर २९) चा एक उल्लेख आहे. यांत थोरल्या माधवरावानें पंढरपूरचा कमाविसदार नारो महादेव दिम्मत परशुराम रामचंद्र यास क्षेत्र मजकुरीं शिल्लक असेल तीमधून ३।४ हजार रुपये खर्च करून पंढरपुरास एक सरकारवाडा बांधण्याबद्दल सांगितलें आहे.[१]

१२. सु. ११७४ सफर १८ (श. १६९६ अधिक वैशाख वद्य ५, इ. १७७४ एप्रिल ३०) च्या एका निर्देशांत विठोबाविषयीं मजेदार माहिती आली आहे. त्या सालीं विठोबाचे अंगास पालीचा व सरडयाचा स्पर्श झाला. तत्कालीन समजुतीप्रमाणें ही गोष्ट अशुभ ठरली. तेथील ब्राह्मणांनीं व इतरांनीं देवास महारुद्र, शांति व सहस्र ब्राह्मणभोजन हे उपाय अरिष्टनिरसनार्थ सुचविले. ते करण्याबद्दल पेशव्यांनीं ४०० रुपये मंजूर केले.[२]

१३. पंढरपूर हें यात्रेचें ठिकाण असल्यामुळें तेथें चोरांचा उपद्रव असावा हें अगदीं साहजिक आहे. अशा प्रकारचा उपद्रव बंद व्हावा म्हणून सु. ११७५ जखर २८ (श. १६९६ श्रावण वद्य १४, इ. १७७४ सप्टेंबर ५) या दिवशीं पेशव्यांनीं तेथील कमाविसदार चिंतो रामचंद्र (हा परशुराम रामचंद्र पटवर्धन यांच्यातर्फे तेथें होता) यास २५ सनदी प्यादे ठेवावयाची आज्ञा केली आहे.[३]

१४. बडवे व डांगे यांच्या भांडणासंबंधीं एक महत्त्वाचा निर्देश उपलब्ध आहे. हा सु. ११८१ रजब २१ (श. १७०२ आषाढ वद्य ८, इ. १७८० जुलै २४) चा असून यांत बडवे व डांगे यांमध्यें देवाच्या दाराची किल्ली कोणापाशीं असावी असा वाद निघाला असतां त्याचा निकाल बडव्यांच्या बाजूनें दिला आहे. हा निकाल देतांना प्रथम पंढरपूरचा पेशवाई अमलापूर्वीचा आणि पांढरे मोकाशी याजतर्फे काम करणारा अधिकारी रामराव यानें याच बडवेडांग्यांमध्यें हेंच भांडण पूर्वी एकदां लागलें असतां किंवा लावलें असतां दोघांकडूनही पैसे खाऊन बडव्यांच्या बाजूनें निकाल कसा दिला यासंबंधीं मजेदार हकीकत दिली आहे आणि नंतर बडवे,

१ माबपेरो २।२७७. २ समापेरो ३।२५५. ३ समापेरो ३।१३२.

पुजारी, बेणारी, डिंगरे, परिचारक, हरिदास, दिवटे (व त्यांच्या हिश्श्शांत डांगे) यांपैकीं प्रत्येकानें कोणतीं कामें करावयाचीं याचा तपशील दिला आहे. यांत 'भक्त जें देईल तें संतोषें वाटून घ्यावें देवाजवळ गलबल करूं नये' असें सांगितलें आहे तें सर्वच क्षेत्रोपाध्यायांनीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.[1]

१५. सु. ११८४ जवल ५ (श. १७०६ चैत्र शुद्ध ६, इ. १७८४ मार्च २७) चा एक मोठा महत्त्वाचा निर्देश आहे. हा निर्देश म्हणजे पंढरपूर येथील कमाविसदार चिंतो रामचंद्र यास पाठविलेली सात कलमी याद आहे. पहिल्या कलमानें भक्तास देवाला भेटण्याची बंदी केली असून सिंहासनावर मस्तक ठेवून नमस्कार करण्यास सांगितलें आहे. दुसऱ्या कलमांत देवापुढील तिसऱ्या मंडपांत उत्तरेच्या बाजूस बुजविलेलें दार होतें तेथील हनुमंताची मूर्ति काढून थोर भोकाची जाळी बसविण्यास सांगितलें आहे. त्यायोगें पुष्कळ उजेड व वारा येईल असेंही म्हटलें आहे. तिसऱ्या कलमांत आषाढी व कार्तिकी या यात्रांत दाटी होऊन माणसें दुखवूं नयेत म्हणून दर्शनेच्छूंनीं पूर्वद्वारानें देवालयांत जावें व दक्षिणद्वारानें बाहेर पडावें असा निर्बंध घातला आहे. चौथ्या कलमांत गाभाऱ्यापुढील दुसऱ्या मंडपाचे दारापाशीं बाहेरच्या फरशीपेक्षां आंतील फरशी सखल असल्यानें अंधारांत माणसें पडतात तरी दोन्ही बाजूंची फरशी सारखी उंच करण्यास सांगितली आहे. पांचव्या कलमांत देवापुढील दुसऱ्या मंडपांत अंधार पडत असल्यानें चोऱ्या होतात म्हणून मंडपाच्या छतास अर्धा गज औरस चौरस भोक पाडण्याची आज्ञा आहे. त्यांतच पावसाचा त्रास न होईल अशा तऱ्हेनें भोक पाडावें म्हणून सूचना आहे. सहाव्या कलमांत अतिशूद्रांनीं चोखा मेळ्याचे दगडाजवळ न येतां चोखामेळ्याचे दीपमाळेजवळ किंवा महारवाड्यांत एकाद्या स्थळीं पूजा करावी, देवळाजवळ कोणी आल्यास पारिपत्य करावें असा आदेश आहे. सातव्या कलमानें कोणाही मुसलमानानें नामदेव-

१ समावेरो ३।६४; वनिप ७४; बडवे प्रकाशित कागद क्र. ५ व ६; प्रत्येकांत तारीख व आशय यांत थोडा थोडा फरक आहे.

पायरीस स्पर्श करूं नये किंवा तीपुढें येऊं नये, आल्यास पारिपत्य करावें व गुन्हेगारी घ्यावी असा हुकूम दिला आहे.[१]

१६. सु. ११८८ जिल्काद २९ (श. १७०९ भाद्रपद शु. १, इ. १७८७ सप्टेंबर १२) चा पंढरपूरविषयीं एक उल्लेख आहे. यांत पेशव्यांनीं (सवाई माधवरावांनीं) चितो रामचंद्र दिमत परशुराम रामचंद्र यास हुकूम केला आहे कीं, गल्ल्यांमधून उष्ट्या पत्रावळी व केरकुश्चीत पडल्यामुळें करपात्री, संन्यासी, सोवळे ब्राह्मण, माधोकरी वगैरेस विटाळ होतो; तरी हलालखोराकडून गल्ल्या साफ करविणें व घर पाहून दरमहा एक दोन पैसेप्रमाणें हलालखोरास देत जाणें.[२]

१७. सवाई माधवरावाच्या कारकिर्दींत पंढरपूर येथील ताटे, थिटे व आराध्ये यांनीं बडव्यांच्या विरुद्ध तक्रार केली कीं, बडवे यांनीं विष्णुपदीं व वेणुनादीं गयाविधि श्राद्धें करण्याची नवीन रीत पाडली व राड खणण्याचा व होळीच्या पूजेचा हक्क अनुक्रमें महारांचा व आमचा असतां बडवेच दोन्ही गोष्टी करतात. यावर सु. ११८९ जवल २५ (श. १७१० माघ वद्य १२, इ. १७८९ फेब्रुवारी २१) ला श्राद्ध करण्याची रीत, होळीची राड महाराकडून घेणें आणि पूजा करणें याबद्दल कोणीहि आग्रह धरूं नये असा हुकूम सुटला आहे.[३]

१८. सु. ११९१ सफर २४, फ. १२०० (श. १७१२ आश्विन वद्य १०, इ. १७९० नोव्हेंबर २) या दिवशीं पंढरपूरचा कमाविसदार चितो रामचंद्र यास सवाई माधवरावानें पाठविलेलें एक आज्ञापत्र उपलब्ध आहे. त्यांत बडवे व सेवाधारी यांमधील भांडणाचा पुढीलप्रमाणें निर्गम केला आहे. (१) सेवाधारी यांनीं पूजा करणारास आडवूं नये. देवालयांत किंवा बाहेर त्यांना पाहिजे तेथें त्यास मागावें. तो संतोषें देईल तें घ्यावें. बडव्यांनीं त्यांस अडथळा करूं नये. (२) बडव्यांनीं यजमानाशीं पूजेच्या बाबतींत करार करूं नये. तो स्वसंतोषें सांगेल त्याप्रमाणें पूजासाहित्य करून द्यावें. (३)

---

१ समापेरो ३।२७६. २ कित्ता ३।१८. ३ कित्ता ३।२८४.

बडवे व सेवाधारी यांमधील पैशाचें भांडण सरकारी कारकुनाचे मध्यस्थीनें तोडावें. (४) उभयतांच्या वृत्ति ज्याची त्यास द्यावी.[१]

१९. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दींत सु. ११९८ जिल्काद २४ (श. १७२० वैशाख वद्य ११, इ. १७९८ मे ११) च्या सुमारास पंढरपूरच्या बडव्यांनीं तक्रार केली कीं, ताटे, थिटे व आराध्ये यांनीं वेणुनादी, विष्णुपदादि स्थानीं श्राद्धें करण्याची रीत असतां भलतेंच सांगून ती रीत बंद पाडली आहे; तरी पूर्वींप्रमाणें त्या त्या स्थानीं श्राद्धादि कर्में करण्याची मोकळीक मिळावी. यावर दुसऱ्या बाजीरावानें बडव्यांना अनुकूल असा निकाल दिल्याची माहिती मिळते.[२]

२०. सु. १२३८ रमजान ८ (श.१७५९ मार्गशीर्ष शुद्ध १०, इ. १८३७ डिसेंबर ७)चें व सातारच्या महाराजांनीं काढलेलें एक आज्ञापत्र आहे. त्यावरून असें दिसतें कीं, कार्तिक वद्य ४ चे दिवशीं प्रक्षाळ पूजेचे वेळीं नेहमींप्रमाणें बडवे अभिषेकपात्र धरण्यास गेले असतां पुजारी व सेवाधारी यांनीं दंगामस्ती केली व अभिषेकांत व्यत्यय आणिला. तसेंच कार्तिक वद्य ५ मीस धूपार्तीच्या वेळीं पुजारी व बेणारे यांनीं असाच व्यत्यय आणिला. तेव्हां चौकशी होऊन तींत बडवे खरे ठरले आणि पुजारी व बेणारी इत्यादि सेवाधारी यांस अडथळा न आणण्याबद्दल ताकीद करण्यांत आली.[३]

२१. सु. १२३८ जिल्हेज १० (श. १७५९ फाल्गुन शुद्ध १२, इ. १८३८ मार्च ७) या दिवशीं सातारच्या महाराजांनीं पुनः एक आज्ञापत्र दिलें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, उपर्युक्त तंट्याच्या निमित्तानें मागील कागदपत्र पाहून बडवे, पुजारी व सेवाधारी यांचीं कामें, मिळकत व हक्क यांविषयीं एक विस्तृत निर्णय देण्यांत आला.[४]

---

१ बडवे प्रकाशित कागद क्र. ७. २ बारपेरो २५८.

३ बडवे प्रकाशित कागद क्र. ८, १०; दहाव्याची तारीख सु. १२३८ जिल्हेज ८, श. १७५९ फाल्गुन शुद्ध १०, इ. १८३८ मार्च ५ ही आहे.

४ बडवे प्रकाशित कागद क्र. ९

२२. पुणें येथील एलिएनेशन ऑफिसमध्यें पंढरपुरासंबंधीं माहिती देणारे कांहीं रुमाल आहेत. त्यांतील बरेच कागद गांवच्या सामान्य हिशेबाविषयीं असले तरी कांहींत देवस्थानासंबंधींही उल्लेख आहेत. अशा कागदांत ताळेबंद सर्वांत महत्त्वाचे आहेत. त्यांतील कित्येक महत्त्वाच्या नोंदी येथें देतों. एका ताळेबंदांत देवस्थान-खर्च ६०४॥। रु. दाखविला आहे. देवाच्या नित्यनैमित्तिक पूजे-साठीं जे पदार्थ वापरीत त्यांपैकीं कांहीं असे-पंचामृतास दूध रोज दोन शेर; साखर दरमहा १ रु.; चंदन दरमहा २ शेर; केशर दरमहा ५ तोळे; कस्तुरी दरमहा ४ मासे; श्रावण मासांत कुंदाचे फुलांची लक्ष पूजा; दक्षणा दररोज ६ रुके=बारमाही ४५ टके; विडयाचें सामान दरमहा ८१२; अभिषेकास दरमहा ७रुपये; आषाढी-कार्तिकी गोपाळकाल्यास खारीकखोबरें प्रत्येकीं कच्चे तीन मण; नैवेद्यास तांदूळ पाऊण शेर, कणीक सवा शेर, तुरीची डाळ अर्धा शेर, तूप पाव-शेर, गूळ पावशेर, हिंगजिरेंमिरें दरमहा पाऊण रुपया, कढीस दूध अर्धा शेर; नंदादीपास रोज तेल कच्चे पांच शेर; खटपटचा ब्राह्मण एक आषाढी व कार्तिकी एकादशीस थोडा अधिक पण दोन्ही वेळीं सारखाच खर्च होई. या वेळीं देवास नवीन वस्त्रें घेत. दसऱ्याला विशेष पोषाख असे. आषाढी व कार्तिकी अशा दोन्ही यात्रांत मिळून देवस्थानास ४००० रुपये उत्पन्न येई. आषाढीपेक्षां कार्तिकी यात्रा मोठी असे. यात्रेच्या व इतर वेळीं पंढरपुरास सुमारें ५० शिपाई ठेवावे लागत. यवनांनीं कसेंही व केव्हांही आणि इतरांनीं जोडे घालून देवळांत जाऊं नये म्हणून २ माणसें ठेवलेलीं आढळतात. देवाचा पुजारी ब्राह्मण दर महिन्यास बदले. देवळासमोरचा नदीचा वाळवंट झाडण्यास व उन्हाळयांत त्यावर पाणी शिंपण्यास आणि देऊळ झाडण्यास एक किंवा अधिक माणसें ठेवलीं होतीं. देवस्थाना-पैकीं एक लोटी विकली असतां आलेले पैसे सरकारी ताळेबंदांत दाखल केले आहेत. वडवे, उत्पात वगैरेस वर्षासनें होतीं असें दिसतें. विठोबास तुळशीफुलांचा बाग होता. त्याच्या व्यवस्थेसाठीं ३०० रुपये खर्च पडलेला आहे.

३. मध्ययुगीन व प्राचीन उल्लेख

१. मध्य व प्राचीन अशा दोन्ही कालखंडांत पंढरपुरास विठ्ठल देवस्थानाचें अस्तित्व होतें याविषयीं मनांत शंका येत नाहीं. पण निर्णीतकालिक ग्रंथ आणि ताम्रशिलाशासनें यांच्या साह्यानें या देवस्थानाचें अस्तित्व कोठवर मागें नेतां येतें हा महत्त्वाचा मुद्दा असून त्याचा निर्णय करण्यासाठीं अशा प्रकारचे मिळतील तेवढे सर्व निर्देश एकत्र करणें आवश्यक आहे. तेव्हां मला या कालखंडांत पडणारे निर्देश आढळले ते सर्व उलटचा कालानुक्रमानें येथें देतों.

२. बंगालमधील प्रसिद्ध द्वैतवादी वैष्णव महासाधु चैतन्य अथवा गौरांगप्रभु यानें श.१४३२ (इ. १५१०–११) मध्यें दक्षिणेंतील तीर्थांच्या यात्रा केल्या होत्या. त्यांचें वर्णन इ. १५१७ ते १६१७ च्या दरम्यान होऊन गेलेल्या कृष्णदास कविराज नांवाच्या त्याच्या भक्तकवीनें आपल्या चैतन्यचरितामृत नांवाच्या ग्रंथांत केलें आहे. त्यांत त्यानें चैतन्य कोल्हापुराहून पंढरपूरला आला असतां काय झालें तें वर्णिलें आहे तें असें–

तथा होइते पाण्डूपुर आइला गौरचंद्र । विठ्ठल ठाकूर देखि पाइल आनंद ॥
प्रेमावेशे कैल प्रभु नर्तन कीर्तन । प्रभुप्रेमे देखि सबार चमत्कार मन ॥
(मध्यलीला ९ वा परिच्छेद)

याचें सार असें–पंढरपुरांत विठ्ठलास पाहून चैतन्य आनंदला आणि त्यानें प्रेमभरानें विठ्ठलापुढें कीर्तन व नर्तन केलें. तें प्रेम पाहून सर्व लोक चकित झाले. हें खरें असेल तर चैतन्य वरील सालांत पंढरपुरास आला होता असें ठरतें.[१]

३. शामजी गोसावी वांजरखेडे नांवाच्या एका कवीनें आपला अकरावा पूर्वज चांगा मुधेश याचें एक सात अध्यायी अभंगात्मक चरित्र लिहिलें असून तें श. १६६७ क्रोधन संवत्सर आश्विन शुद्ध १० मीस संपविलें. त्यांत चांगा मुधेश श. १४२७ क्रोधन संवत्सर ज्येष्ठ शुद्ध ७ रविवार (इ.१५०५ मे १०–११) पुष्य नक्षत्र

१ युगवाणी वर्ष ७, अंक ४, पृष्ठ १४५.

सिद्धि योग अशा समयीं समाधिस्थ झाला म्हणून सांगितलें आहे. हा चांगा मुधेश द्वारकेच्या तीर्थयात्रेहून आपल्या नारायणडोह या गांवीं परतला तेव्हां त्यास समजलें तें असें–

बेदरीचा राजा बमणी पातशहा । ब्राह्मणासी बहू छळियेले ॥ ५२ ॥
हिंदुधर्म जितुके तितुके वर्जियेले । राउळ विध्वंसिलें पंढरीचें ॥ ५३ ॥
केलीसे मशीद महाद्वार मोडून । सात मास पूर्ण झाले यासी ॥ ५४ ॥
मूर्ति सिंहासनाहूनि आच्छादिली । गुप्त हो ठेविली बडव्यांनीं ॥ ५५ ॥
. . . .
पुरातन स्थळ आमुचें पंढरपूर । मोडूनि महाद्वार मशीद केलें ॥ ९३ ॥

हें ऐकल्यावर त्यास वाटलें काय तर–

मोडून मशीद देऊळ स्थापावें । पहिलें होतें बरवें जैसें तैसें ॥ ९४ ॥

या इच्छेप्रमाणें त्यानें विठ्ठलाचें देऊळ अंशतः उभें केलें असावें असें कोणा अनामकानें केलेल्या पुढील श्लोकावरून वाटतें.

चांगदेवेति विख्यातगोदातीरत्तिवासिना ।
श्रीमद्विठ्ठलनाथस्य नेमं देवालयं कृतम् ॥

ग्रंथलेखक आपल्या हयातीच्या सुमारें २५० वर्षांपूर्वीं घडलेली हकीकत सांगत असला तरी तींत अशक्य व असंभाव्य असें कांहीं नाहीं. महाद्वार सोडल्यास सध्याच्या देवळाचा कोणताही भाग सोळाव्या शतकापूर्वींचा असेल असें वाटत नाहीं. महाद्वार व सध्याचें देऊळ यांत सर्वशः विसंवाद आहे. श. १४०० च्या सुमारास बहमनी पादशाहीस उतरती कळा लागली असली तरी ती व तीपासून फुटून पाहणाऱ्या शाहचा यांना धार्मिक कडवेपणाच्या लहरी वारंवार येत नसतील असें समजण्याचें कारण नाहीं. मशीद उभारल्यावर ती पाडून देऊळ उभें करणें श. १४ ते १७ या शतकांत अशक्यच होतें. तेव्हां या हकीकतींतील तात्पर्य मला दिसतें तें असें–मुसलमान मूर्ति-मंदिरभंजनासाठीं आले असतां बडव्यांनीं मूर्ति लपविल्यामुळें त्यांस देऊळ सुनेंच आढळलें. म्हणून त्यांनीं देवळाचा विध्वंस केला; पण मशीद उभारण्याचा हट्ट धरला नाहीं. यामुळें पुढें चांगदेवास देवालयाची अंशतः उभारणी करणें शक्य झालें. येथें चांगा मुधेशाच्या

समाधिकालाचा तपशील ज्योतिर्गणितानें जुळत नाहीं एवढें लक्षांत ठेविलें पाहिजे.[१]

४. श. १४१२–३० (इ.१४९०–१५०८) या दरम्यान अहमदनगरच्या निजामशाहीमध्यें दलपतिराज नांवाचा एक अर्थमंत्री होऊन गेला. त्यानें नृसिंहप्रसाद नांवाचा एक धर्मशास्त्रावर ग्रंथ रचला होता. त्याच्या तीर्थसार नांवाच्या भागांत पुंडरीक व पुंडरीक क्षेत्र याविषयीं माहिती आली आहे. या माहितीपैकीं कांहीं अंश कूर्म व स्कंद या दोन पुराणांतून उद्धृत केला आहे, तर कांहीं दलपतिराजानें स्वतःच रचिला असावा अशी शंका येते. हीमधील बराचसा भाग अर्थवादात्मक व नैमित्तिक धर्मकृत्यविषयक आहे. शिवाय तीर्थसार हा भाग एकाच हस्तलिखित प्रतीवरून छापण्यांत आला असल्यानें त्यांत विलक्षण अशुद्धेंही आहेत. यामुळें अनेक ठिकाणीं ग्रंथकारास निश्चित काय सांगावयाचें आहे तें नीट समजत नाहीं. तथापि मला त्या माहितीचें सार काढतां आलें तें असें–प्रथम पुंडरीक क्षेत्राचें हें भैमीच्या दक्षिण (उजव्या) तीरावरआहे, यापासून एक योजनावर धर्मरी(वी)रा नदी भैमीस मिळते आणि येथें मूर्तिमान पांडुरंग राहतो असें वर्णन केलें आहे. अशा या पवित्र क्षेत्रांत पुंडरीक नांवाचा मनुष्य पुष्करिणीच्या तीरावर आश्रम बांधून आईबापांची सेवा व तप करीत रहात होता. त्याच्या पितृसेवेनें संतुष्ट होऊन वर देण्यासाठीं गोपीजनप्रिय (कृष्ण) तेथें आला. तो हातांत गवळ्याची काठी, मनगटांवर कंकणें (कडीं), कानांत मकरकुंडलें, डोक्यास शिक्याची दोरी, ललाटावर डोळा, छातीवर श्रीवत्स, नग्न पण कटिसूत्रयुक्त, खोळ घेतलेला असा होता. हें रूप पाहून पुंडरीकास अत्यंत आनंद झाला. तेव्हां पांडुरंग हसून तुझ्या पितृसेवेनें संतुष्ट होऊन वर देण्यासाठीं आलों आहे असें म्हणाला. त्यावर त्यानें कृष्णाची स्तुति केली व म्हणाला, 'आपण मजवर प्रसन्न झाला असाल तर याच स्वरूपांत आपण येथें रहा आणि हें क्षेत्र माझ्या नांवानेंच प्रसिद्ध होवो. तेव्हां तसें होईल, भैमी हें क्षेत्र भिजवील

१ महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग जुनी आवृत्ति पृ. १६८–१७७, उपर्युक्त चरित्र अध्याय ७, ग्रंथमाला अंक ११४, पृ. १–५.

आणि मी गुप्त अथवा प्रकट रूपानें येथें राहीन, असें हरि त्यास म्हणाला. येवढ्या कथेनंतर तेथील पवित्र स्थानें व देवता यांचें वर्णन आलें आहे तें असें–देवाच्या पुढें क्षेत्रपाल अर्थात् भैरव, पूर्वद्वारीं ब्रह्मपत्नी (सरस्वती), दक्षिणद्वारीं सिद्धेश्वर (नारद ?), पश्चिमद्वारीं परमेश्वरी (श्री), उत्तरद्वारीं दुर्गा, देवाच्या पश्चिम भागीं पद्मतीर्थ व तेथें अश्वत्थरूपी दोन देव, देवाच्या ईशान्येस १०० हातांवर कुंडलतीर्थ व तेथें अश्वत्थरूप नरहरि, तेथून तीस हात पलीकडे पुण्यावती नदी, देवाच्या पश्चिम भागीं पांच हातांवर युवती (रेवती = माता) नांवाच्या देवी, त्यांचेंच नांव मुक्तकेशी, त्या नग्न आहेत, त्या क्षेत्राच्या ईशान्येस अजून हिंडतात; नंतर नरसिंह तीर्थ, तेथील नरसिंहास ३२ हात आहेत, तीर्थाचा विस्तार ३० धनुष्यें; नंतर ७७ हात विस्ताराचें अगस्त्य तीर्थ, तेथें लिंगमूर्ति; त्याच्या पूर्वेस गणपति तीर्थ; त्याच्या पूर्वेस संकर्षण तीर्थ; त्याच्या पूर्वेस जाबालि तीर्थ; त्याच्यानंतर १०० हात विस्ताराचें ब्रह्मतीर्थ; तदनंतर १००० हात विस्ताराचें कलशतीर्थ, तेथें अमृता नांवाची देवी; त्याच्या दक्षिणेस सात हात विस्ताराचें पितृतीर्थ; तदनंतर शंख, चक्र, पद्म व कौमुदी (कौमोदकी ?) हीं तीर्थें; त्यांच्या दक्षिणेस दहा हात विस्ताराचें पौंडरीक तीर्थ; त्याच्या दक्षिणेस मुक्तक तीर्थ, तेथें पुण्यावती नदी आहे, तेथें संगम दैत्याचा वध करून त्यावर दोन श्रीपदांची स्थापना, त्यास संगमतीर्थ हेंही नांव; त्याच्या पूर्वेस सोमतीर्थ; त्याच्या पूर्वेस सरस्वती तीर्थ; पूर्वद्वारीं अश्वरूपधारी विष्णु.

४ अ. तीर्थसाराचें सार वर दिलें त्यांत कित्येक गोष्टी लक्ष्य आहेत. पुंडरीकानें भिरकाविलेल्या विटेची कथा येथें नाहीं, देवास गोपीजनप्रिय, हरि, पांडुरंग असें संबोधिलें असून त्याचें रूप नग्न गोपालाचें होतें, देवालयास चार दिशांस चार दरवाजे होते, त्या प्रत्येकांत एक एक देवता होती, पूर्वद्वारीं एक घोडा होता, देवालयांत दोन पिंपळ होते, देवालयांत व क्षेत्रांत भैरव, सिद्धेश्वर, ३२ हाती नरसिंह हे देव व सरस्वती, श्री, दुर्गा, अमृता, युवती (रेवती = माता?) या देवी होत्या, पद्म, कुंडल, नरसिंह, अगस्त्य, गणपति, संकर्षण, जाबालि, ब्रह्म, कलश, पितृ, शंख, चक्र, पद्म, कौमुदी (कौमोदकी),

पौंडरीक, मुक्तक, श्रीपदद्वय किंवा संगम, सोम, सरस्वती हीं तीर्थें होतीं आणि धर्मरी(वी)रा व पुण्यावती या दोन नद्या होत्या. उपर्युक्त देवदेवी व तीर्थें यांपैकीं आज कोणकोणतीं ओळखूं येतात हें पहाणें मनोरंजक असलें तरी तें स्थानिक मनुष्यच करूं शकेल. पण या वर्णनावर कांहीं आक्षेपही घेतां येतील. यांत पुराणांचा अंश किती व ग्रंथकाराचें चक्षुर्वै सत्यं वर्णन किती आहे? कृष्णाच्या अर्थात् विठ्ठलाच्या कपाळावर तिसरा डोळा असल्याची माहिती कितपत खरी मानावयाची? निरनिराळ्या तीर्थांच्या विस्ताराचें मोजमाप दिलें आहे; मग प्रत्यक्ष विठ्ठलाच्या देवालयाचें कां नसावें? मोजमाप नाहीं ना? नसूं द्या! पण विठ्ठलाच्या देवालयाची नीट कल्पना येईल असें वर्णन तरी कां नसावें? अशा अनेक प्रश्नांची सोडवणूक तीर्थसारांतील वर्णनावरून होत नसल्यानें त्याचा पाहिजे तसा उपयोग करतां येत नाहीं.[1]

५. इ. १५८० च्या सुमारास होऊन गेलेल्या हरिभट्ट नांवाच्या तेलुगु कवीनें नारसिंहपुराणमु नांवाचा ग्रंथ केला आहे. यांत याचा आश्रयदाता प्रोलुगंटि रंग प्रधानि याचा एक पूर्वज तिप्प हा विजयनगर सम्राट प्रौढराय किंवा दुसरा देवराय (श. १३४१–१३६८) याच्या वेळीं हयात असून त्यानें विजयनगरास विठ्ठलपतीसाठीं एक भोगमंडप बांधला अशी माहिती मिळते. ही माहिती खरी असेल तर कृष्णदेवरायापूर्वीं निदान १०० वर्षें विजयनगरास विठ्ठलाची स्थापना होऊन त्याचें निदान गाभारा व भोगमंडप अशा दोन भागांचें देऊळ तयार झालें असलें पाहिजे हें उघड होतें. तेथें इतक्या लवकर विठ्ठलाचें देऊळ तयार झालें असेल असें मला वाटत नाहीं. तथापि मिळाला तो पुरावा नमूद करून ठेविला आहे.[2]

६. पंढरपुरास विठोबाच्या देवळाबाहेर चोखा मेळ्याच्या समाधीपाशीं एक शिलालेख आहे. ह्याचें वाचन कै. वि. का. राज-

१ सरस्वती भवन टेक्स्ट्स् क्र. ६२, तीर्थसार पृ. ७–२१, बनारस, १९३६.

२ जर्नल ऑफ दि मिथिक सोसायटी व्हॉ. ३१, क्र. २, पृ. १, २.

वाडे यांनीं ग्रंथमालेंत प्रसिद्ध केलें आहे.[१] या लेखाचा काल शक १२३३ विरोधकृत् संवत्सर (इ. १३११) हा आहे. म्हणजे हा लेख मुसलमानांचें राज्य येथें सुरू होण्याचे पूर्वींचा आहे. यांत पंढरपुरास 'पंडरिपुर' व विठोबास विठ्ठल किंवा विठल अशा दोन्ही तऱ्हांनीं संबोधिलें आहे. हा लेख मराठी आहे हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे.

७. याच सुमारास एक कानडी कवि होऊन गेला. त्याचें नांव चौंडरस. याचा काल निश्चित झालेला नाहीं. पण यानें श. ११८० (इ. १२५८) मध्यें विद्यमान असलेल्या एका कवीचा उल्लेख केला असल्यामुळें याचा काल त्यानंतर व शक १२२५ (इ. १३०३)चा सुमार असा धरला आहे. यानें 'अभिनवदशकुमारचरिते' या नांवाचा एक ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथाच्या प्रत्येक आश्वासाच्या शेवटीं 'निखिलबुधजनमनोवनजवनदिवाकरकिरणप्रतिमप्रसन्नश्रीमदभंगविठ्ठलपदांभोजमत्तमधुकर . . . चौंडराजविरचित . . .' इत्यादि मजकूर आहे. तसेंच ग्रंथाच्या आरंभीं प्रथम पंढरीराय अभंगविठ्ठलाची आणि नंतर लक्ष्मी, ईश्वर, पार्वती, इत्यादींची स्तुति केली आहे. एवढेंच नव्हे तर याच्या चौदाव्या आश्वासांत पंढरपूर, तेथील विठ्ठलाचें देऊळ व त्यांतील गरुड, गणपति, क्षेत्रपाल, रुक्मिणी आणि विठ्ठल यांचें अनुक्रमें वर्णन करून कथानायकाच्या तोंडांत एक विठ्ठलस्तुतिपर अष्टक घातलें आहे. हा कवि स्वतःस अनेक ठिकाणीं 'विठ्ठलपदांभोजातभृंग' असेंही म्हणवितो. या सर्व गोष्टींवरून श्री. आर. नरसिंहाचार्य यांनीं असा तर्क केला आहे कीं, हा पंढरपूर येथील रहाणारा तरी असला पाहिजे किंवा विठ्ठल हें याचें कुलदैवत तरी असलें पाहिजे.[२] यानें अभिनवदशकुमारचरितांत[३] विठ्ठलाचें वर्णन केलें आहे तें असें--

> **वरमकुटं, मुगुळ्नगे, तुळुंकुव मुद्दुमोगं, जगन्मनो**
> **हरकरकुंडलं, पेगलकल्लि लसत्पदकं, नितंबदोळ्**

---

१ वर्ष १२ अंक ३. २ कर्नाटक कविचरिते १। ४०३, ४०४. ३ अदचची म्हैसूरच्या स्टार प्रेसची इ. स. १९०४ ची आवृत्ति, १९८-१९९

स्थिरमेनलिट्ट हस्तयुगळं, पोसगोवळगोळ् निलीनस
च्चरणसरोरुहं, मेरेव चेन्निग विट्ठलरायनोप्पिदं ॥ १९ ॥
नवमेघच्छवि मेय्गे, मंदहसितं वक्त्रक्के, शंखं नवी
नवेनल् वामकरक्के, सत्कटिगे सत्पाणिद्वयं, पादप
ल्लवयुग्मक्के नेगळ्तेयिट्टगे लसत्सौंदर्यभाग्यं, सम
स्तविशेषं, समुदायशोभे येसेयल्कंदोप्पिदं विट्ठलं ॥ २० ॥

याचा सारांश असा– चांगला मुकुट, स्मित हास्य, तेजस्वी मुख, मनोहर कुंडलें, खांद्यावर तळपणारीं पदकें, नितंबावर स्थिर ठेवलेले हात, नवीन गोपाळाची काठी, ?, नवीन मेघाप्रमाणें अंगावर कांति, डाव्या हातांत शंख, विटेवर पाय, इत्यादि प्रकारांनीं शोभणारा विठ्ठल प्रकाशत आहे. विठोबाचें हें वर्णन अपुरें असलें तरी चौंडरसानें दर्शन घेतलेल्या देवांचा जो क्रम दिला आहे तो महत्त्वाचा आहे.

८. हेमाद्रीचा चतुर्वर्गचिंतामणि या नांवाचा एक ग्रंथ आहे. या ग्रंथाचा तीर्थखंड नांवाचा एक भाग आहे. त्यांत पुढील श्लोक आढळतात– ‘ भैम्याश्चैव तटे देवि दक्षिणे तीर्थमुत्तमं । अस्ति क्षेत्रं दैवतं च सर्वोत्कृष्टं सुदुर्लभम् । पौण्डरीकमिति ख्यातं तत्तीर्थं क्षेत्रपूजितः । पांडुरंगश्च तत्रास्ते मूर्तिमान् देवतोत्तमः । ’ या चरणांत पंढरपूरचें पौण्डरीक असें व विठोबाचें पांडुरंग असें नांव आलें आहे. हेमाद्रीचा काल शकाच्या बाराव्या शतकाचें चवथें आणि तेराव्या शतकाचें पहिलें पावकें असल्यामुळें या ५० वर्षांच्या काळांत हा उल्लेख पडतो हें उघड आहे.[1]

१ सुमारें पाऊणशें–शंभर वर्षांपूर्वी गोपाळाचार्य नांवाच्या कोणी वैष्णवानें विठ्ठलभूषण नांवाचें एक प्रकरण रचलें आहे. त्यांत विठोबाविषयीं निरनिराळ्या पुराणांतून आलेले उल्लेख देऊन त्याचें प्राचीनत्व ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. पुराणांतील कोणते भाग प्रक्षिप्त व कोणते मूळचे हें ठरविणें अतिशय कठीण असतें. तेव्हां ते उल्लेख अजिबात विचारांत न घेणें जास्त चांगलें. तथापि हेमाद्रीचा म्हणून दिलेला उतारा–त्याचा काळ निश्चित असल्यामुळें–येथें घेतला आहे. वरील प्रकरणाचें हस्तलिखित मला श्री. बा. मा. खुपेरकर शास्त्री यांच्या कृपेनें मिळालें.

९. या पूर्वीचा लेख म्हणजे प्रसिद्ध चौऱ्यायशीचा शिलालेख होय. हाही कै. राजवाडे यांनीं ग्रंथमालेंत छापला आहे.[१] या लेखाची भाषा मराठी असून देवास दिलेल्या देणग्यांचा तपशीलच मुख्यतः यांत दिला आहे. या लेखांत कालाचे उल्लेख एकापेक्षां अधिक असले तरी सर्वांत जुना उल्लेख श. ११९५ श्रीमुख संवत्सर (१२७३ इ.) हा आहे. यामध्यें पंढरपुरास फागनिपूर (ओ. ३) आणि विठोबास विठ्ठल किंवा विठल अशा दोन्ही पद्धतींनीं संबोधिलें आहे.

१०. याच्या पूर्वीचा लेख म्हणजे ज्यामध्यें आप्तोर्याम इष्टीचा निर्देश आला आहे तो होय. याचा उल्लेख कै. डॉ. रा. गो. भांडारकर यांनीं आपल्या 'शैविझम, वैष्णविझम एट्सेट्रा' या निबंधांत केला आहे. याचा काल श. ११९२ (इ. १२७०) असून भाषा संस्कृत आहे. हा लेख मूळ स्वरूपांत उपलब्ध नाहीं; पण डॉ. भांडारकर यांच्या लिहिण्यावरून ह्यांत पंढरपुरास पांडुरंगपूर असें संबोधिलें आहे असें दिसतें.[२]

११. याहून जुना उल्लेख एका ताम्रपटांत आला आहे. हा ताम्रपट बेळगांवपासून १०–११ मैलांवर असलेल्या बेंडिगेरी किंवा बेंडिगेरे या गांवीं सांपडला असून कै. डॉ. काशिनाथ बापूजी पाठक यांनीं इंडियन अँटिक्वेरीमध्यें प्रसिद्ध केला आहे.[३] याचा काल शक ११७१ सौम्य नाम संवत्सर (इ. १२४९) हा असून भाषा संस्कृत आहे. यांत पंढरपुरास 'पौंडरीक क्षेत्र' व विठोबास 'विष्णु' असें म्हटलें आहे.

१२. याहून जुना असा उल्लेख पंढरपुरास असलेल्या शिलालेखांत आहे. महाद्वार ओलांडून पत्र्याच्या मंडपांतून वर आलें

---

१ वर्ष १२ अंक १. २ हा लेख, मजजवळचा ठसा व आर्किऑलॉजी खात्यांतील ठसा अशा दोहोंच्या साहाय्यानें, मी वाचण्याचा प्रयत्न केला; पण त्याचें समाधानकारक वाचन करणें माझ्या शक्तीच्या बाहेरचें आहे असें मला आढळून आलें. यांत पांडुरंग हा शब्द व विठ्ठल हें देवनाम आलें आहे येवढें मात्र खरें. ३ खंड १४।६८–७५

असतां सोळाखांबी मंडपाच्या पुढें जो दक्षिणोत्तर लांबीचा सोपा लागतो त्याच्या मधल्या खणाच्या (सोळाखांबी मंडपाच्या पूर्वद्वारासमोरील) तुळईवर हा लेख खोदला आहे. ह्याचा दगड केवळ शिलालेखाकरितां तयार केलेला नसावा; कारण यास तुळईचा आकार दिलेला आहे. असें वाटतें कीं, हा पूर्वी एखाद्या देवळाच्या कामीं उपयोगांत आणलेला दगड असावा व तो तसा असतांनाच त्यावर लेख खोदला गेला. पुढें मूळ देऊळ पडल्यामुळें म्हणा किंवा पाडलें गेल्यामुळें म्हणा या दगडाचें मूळ स्थान सुटून हल्लीं तो तुळईच्या ठिकाणीं बसला आहे. ही पडापडी किंवा पाडापाडी मुसलमानी अमलांत झाली असणें शक्य आहे. सोप्याचें बांधकामही मुसलमानपूर्वकालीन दिसत नाहीं. पण तें कसेंही असो. या तुळईच्या तिन्ही बाजूंवर लेख खोदला आहे. अशा प्रकारें तिन्ही बाजूंवर खोदलेले अनेक लेख सांपडतात; पण या लेखाचा विशेष हा आहे कीं, याची लिपि अथपासून इतिपर्यंत देवनागरी असून भाषा मात्र संस्कृत व कानडी अशी दुहेरी आहे. या लेखांत आरंभीं होयसळ यादवांपैकीं वीर सोमेश्वर याची स्तुति असून पुढें त्यानें विठ्ठलदेवाचे अंगभोग व रंगभोग यांसाठीं आसंदि नाडामधील हिरिय गरंज हें गांव दान केल्याचें सांगितलें आहे. मला बरेच दिवस हें गांव कोठें असावें याविषयीं सांगतां येत नव्हतें. पण म्हैसूर संस्थानांतील लेखांचीं पुस्तकें चाळींत असतां कांहीं ठिकाणीं आसंदि ५०० या नांवाच्या देशाचा उल्लेख आढळला.[१] त्यावरून देशाची निश्चिति झाली. पुढें म्हैसूरच्या आर्किऑलॉजी खात्याचे डायरेक्टर कै. डॉ. कृष्ण यांस वरील देश व त्यांतील गांव याविषयीं विचारतां त्यांचें उत्तर आलें कीं, कडूर जिल्ह्यांतील कडूर तालुक्यापैकीं हिरेनल्लूर होबळी (ग्रामसंघ) मध्यें आसंदि नांवाचें गांव असून याच तालुक्याच्या येगटि होबळीमध्यें हिरे गरजी नांवाचें एक खेडें आहे.[२] कानडी भागांतही प्रथम याच वीर सोमेश्वराची स्तुति असून नंतर विठोबाच्या

१ एपि. कर्ना. व्हॉ. ६ कडूर तालुका नं. ९; व्हॉ. ५ अरसीकेरे तालुका नं. ३२, १२४. २ ता. ८–८–३३ चें पत्र; अक्षांश १३।३६, रेखांश ७६।७.

षोडशोपचारपूजेपैकीं कांहीं उपचारांसाठीं दानें केल्याचें वर्णन आहे. यांत कालाचे उल्लेख जरी पांच आहेत तरी अगदीं प्राचीन निर्देश शक ११५९ (चालू) दुर्मुख संवत्सर पौष वद्य ११ उत्तरायण संक्रांत (इ. १२३६, डिसेंबर २५) हा आहे. यांत पंढरपुरास पंडरगे (संस्कृत भाग) व पंडरगे किंवा पंडरंगे? (कानडी भाग) अशा दोन प्रकारांनीं संबोधिलें आहे. यांपैकीं पडरंगे यांतील रं विषयीं शंका आहे; कारण तें अक्षर फुटून गेलें आहे. 'प'वर मात्र स्पष्ट अनुस्वार आहे. विठोबाला कानडी भागांत विठ्ठल व संस्कृत भागांत विठल असें संबोधिलें आहे. शिवाय पुंडलीकाचा पुंडरीक मुनि म्हणून उल्लेख करण्यांत आला आहे.[१]

१३. हा लेख अजून कोठेंही प्रसिद्ध झाला नसल्यानें मला लागलेल्या भागापैकीं कारणापुरता उतारा पुढें देतों.[२]

पूर्व बाजू : स्वस्ति समस्तभुवनाश्रयपृथ्वीवल्लभमहाराजाधिराजपरमेश्वर द्वारावतीपुरवराधीश्वर यादवकुलांबरद्युमणि सर्वराजचूडामणि . . . शनिवारसिद्धि गिरिदुर्गमल्लं चलदंकराम वैरीभकंठीरव मकरराज्यनिर्म्मूलन चोलराज्यप्रतिष्ठार्य निःस्संकप्रतापचक्रवर्ति होय्सलमहाराज . . . वीर सोमेश्वरदेवरसर सकवर्श ११५९ नेय दुर्म्मुखिसंवत्सरद पुष्य बहुल एकादसि उत्तरायणसंक्रांतियलु पं[ड]रगेय श्रीविठ्ठलदेवरिगे अंगभोगरंगभोगक्कोस्कर आसंदिनाड अग्रहारं हिरियगरजे . . . .

पश्चिम बाजू : भीमरथीनदीतीरसंनिविष्टपंडरगनामानं महा-

---

१ या लेखाचें विस्तृत वर्णन देण्याचें कारण याचा सोलापूर गॅझेटियरांत कांहींसा चुकीचा सारांश दिला असून त्यात लेख कोणत्या भाषेंत आहे हें सांगितलेलें नाहीं. तसेंच लेख अगदीं खराब झाला आहे असा कांहींसा अतिशयोक्तीचा शेरा मारल्यामुळें त्याच्याकडे गेल्या ६५ वर्षांत कोणीच लक्ष दिलें नाहीं. याच्या वर्णनानें लोकांचें लक्ष त्याजकडे जाईल अशी आशा आहे. २ मजजवळच्या छापावरून हें वाचन केलें व आर्किऑलॉजी खात्याच्या वेस्टर्न सर्कलच्या संग्रहांतील ठशाचें साहाय्य घेण्याचा प्रयत्न केला. त्या-बद्दल त्या खात्याचा मी आभारी आहे.

ग्राममधिवसते पुंडरीकमुनिमनःकुमुदविकाससुधाकराय भगवते स्रीविठलदेवाय हिरियगरंजसंज्ञकमहाग्रहार . . . .

१४. या उताऱ्याचा विचार केला तर माझे मित्र डॉ. सालेतूर यांनीं 'पंढरपूरचें प्राचीनत्व'[1] या लेखांत वीर सोमेश्वर हा होयसळ सोमेश्वर हें ठरविण्याचा जो प्रयत्न केला आहे तो कांहींसा अनवश्यक होता असें वाटतें. कारण एक तर या लेखांत होय्सल हें कुलनाम स्पष्ट आलें असल्यानें शिलालेख ठशांच्या साहाय्यानें ते वाचून पाहते तर वरील गोष्ट त्यांच्या सहज लक्षात येती. शिवाय हा वीर सोमेश्वर देवगिरी यादवांपैकीं नसून होयसळांपैकीं आहे असें डॉ. कृष्णस्वामी अय्यंगार यांनीं मागेंच नमूद केलें आहे.[2]

१५. याही पूर्वीचा एक उल्लेख म्हैसूर सरकारच्या १९२९ सालच्या आर्किऑलॉजी खात्याच्या रिपोर्टांत आला आहे.[3] ज्या ताम्रपटांत हा उल्लेख आहे तो कोल्हापूरचे प्रो. कुंदणगार यांस मिळाला व पुढें म्हैसूर संस्थानच्या वरील खात्याकडे गेला; त्या खात्यानें तो प्रतिमा, वाचन, भाषांतर व चर्चा यांसह वरील रिपोर्टांत प्रसिद्ध केला. या ताम्रपटांत राष्ट्रकूट अविधेय यानें जयद्विठ्ठ नांवाच्या ब्राह्मणास महादेवाच्या डोंगराच्या पूर्वेस असलेल्या अनेवरी,चाळ,कन्दक व दुद्दपल्ली या गावांसह पाण्डरङ्गपल्ली हें गांव दान केलें आहे. हेंच दान ९ व्या शतकांतील राष्ट्रकूट शर्वरस अथवा पहिला अमोघवर्ष यानें कायम केलें आहे. या ताम्रपटाचा काळ इ. स. ५१६ नोव्हेंबरचा मध्य (श. ४३८) असावा असें संपादकांनीं ठरविलें आहे. तसेंच अनेवरी, चाळ, कन्दक व पाण्डरङ्गपल्ली हीं गांवें म्हणजे हल्लींचीं अनेवळी, चळें, कोंदर्की व पंढरपूर हीं गांवें असावीं असा संपादकांनीं तर्क केला आहे तोही बरोबर आहे. पण त्यांनीं महादेवाचा डोंगर कोणता याविषयीं समाधानकारक खुलासा केला नाहीं. वरील गांवांच्या

१ इंडियन हिस्टॉरिकल क्वॉर्टर्ली व्हॉ. ११।७६९–७७०. २ केंब्रिज हिस्ट्री ऑफ इंडिया ३।४८२. ३ पृ. १९८ व पुढें.

पश्चिमेस सुमारें २५–३० मैलांवर महादेवाचा डोंगर लागत असून त्यास पूर्वी व सध्याही महादेवाचा डोंगर असेंच म्हणत व म्हणतात. याच डोंगरावर शंभुमहादेव किंवा शिखरशिंगणापूरचें प्रसिद्ध दैवत आहे. यांत पंढरपुराचें पाण्डरङ्गपल्ली असें नांव आलें आहे तें महत्त्वाचें आहे. विठोबा किंवा पांडुरङ्ग या देवाचा जरी इतका जुना उल्लेख सांपडला नाहीं तरी त्याच्या पाण्डरङ्ग व विठ्ठल या नांवांचा पर्यायानें इतका जुना उल्लेख सांपडला हें विशेष आहे. जयद्विठ्ठ या नांवांत विठ्ठल या शब्दाचें मूळ सांपडतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. यांत लेखकाचा उल्लेख देवदत्तेन पंडराद्रिशेन असा आला असून त्यांतील दुसरा शब्द पंडराधीशेन वाचावा अशी दुरुस्ती संपादकांनीं सुचविली आहे. डॉ. सालेतूर यांनीं आपल्या उपर्युक्त लेखांत प्रस्तुत ताम्रपट व विठोबाच्या मूर्तीविषयीं गॅझेटियरमध्यें केलेलीं विधानें यांच्या आधारानें या देवस्थानाचें अस्तित्व इ. स. ४६० च्या सुमारास असलें पाहिजे असें ठरविण्याचा यत्न केला आहे. पण या विषयाचा ऊहापोह पुढें यावयाचा असल्यानें येथें त्यांचें मत फक्त नमूद करून ठेवतों.

१६. पद्मपुराणांतील सहाव्या अथवा उत्तरखंडांतील १७६ व्या म्हणजेच गीतेच्या सहाव्या अध्यायाच्या माहात्म्यांत पुढील कथा आली आहे. पैठणास जानश्रुति नांवाचा एक राजा होऊन गेला. त्यानें हंसाच्या तोंडून ब्रह्मवादी रैक्वाची महती ऐकल्यावर त्यानें त्याच्या शोधासाठीं आपला सारथी पाठविला. त्यानें कोल्हापुरादि अनेक क्षेत्रें धुंडल्यावर तो पंढरपुरास आला. त्याच्या पंढरपूर भेटीचा निर्देश आहे तो असा––

ततो (श्रीशैलात्) निवृत्त आयातः पश्यन्भीमरथीतटे ।
द्विभुजं विठ्ठलं विष्णुं भुक्तिमुक्तिप्रदायकम् ।।
(यत्र भीमरथीतीरे बिन्दुमाधवसञ्ज्ञितः ।
हरिः स वर्ततेऽद्यापि भुक्तिमुक्तिप्रदो नृणाम् ।।)

हा उल्लेख महत्त्वाचा असला तरी पद्मपुराणाचा काल निश्चित नाहीं आणि हे श्लोक प्रक्षिप्त नसतील अशी खात्री नाहीं. यामुळें पुराव्याच्या दृष्टीनें याचा नीट उपयोग करून घेतां येत नाहीं.

१७. तात्पर्य श. ११५९ च्या पूर्वींचा व पंढरपूरच्या विठोबाचा निश्चयानें उल्लेख करणारा शिलालेख किंवा ताम्रपट माझ्या माहितीप्रमाणें उपलब्ध नसला तरी विठ्ठल नांवानें प्रसिद्ध असलेल्या देवांचीं देवालयें व त्या देवाची भक्ति करणारे लोक होते असें दिसतें. कारण पंढरपूरशिवाय इतर गांवींही विठ्ठल असल्याचा पुरावा मिळतो. उदाहरणार्थ, शिमोगा जिल्ह्यापैकीं शिमोगा तालुक्यांतील सोगाने गांवामध्यें शंकराच्या देवळांत शक ११३५श्रीमुख संवत्सर माघ शुद्ध १५ चंद्रग्रहण (इ. स. १२१४ जानेवारी २७) या वेळचा एक लेख आहे. त्यांत वीर बल्लाळ या होयसळ राजानें केलेलीं दानें नमूद असून त्यांपैकीं एकांत त्या गांवांतील विठ्ठलेशास तीन निष्क भूमि दान केल्याचें सांगितलें आहे.[१] मात्र ११३४–३६ या तिन्ही सालांत माघ पौर्णिमेस चंद्रग्रहण नाहीं. दुसरें उदाहरण पाहिजे असल्यास तेंही या शिमोगा जिल्ह्यांतील सोरब तालुक्यापैकीं उंद्री येथील लेखाचें देतां येईल. हा लेख चालू शक ११४० ईश्वर संवत्सर (पौर्णिमांत) भाद्रपद वद्य ३० सूर्यग्रहण (इ. १२१७ आगस्ट ४) या वेळचा असून त्यांत सिंघण यादवाचा चाकर जो मायिदेव त्याचा हुकूम मानणारा दसवंत दण्णायक म्हणून एक अधिकारी आला आहे. त्याच्या प्रशस्तींत 'श्रीविठ्ठल देवदिव्यश्रीपादपद्माराधक' असे शब्द आहेत. यांतील विठ्ठल हा पंढरपूरचाच आहे असें समजण्यास आधार नाहीं. तेव्हां हा विठ्ठल कोणी सामान्य विष्णु नांवानें संबोधला जाणारा देवच असावा.[२]

१८. ज्याप्रमाणें विठ्ठल हें देवाचें नांव सामान्य अर्थानें प्रचारांत होतें त्याप्रमाणें पाण्डरङ्ग, पण्डरङ्ग व ह्याचे पर्याय मनुष्याचें व शंकराचें नांव म्हणून प्रचारांत असल्याचे दाखले सांपडतात. उदाहरणार्थ, मद्रास इलाख्याच्या 'नेल्लोर जिल्ह्यापैकीं उदयगिरि तालुक्यांत पाण्डरंग या नांवाचें गांव असून तेथील पाण्ड रंगेश्वर देवळांतील एका लेखांत पाण्डुरङ्गमुडय्य नायनार असा

---

१ विबुधैर्गीयमानस्य ग्रामदेवस्य चक्रिणः। त्रिनिष्कसंख्यका भूमि विठ्ठलेशस्य कल्पिता ॥ एपि. कर्ना. व्हॉ. ७ Sh ५४. २ एपि. कर्ना. व्हॉ. ८ Sb १३५

नामोल्लेख आहे व दुसऱ्यांत पाण्डरंगमुडय्य महादेव नांवाचे देवास श. १००० च्या सुमारास कांहीं जमीन दान केल्याचें सांगितलें आहे.[१] वेंगीच्या चालुक्यांपैकीं श. ७६६ ते ८१० पर्यंत राज्य करणारा जो गुणग तिसरा विजयादित्य त्याच्या प्रधानाचें नांव पाण्डरङ्ग अथवा पण्डरङ्ग असें होतें.[२] वेंगीचा दुसरा अम्मराज याच्या मलियपूण्डि ताम्रपटांत किरणपूर जाळणाऱ्या एका पाण्डरङ्गाचा उल्लेख आला आहे.[३]

१९. देशीनाममालेंत हेमचंद्रानें ज्यांची व्युत्पत्ति बरोबर सांगतां येत नाहीं पण जे एका विशिष्ट अर्थानें लोकांकडून उपयोगांत आणले जातात असे कांहीं शब्द दिले आहेत. त्यांत 'रुद्दम्मि पंडरंगो असें वचन आलें असून त्यावर टीका करतांना ' पंडरंगो रुद्रः ' असें म्हटलें आहे.[४] आणि पंढरपुरास अजूनही शंकराचें दर्शन घेतल्याशिवाय पांडुरंगाचें दर्शन घेत नाहींत अशी एक चाल आहे. या दोन गोष्टींच्या आधारावर कै. डॉ. रा. गो. भांडारकर यांनीं असा तर्क केला आहे कीं, पांडुरंगपूर हें नांव मूळच्या शिवाच्या देवालयावरून पडलें असावें; पण विठोबाचें माहात्म्य वाढूं लागलें तेव्हां विठोबासच पांडुरंग म्हणूं लागले.[५] येथें एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे कीं, भक्त ज्या शंकराचें दर्शन घेतल्याशिवाय विठोबाचें दर्शन घेत नाहींत तो शंकर म्हणजे पुंडलीकाच्या समाधीवरील शिवलिंग होय. पुंडलीकामुळें विठोबाचें पंढरपुरास येणें झालें अशी लोककथा आहे व तीस वर शिलालेखांतील जो उतारा दिला आहे त्याचा थोडासा आधारही दिसतो. अर्थात् त्यास भेटल्याशिवाय विठोबाचें दर्शन घेऊं नये असें भाविकांना वाटलें तर त्यांत नवल काय ? एवंच याबाबतींत तरी शंकराचा व विठोबाचा संबंध येत नाहीं हें उघड आहे.

---

१ इमप्रे पृ. ११५० व ११५१ आणि क्र. ७५६ व ७५९. येथें पांडुरङ्ग अथवा पाण्डरङ्ग हें नांव शिववाचक असल्याचें स्पष्टपणें दिसतें.

२ एपि. इंडि. ५।१२५ व १९।२७३.

३ एपि. इंडि. ९।४९.

४ देशीनाममाला—बाँबे संस्कृत सीरीज पृ. १८९, षष्ठ वर्ग श्लोक २३.

५ गव्हर्मेंट ओरिएंटल सीरीज(गओसी) क्लास बी, नं. ४, पृ.१२५.

२०. शकाच्या अकराव्या शतकांत झालेल्या बार्हस्पत्यसूत्रम् या ग्रंथांत आठ वैष्णव क्षेत्रें म्हणून बदरिका, सालग्राम, पुरुषोत्तम, द्वारका, बिल्वाचल, अनंत, सिंह व श्रीरंग हीं ग्रामनामें दिलीं आहेत.[1] यांत पंढरपूर, पांडुरंगपूर, पुंडरीकक्षेत्र इत्यादी नांवांशीं सदृश असें एकही नांव दिसत नाहीं. तेव्हां या ग्रंथाच्या कालीं पंढरपुरास विठ्ठल दैवत नव्हतें कीं काय अशी शंका येते.

---

४ देव व गांव यांचीं नांवें–चर्चा

१. वर जी हकीकत दिली आहे तीवरून कळून येईल कीं, पंढरपुरास पंढरपूर, पंढरी, पांडुरंगपुर, पंडरिपुर, फागनिपुर, पौंडरीक क्षेत्र, पंडरगे, पांडरंगपल्ली अशीं नांवें निरनिराळ्या वेळीं दिलेलीं दिसतात. या ८ नांवांपैकीं फागनिपुर हें नांव इतर नांवांशीं कांहीं एक संबंध नसलेलें दिसतें. पौंडरीक हें नांव पुंडरीक या नांवावरून बनलें हें उघड आहे. पंडरिपुर यांतील पंडरि या नांवापासून पंढरी हें नांव बनलें असलें पाहिजे. पंडरगे हें कानडी नांव आहे; याचें संस्कृत रूप पंडरिका होईल असें वाटतें. नेसरिका या नांवाचें जसें नेसरिआ >नेसरी हें हल्लीचें परिणत रूप, त्याप्रमाणें पंडरिका > पंडरिआ >पंडरी किंवा पंढरी असें रूप झालें असलें पाहिजे. अर्थात् पंडरिका किंवा पंडरगे यांपासून पंडरी किंवा पंढरी असा शब्द बनला व त्याला पुर हा नगरवाची शब्द लागून पंडरिपुर किंवा पंढरीपूर आणि पंढरपूर हे शब्द झाले. श्री. राजपुरोहित व कै. डॉ. रा. गो. भांडारकर यांनीं अनुक्रमें पुंडरीकपुर व पांडुरंगपुर या शब्दांपासून

---

१ पंजाब संस्कृत सीरीज बार्हस्पत्यसूत्रम् (नं. १) सूत्रें ११९ व १२०. या ग्रंथांत आलेल्या यादव (सूत्र १०५) शब्दावरून त्याचा काल इ. स. चें १२ वें शतक असावें असा संपादकांचा तर्क आहे (प्रस्ताव पृ. १७).

पंढरपूर हा शब्द व्युत्पादला आहे.[१] पण या दोन्ही शब्दांपेक्षां वरील पंडरिका किंवा पंडरगे हाच शब्द जास्त जवळचा आहे. यालाही आणखी उदाहरणें पाहिजे असल्यास नवसारी (नवसारिका), अवसारी (अवसारिका) यांचीं देतां येतील. देशीनाममालेंत शंकराला पंडरंग किंवा पंडुरंग असें नांव आलें आहे त्यावरून कै. डॉ. रा. गो. भांडारकरांनीं तर्क केला आहे कीं, पूर्वीं तेथें शंकराचें स्थान असावें. या तर्काला पुष्टी देऊन श्री. राजपुरोहित पुढें असें म्हणतात कीं, पंडुरंग या शिवनामावरून पंढरपुरास पांडुरंग हें नांव पडलें व तेथें स्थापन झालेल्या गांवावरून देवासही पांडुरंग असें नांव जडलें असावें. पण पंडरंग व पंडरगे या दोन शब्दांत जरी सादृश्य दिसत असलें तरी त्याला फारसें महत्त्व देतां येणार नाहीं. कारण (१) पंडरंग नांव असतां त्याचें पांडुरंग कां झालें हें दाखवितां येणार नाहीं व दाखवितां आलें तरी देवाचें नांव पांडुरंग व गांवाचें नांव मात्र पंढरी असा भेद कां पडावा याचा खुलासा करतां येणार नाहीं (२) शिवाय पंढरपुरास विठोबाच्या स्थापनेपूर्वीं शंकराचें महत्त्वाचें स्थान होतें या म्हणण्यास तर्काशिवाय दुसरा आधार दिसत नाहीं. तेव्हां पांडुरंग व पंढरी यांचा एकमेकांशीं कांहीं संबंध असेल असें वाटत नाहीं आणि पुंडरीक शब्दाचा अपभ्रंश पुंडलीक, कुंडलीक असा होत असल्यामुळें पुण्डरीकपुर याचा अपभ्रंश पुंडरीपूर, पुंडलपूर, कुंडलपूर असा कांहीं तरी व्हावा. तेव्हां पुंडरीकपुर या शब्दापासून पंढरपूर हा शब्द बनणें शक्य दिसत नाहीं.

२. आतां सर्वांत जुना पंढरपूरचा जो उल्लेख दिला आहे त्यांत पंढरपुराचें पांडरंगपल्ली असें नांव आलें आहे. याचा अर्थ पांडरंगाचें गांव असा होईल. येथें पांडरंग हा शब्द मनुष्यवाची आहे कीं देववाची आहे ? जशीं देवनामांवरून ग्रामनामें झालीं आहेत तशीं मनुष्याच्या नांवावरून ग्रामनामें साधलीं आहेत. आठव्यानवव्या शतकांत पंडरंग हें नांव मनुष्यांना ठेवलेलें आढळतें. तेव्हां वरील उल्लेखाचा कोणताही निश्चय करण्यास उपयोग होत नाहीं.

१ केसरी २१-७-१९१४; गओसी क्लास बी, नं. ४, पृ. १२५.

३. पंढरपूरच्या विठोबाला पंढरीराय, विठोबा, विठाई माउली, इत्यादि अनेक नांवांनीं निर्देशिलें असलें तरी त्या सर्वांमध्यें विठ्ठल हेंच नांव मुख्य आहे. या नांवाच्या व्युत्पत्तीविषयीं विठ्ठलभषण, शब्दरत्नाकर (आपटेकृत), पांगारकरांचें तुकारामचरित्र इत्यादि अनेक ग्रंथांतून जरी तर्क करण्यांत आले आहेत तरी त्यांपैकीं तीन तर्कच येथें नमूद करण्यासारखे आहेत.

४. कै. राजवाडे यांनीं सर्वोत्कृष्ट म्हणून पुढील व्युत्पत्ति दिली आहे. ते म्हणतात, विठ्ठल शब्द विष्ठल शब्दापासून व्युत्पादावा. विष्ठल म्हणजे दूर, एकीकडे, रानावनांत असलेली जागा, स्थळ व विठ्ठलदेव म्हणजे दूर, एकीकडे, रानावनांत असणारा देव. देव या उत्तरपदाचा लोप होऊन विठ्ठल असा नामनिर्देश प्रचलित झाला. इतिहास, दंतकथा व व्युत्पादनसौलभ्य या दृष्टींनीं ही व्युत्पत्ति ग्राह्य व विश्वासार्ह दिसते.[१]

५. दुसरी व्युत्पत्ति कै. डॉ. रा. गो. भांडारकरांनीं आपल्या उपर्युक्त निबंधांत दिली आहे. विष्णु याचा कानडी अपभ्रंश 'बिट्टि' होतो व या अपभ्रंशापासूनच विठ्ठल असें रूप तयार झालें आहे. याला उदाहरण म्हणून होयसळ यादवांपैकीं श. १०३९ ते १०५९ च्या दरम्यान झालेल्या विष्णुवर्धन नांवाच्या राजाचें सांगण्यांत येतें. या विष्णुवर्धनाची विष्णु, बिट्टिदेव, बिट्टिग अशीं आणखींही नांवें आहेत. नरसिंह, भद्रदेव, अरिकेसरिन् यांनाच कानडींत नरिग–नरग, बद्दिग, अरिग अशा प्रकारें संबोधिलेलें आढळतें. त्याप्रमाणेंच विष्णु किंवा विष्णुदेव यांपासून बिट्टिदेव किंवा बिट्टिग अशीं रूपें कानडी लोकांनीं बनविणें शक्य दिसतें.

६. मॉंसियर जे. झिलस्की यांनीं आर्किव्ह ओरिएंतालिनीच्या चौथ्या खंडाच्या दुसऱ्या अंकांत एक लेख लिहून त्यांत विष्णु या

१ भाइसंमंत्रै ७।२।९६. कै. राजवाडे यांनीं आपल्या वरील व्युत्पत्तीच्या समर्थनार्थ जेथें सध्या विठोबाचें देऊळ आहे, तेथें पूर्वीं बाभूळवन होतें, त्या बाभूळवनांत पुंडलिकानें देवाची स्थापना केली अशी हकीकत दिली आहे. ही हकीकत कोणत्या ग्रंथांत आहे हें त्यांनीं सांगितलेलें नाहीं.

देवतेस द्राविडी मूळ व ऑस्ट्रोएशियाटिक नांव सुचविलें आहे. ते म्हणतात—विष्णु हा शब्द व त्याचे पर्याय वेष्णु, वेठ, विठु, विठ यांमधून न-नु हा अनार्य (Non-Aryan) अंश व अ-उ हे प्रत्यय काढून टाकले तर खालीं विठ्, विष्, वेठ्, वेष् असे धातू (Root) शिल्लक राहतात. ऑस्ट्रोएशियाटिक भाषांत ष् व ठ् यांची अदलाबदल होते व त्यामुळेंच ठंत रूप तयार होतें. हीच अदलाबदल हिंदी भाषांतील अनार्य शब्दांत दिसून येते.[1]

७. सारांश, विठ्ठल हा शब्द विष्णु या शब्दाचा अपभ्रंश आहे हें आज सर्व विद्वानांस मान्य झालें आहे. पण हा अपभ्रंश प्राकृत भाषांमधील आहे कीं द्राविडी भाषांमधील आहे याविषयीं वाद असल्यामुळें त्या वादाच्या दोन्ही बाजू चांगल्या समजून घेणें अवश्य आहे. विष्णु या शब्दाचे अत्यंत जुनाट अपभ्रंश शिलालेखांतून सांपडतात ते असे—पुणें जिल्ह्यांतील भाजें गांवच्या एका लेखांत 'विण्हुदत' असें मनुष्यनाम आलें आहे. हा शब्द विष्णुदत्त या नांवाचा अपभ्रंश आहे हें उघड आहे.[2] बनवासी (कारवार) व मळवळ्ळि (शिकारपूर, शिमोगा, म्हैसूर) येथील लेखांत चुटु कुळांतील एका 'विण्हुकड' किंवा 'विण्हुकड्डु' नांवाच्या मनुष्याचा उल्लेख आला आहे.[3] विण्हुकड किंवा विण्हुकड्डु हा विष्णुस्कंद या शब्दाचा अपभ्रंश असावा अशी माझी कल्पना आहे. पण या शब्दांतील दुसऱ्या पदाविषयीं जरी खात्री देतां येत नसली तरी पहिलें पद विष्णु या शब्दाचा अपभ्रंश आहे यांत शंका नाहीं. नाशिक येथील दोन गुहालेखांत एका मनुष्याचें 'विण्णुपाल' किंवा 'विण्हुपालित' असें नांव आलें आहे.[4] हे शब्द विष्णुपाल किंवा विष्णुपालित या शब्दाचे अपभ्रंश आहेत हें कोणीही कबूल करील.

१ हा लेख बंगलोर येथील मिथिक सोसायटीचे त्रैमासिकाच्या रौप्यमहोत्सव अंकांत भाषांतररूपानें आला आहे. मी ऑस्ट्रोएशियाटिक भाषांचा अभ्यास केला नसल्यामुळें वरील विवेचनाविषयीं मत देऊं शकत नाहीं.

२ आसवेइ व्हॉ. ४ पृ. ८३ क्र. ७ ३ एपि. कर्ना. व्हॉ. ७ Sk २६३.

४ एपि. इंडि. व्हा. १० परिशिष्ट क्र. ११२४–५.

अमरावती येथील एका स्तूपांत एका स्त्रीचें ‘ वेन्हू ’ असें नांव आलें आहे.[१] हें नांव विष्णु या शब्दाचा अपभ्रंश आहे असें यादीकार प्रो. ल्यूडर्स यांचें मत आहे. कान्हेरी येथील गुहालेखांपैकीं दोहोंत एका व्यापाऱ्याचें वेण्हुनदि किंवा वेण्हुनंदि असें नांव आढळतें.[२] हें नांव ‘विष्णुनंदि’ या नांवाचा अपभ्रंश आहे असें मानण्यास विशेष प्रत्यवाय नाहीं. कुलाबा जिल्ह्यांतील कुडें येथील गुहालेखांत एका उपासिकेचें ‘वेण्हुया’ असें नांव आलें असून तो शब्द ‘विष्णुका’ शब्दाचा अपभ्रंश असावा असें यादीकारांनीं दाखविलें आहे.[३] वर दिलेल्या उदाहरणांवरून असें दिसून येईल कीं, शिलालेखांतील प्राकृतांत विष्णु शब्दाचे विष्णु, विण्हु, वेन्हू, वेण्हु अशा प्रकारचे अपभ्रंश झालेले आढळतात. पण यावरून प्राकृत किंवा अपभ्रष्ट भाषांत विष्णु या शब्दाचे फक्त वर दिलेलेच अपभ्रंश होतात असा कोणी तर्क करील तर तो चुकीचा ठरण्यासारखा पुरावा उपलब्ध आहे. इ. स. पू. ३७५ नंतर झालेल्या महापरिनिब्बाणसुत्तामध्यें बुद्ध निर्वाणाला गेल्यावर त्याच्या शरीराच्या अवशेषांवर कोणी कोणी स्तूप उभारले हें दिलें आहे. त्या यादींत वेठदीप या गांवच्या किंवा देशच्या एका ब्राह्मणाचा उल्लेख आला आहे.[४] या ब्राह्मणानें वरील ठिकाणीं स्तूप केल्याचें सांगितलें आहे. महापरिनिब्बाणसुत्ताच्या एका पाठाच्या तिबेटी भाषांतरांत या शब्दाऐवजीं ‘ विष्णूचा देश ’ अशा अर्थी एक शब्द वापरला आहे.[५] तसेंच कासिया (गोरखपूर) गांवाजवळच असलेल्या बौद्ध क्षेत्रांत इ. स. ४०० च्या सुमाराची एक मृण्मुद्रा मिळाली असून तीवर ‘ श्रीविष्णुद्वीपविहारे भिक्षुसंघस्य ’ असा लेख कोरला आहे.[६] यावरून वेठदीप हा विष्णुद्वीप शब्दाचा अपभ्रंश आहे असेंच मानण्याकडे प्रवृत्ति होते. अर्थात् विष्णूचें वेठ असें रूप झालें हें कबूल करावें लागेल. यांतील द्वीप शब्दाविषयीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. पण विष्णु शब्दापासून वेठ शब्द बनण्याचा क्रम माझ्या मतें

१ कित्ता क्र. १२१६. २ कित्ता क्र. १००१–२. ३ कित्ता क्र. १०६०.
४ जर्नल ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी इ. १९०६ पृ. ६६५
५ कित्ता पृ. ९०० ६ कित्ता इ. १९०७ पृ. १०५०.

विष्णु >विठ्ठ >वेठ असा लागतो. हल्लींच्या बंगालीमध्यें मोठमोठे पंडितही विष्णु या शब्दाचा विश्टु असा, वैष्णव शब्दाचा बोइश्टोम् असा किंवा कृष्ण या शब्दाचा किश्टो असा उच्चार करतात.[१] शतपथ ब्राह्मणांतही दोन ठिकाणीं 'वैष्टपुरेय' असा शब्द आला असून तेथें तो शब्द विष्णुपुर या शब्दापासून झालेला आहे असें समजतात. तसेंच मघाशीं उल्लेखिलेल्या ताम्रपटांत जयद्विठ्ठ असें जें नांव आलें आहे त्यापैकीं विठ्ठ हें विष्णु शब्दाचें प्राकृत रूप आहे असें त्याच पुस्तकांत दिलें आहे. म्हणजे त्या पुस्तकाचे संपादक डॉ. कृष्ण यांच्या मतें तो विष्णु या शब्दाचा प्राकृत अपभ्रंश आहे.

८. उलट कानडी ताम्रशिलालेखांत अनेक ठिकाणीं विट्ट, विट्टरस बिट्टरस अशा प्रकारचीं नांवें येत असून तीं नांवें विष्णु या नांवाचे अपभ्रंश आहेत हें त्याच पुरुषांचीं संस्कृत नांवें पाहिलीं असतां सहज ध्यानांत येतें. उदाहरणार्थ होयसळ यादवांपैकीं ज्यास बिट्टिग, बिट्टिदेव वगैरे नांवांनीं संबोधिलें आहे त्यासच विष्णुवर्धन या नांवानेंही उल्लेखिलें आहे.[२] इ. स. ६१६ च्या सातारा ताम्रपटाच्या मुद्रेवर बिट्टरस असा शब्द असून त्या बिट्टरसाचें इतरत्र विष्णुवर्धन असेंही नांव आढळतें.[३] येवढेंच नव्हे तर श्री. राजपुरोहित यांनीं शब्दमणिदर्पणाच्या अपभ्रंश प्रकरणांतील ३२ व्या सूत्राच्या आधारानें विष्णूचें विट्टु असें रूप बनवितां येतें असें सांगून त्यास प्रेमार्थी ल प्रत्यय लागून विठ्ठल हें रूप तयार होतें असें एके ठिकाणीं प्रतिपादिलें आहे.[४] पण हें प्रतिपादन तितकें सयुक्तिक नाहीं असें मला वाटतें. ज्या सूत्राच्या आधारानें श्री. राजपुरोहित वरील प्रतिपादन करतात त्याचे दोन भाग आहेत. पैकीं पहिल्या भागांत ध बद्दल ज व ड हे आदेश होतात असें सांगितलें आहे; पण त्याशीं आपणास कर्तव्य नाहीं. त्याच सूत्राचा दुसरा भाग 'षत्वक्के डत्वटत्वं, द्वित्वदिनक्कुं; टकारमोर्मद्वित्वं' असा आहे. यावरील वृत्ति 'आ योगवाहद षत्वक्के द्वित्वद डकारमुं टकारमुमक्कुं; द्वित्वरहितमप्प टत्वमोर्मेयक्कुं' अशी आहे. हिचा अर्थ अर्थात् सूत्राचा

१ कित्ता पृ. १६४. २ बॉंबे गॅझेटियर व्हा. १ भाग २ पृ. ४९४.
३ इंडि. अँटि. ११।२१०. ४ केसरी २१।७।१९१४.

अर्थ असा आहे कीं, संयुक्त व्यंजनांतील षकाराबद्दल द्वित्त ड व द्वित्त ट व एकेरी टकार होतो. कोणत्या शब्दांना तर संस्कृत शब्दांना व केव्हां तर कानडींत येतांना. या सूत्रावर उदाहरणें म्हणून जीं दिलीं आहेत त्यांत विष्णु हा शब्द नाहीं येवढेंच नव्हे तर शेवटीं षण असलेला असाहि शब्द दिलेला नाहीं. यावरून असें वाटतें कीं, विष्णूचें विट्ट रूप करतांना या सूत्राचा आधार घेतां येणार नाहीं.[1] असें असलें तरी कानडीमध्यें विष्णु व कृष्ण या शब्दांचीं बिष्टो, किष्टो, बिष्टप्प, किष्टप्प हीं रूपें सर्रास तोंडीं व लेखीं प्रचारांत असून शिष्टसंमत झालीं आहेत. मात्र बंगालींतही थोड्या फरकानें असेच उच्चार होतात हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

९. अशा प्रकारें विष्णु या शब्दाचें विट्ट–विठ्ठ हें रूप कानडीच्या अपभ्रंशनियमाप्रमाणें बनवितां येत नाहीं व यामुळेंच तें प्राकृत रूप आहे असें धरण्याकडे प्रवृत्ति झाली आहे. आतां विठ्ठ या शब्दापासून विठ्ठल शब्द प्रेमार्थी ल हा प्रत्यय लावून किंवा आणखी एका पद्धतीनें बनवितां येईल. ती रीत अशी–कानडीमध्यें अर् किंवा अरु असा बहुवचनी प्रथमेचा प्रत्यय आहे. तो विठ्ठ या शब्दास जोडतांच विठ्ठर् किंवा विठ्ठरु असें रूप तयार होईल व त्याचें सुलभीकरण विठ्ठल किंवा विठ्ठलु असें होईल. हल्लींहि नरसिंहाचार्यर् किंवा नरसिंहाचार्यरु अशा दोन्ही तऱ्हेचा प्रयोग करतात. येवढेंच नव्हे तर रायरु, रायलु, रायल्, पंतलु वगैरे प्रयोग सध्या व ऐतिहासिक कालांत केलेले आढळतात. अर्थात् विठ्ठल किंवा विठ्ठलु हें मानार्थी बहुवचन आहे असें ठरेल. पण मराठी साधुसंतांनीं विठ्ठलाच्या बाबतींत एकवचनीं प्रयोग वापरला आहे हें नाकारून चालणार नाहीं.

१०. हें झालें विठ्ठलाच्या व्युत्पत्तीविषयीं. रखुमाबाई किंवा रखुमाई हा शब्द कसा तयार झाला आहे याविषयीं मात्र कोणाच्या मनांत शंका आली नसेल. बहुतेक रखमा व रुक्मिणी हे शब्द एकच आहेत असें समजतात. मी या शब्दाची निराळी व्युत्पत्ति देऊं इच्छितों.

---

१ केशिराजकृत शब्दमणिदर्पण पृ. २७४ सूत्र २८३; प्रकाशक कर्नाटक साहित्य परिषद् बेंगळूरु इ. स. १९२०.

मुसलमानपूर्वकालीन इतिहासांत लक्ष्मादेवी किंवा लकुमादेवी अशीं राण्यांचीं नांवें येतात. उदाहरणार्थ उपर्युक्त विष्णुवर्धनाच्या एका बायकोचें नांव लक्ष्मादेवी किंवा लकुमादेवी असें होतें.[१] लक्ष्मा किंवा लकुमा या शब्दापासून रख्मा किंवा रखुमा हा शब्द बनलेला असावा. दुसरे एके ठिकाणीं एका पुरुषाचीं नांवें लक्ष्म, लक्ष्मीधर किंवा लक्ष्मीदेव अशीं आलीं आहेत.[२] यावरून लक्ष्मा किंवा लकुमा हा शब्द लक्ष्मीवाचक आहे हें जास्त स्पष्ट होतें. विष्णु-लक्ष्मी हा जोडशब्द वारंवार देवतांच्या नांवांत ऐकूं येतो. पण विष्णु-रुक्मिणी हा शब्द वापरलेला माझ्या ऐकिवांत नाहीं. विष्णुरुक्मिणीचें देऊळ कोणाच्या पाहण्यांत असल्यास कळवावें.

---

५ विठ्ठलस्वरूप

१. पांडुरंग, पंढरी व विठ्ठल यांच्याविषयीं येथवर विवेचन केल्यानंतर विठ्ठलाच्या स्वरूपाविषयीं विवेचन करणें जरूर आहे. मुसलमानी अमदानींत अलाउद्दीन बहमनी, अफजलखान, औरंगजेब इत्यादींनीं धर्मवेडाच्या लहरींत अनेक ठिकाणचीं देवळें पाडलीं व मूर्ति फोडल्या. त्या वेळीं महाराष्ट्रांतील प्रसिद्ध देवस्थानांना झळ लागली नसेल असें म्हणवत नाहीं. जुन्या कागदांतून अफजलखानानें तुळजापूरची देवी, पंढरपूरचा विठोबा इत्यादींना तसवीस दिल्याचे उल्लेख प्रत्यक्ष आढळतात.[३] तेव्हां बहुतेक पवित्र क्षेत्रांतील जुन्या मूर्ति भग्न झाल्या असल्या पाहिजेत आणि भग्न मूर्ति अपूज्य ठरल्यामुळें त्यांचे जागीं नवीन मूर्तींची स्थापना झाली असली पाहिजे असा सहज तर्क होतो. हा तर्क विठोबाच्या बाबतींत खरा ठरतो कीं खोटा हें आपणांस पाहणें आहे. तें पाहतांना प्रथम आपण सध्याची मूर्ति कशी आहे हें समजावून घेण्याचा यत्न करूं.

२. हल्लीं विठ्ठल किंवा विठोबा म्हणून ज्या मूर्तीची पूजा होते ती

---

१ बॉंबे गॅझेटियर व्हॉ. १ भाग २ पृ. ४९४. २ कित्ता पृ. ५०६.

३ शिचसा १।४७; रा. २० पृ. २३२.

सोळा वर्षांपूर्वी मी स्वत: पहाटे पांचचे सुमारास तिची पूजा चालू असतां सुमारें अर्धा तास व दुपारीं कपडे बदलतांना सुमारें पंधरा मिनिटें जितकी निरखून पाहतां येणें शक्य तितकी पाहिली. पहाटेच्या वेळीं दिवे व आरती यांचा उजेड होता तर दुपारीं सूर्याचा प्रकाश होता. अशा परिस्थितींत मी तिच्याविषयीं जें चित्र काढूं शकेन तें असें–मूर्ती उभी आहे. तिच्या डोक्यास पारशी लोक घालतात त्याप्रमाणें उंच, कंगोरेदार (कडा असलेली) टोपी आहे. हिला पाहिजे तर अगदीं साध्या नमुन्याचा मुकुट म्हणा; पण यालाच पुजारी शिवलिंग व कंगोऱ्याला पाठीवर टाकलेल्या शिक्याची दोरी असें म्हणतात, तें मात्र पटण्यासारखें नाहीं. तोंड मुळांत थोडें उभाटें असून उंच टोपीवज़ा मुकुटानें जास्तच लांबोडें दिसतें. गाल तोंडाच्या मानानें जास्त फुगलेले भासतात. कानांमध्यें माशांच्या आकाराचीं कुंडलें आहेत; पण तीं इतकी मोठीं आहेत कीं, तीं खांद्यावर आडवीं पडलीं असून खांद्यांचाच जणूं दागिना आहे असें वाटतें. गळ्यांत कौस्तुभमण्याचा हार आहे. डाव्या आणि उजव्या स्तनप्रदेशांवर अनुक्रमें एक खळगी व एक वर्तुळखंड असून त्यांस श्रीवत्सलांछन व श्रीनिकेतन हीं नांवें देतात. कोपरांच्या थोडे वर दंडावर व मनगटांवर दुहेरी बाजूबंद (अंगद) व मणिबंध आहेत. डाव्या हातांत पोटांत बोटें अडकविलेला शंख घेऊन तो त्यासह कमरेवर ठेवला आहे. उजव्या हातांत कमलनाल असून हात उताणा आणि आंगठा खालीं येईल अशा पद्धतीनें कमरेवर ठेवला आहे.कमलनाल तोकडाच असून त्याच्या शेवटीं असलेली कमळाची कळी मांडीवर लोळत आहे. कमरेस तिहेरी मेखला असून तिचीं टोकें स्पष्ट दिसणारे वृषण व लिंग यांखालीं आलीं आहेत. दोन पायांना जोडणारा असा दगडी भाग पायांमध्यें आहे त्यास काठी हें नांव देतात. कमरेस वस्त्र असल्याच्या खुणा कोठें दिसत नाहींत. पण कित्येकांच्या मताप्रमाणें कमरेस वस्त्र आहे असें मानलें तर या दगडी भागास वस्त्राचा सोगा म्हणण्यास हरकत नाहीं. मात्र सोगा पावलांपर्यंत येऊन भिडला आहे असें म्हणावें लागेल. पावलें एका चौकोनावर असून तीस वीट म्हणतात. विटेखालीं उलटें कमल आहे. मूर्तीच्या पाठीमागें प्रभा-

वळ वगैरे कांहीं नाहीं. मात्र मूर्तीचा उजवा पाय एका शैव गोसाव्याच्या अत्याचारानें तुटल्यामुळें तो सांधून घेऊन त्या मागें भला मोठा टेकू दिला आहे. सारांश ही मूर्ति कृष्णरूपी विष्णूची आहे असें भासविण्याचा अजाणतेपणें प्रयत्न केला जातो. पण कृष्णत्वाच्या खुणा म्हणून शिक्याची दोरी व काठी अशा ज्या वस्तू दाखविल्या जातात त्या खरोखरच तशा आहेत असें वाटत नाहीं. मला या मूर्तीमध्यें ज्याप्रमाणें प्राचीन कालच्या मूर्तींमधून आढळणारें अंगसौष्ठव व वास्तवता किंवा मध्ययुगीन मूर्तींमध्यें आढळणारी शिल्पग्रंथनियमप्रवणता व त्यामुळें येणारी कृत्रिमता हे गुणदोष आढळत नाहींत तद्वत् आधुनिक मूर्तींमध्यें आढळणारा बेडौलपणा, कुरूपता वगैरे दोषही उत्कटत्वानें दिसत नाहींत. निदान हिला मी प्राचीन किंवा मध्ययुगीन केव्हांही म्हणूं शकणार नाहीं; पण आधुनिक म्हणजे शेंसवाशें वर्षांतील ती आहे असेंही म्हणवत नाहीं.

३. याहून बरीच जुनी मूर्ति अहोबलम् येथें आहे. ही दर्शनी भागावर कमळ काढलेल्या एका बैठकीवर कमरेवर हात ठेवून उभी असून हिच्या हातांत पुन्हा अनुक्रमें शंख व कमलनाल या वस्तू आहेत. अंगावर निरनिराळे दागिने आणि डोक्यावर उंच टोपीवजा व नक्षीदार मुकूट आहे.[१] पण सर्वांत सुरेख मूर्ति तिरुपति येथील आहे. ही सिंहासनावर ठेवलेल्या कमळामध्यें उभी असून कमळामुळें तिचे जवळजवळ गुडघ्यापर्यंतचे पाय दिसेनासे झाले आहेत. हिचेही दोन्ही हात कमरेवर आहेत. पण उजवा हात उताणा असून त्यावर कमल काढलें आहे आणि डाव्या हातांत शंख दिला आहे. हिच्या डोक्यावर मुकूट, गळ्यांत हार व जानवें, कानांत मकरकुंडलें, कमरेस मेखला इत्यादि दागिने असले तरी मूर्ती अर्धनग्न दिसते.[२]

४. मी मुंबईजवळची जोगेश्वरी गुहा पहावयास गेलों असतां तेथें मला एक भग्न मूर्ती आढळली. या मूर्तीचें मस्तक, हात व गुडघ्यापासून खालचा भाग तुटून गेला आहे. तरी गळ्यांतील मोत्यांचा

१ साउथ इंडियन इमेजेस ऑफ गॉड्स ॲण्ड गॉडेसेस, पृ. ६२, प्र. ४०.
२ कित्ता पृ. ६० प्र. ३९.

कंठा, कमरेची मेखला व त्याखालीं गुडघ्यापर्यंत धोतर, डाव्या मांडीवर धोतराच्या सुरकुत्या, उजव्या मांडीवर मेखलेचें एक टोक, डाव्या मांडीवर मेखलेचा लोंबता पदर, दर्शनी भाग पुढें असलेला व पोकळींत बोटें घातलेला शंख, पाठीवर गळ्यांतील कंठाच्या फिती, कमरेस मेखलेच्या गाठी व धोतराचा कासोटा, छातीच्या उजव्या भागावर लांब व कुरळ्या केसांची एक बट इत्यादि गोष्टी स्पष्ट दिसतात. हिचे हात सध्या भग्न झाले असले तरी खांद्याची जाडी व शंख धरण्याची पद्धत यांवरून या मूर्तीस फक्त दोनच हात असावे असें म्हणतां येतें. ही गुहा आठव्या शतकाच्या उत्तरार्धातील आहे. तेव्हां ही मूर्तीही निदान त्याच सुमाराची असण्याचा पुष्कळ संभव आहे. ही मूर्ती विठ्ठलाची असावीसें वाटतें.

५. मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स म्यूझियममध्यें घारापुरीच्या लेण्यांतून आणलेली एक भग्न मूर्ती आहे. ही उभी पण कमरेवरील भाग अजिबात नसलेली आणि खालचा भाग छिन्नभिन्न झालेली आहे. तरीही कमरेस वस्त्र व तिजवर मेखला, डाव्या मांडीवर टेकलेला व पोकळीत डाव्या हाताचीं बोटें असलेला शंख या गोष्टी स्पष्ट आहेत. पण हिचें वैशिष्टच म्हणजे हिच्या उजव्या अंगास उभी स्त्री व डाव्या अंगास उभा, खुजा, लठ्ठ गण आहे. शंख धरण्याच्या पद्धतीवरून ही मूर्तीही विठोबाची असण्याचा संभव आहे. घारापुरी गुहा आठव्या शतकाच्या दुसऱ्या पावक्यांत खोदल्या गेल्या. या लेण्यांत सांपडलेल्या इतर महिषमर्दिनी, ब्रह्मा वगैरे मूर्ती गुहा खोदण्याच्या सुमाराच्या असाव्या असें दिसतें. ही अर्थात् मूर्तीही तितकीच जुनी असावी.

६. तात्पर्य या मूर्तींवरून असा ग्रह होतो कीं, महाराष्ट्रांतील विठ्ठलभक्ति सामान्यतः मध्ययुगाच्या आरंभाची समजण्यास हरकत नाहीं. मात्र पंढरपूरची विठ्ठलमूर्ती फारच साधी असल्यानें तीस मध्ययुगीन म्हणण्याची सोय नाहीं.

७. माझी समजूत व सामान्य लोकांची–विशेषतः पंढरपूरच्या पुजारी मंडळींची–समजूत याप्रमाणें विठ्ठलमूर्तीचें वर्णन केल्यावर व विठ्ठलाच्या इतरत्र असलेल्या मूर्ती वर्णिल्यानंतर, आतां साधु-

संत व इतर विठोबाच्या स्वरूपाविषयीं कांहीं माहिती देतात कीं काय हें पाहूं. पण साधुसंतांच्या उद्‌गारांचें परीक्षण करतांना एक महत्त्वाची अडचण उत्पन्न होते ती अशी कीं, ते सगुण रूपाचें वर्णन करतां करतां एकदम ब्रह्मानंदांत विलीन होतात व आपण काय बोलतों याचें त्यांना भान रहात नाहीं. यामुळें त्यांची विठ्ठलाच्या सगुण रूपांचीं अनेक वर्णनें आपल्या प्रश्नाच्या दृष्टीनें निरुपयोगी ठरतात. असें असलें तरी आपणांस या प्रश्नास उपयोगी पडणारीं दुसरीं साधनें उपलब्ध नसल्यानें अशा साधनांचाच शक्य तितक्या कसोशीनें उपयोग करून घेतला पाहिजे. मी परीक्षणार्थ घेतलेल्या उद्‌गारांची निवड या दृष्टीनें केली आहे. मूर्तिस्वरूपनिर्णयाच्या कामीं याहून अधिक उपयुक्त असे उल्लेख आढळल्यास त्यांचाही विचार करण्यास मी तयार आहे.

८. शंकराचार्यांच्या नांवावर मोडणारें एक पांडुरंगाष्टक आहे. हें कोणत्या शंकराचार्यांनीं केलें तें ठाऊक नाहीं. पण तें आद्य शंकराचार्यांचें नसावें या बाबतींत मात्र विद्वानांचें एकमत आहे. तें कसेंही असो, त्यांत विठोबाचें वर्णन करीत असतां त्यास त्रिभंगाकृति व गोपवेषं दधानं अशीं दोन विशेषणें लावलीं आहेत. त्रिभंग ठेवण म्हणजे ढुंगण व मस्तक हीं मध्यरेषेच्या डाव्या किंवा उजव्या अंगास एक अंश कललेलीं असणें. जिच्या शरीरांत दोन ठिकाणीं बाक व तीन ठिकाणीं सरळपणा आहे अशा मूर्तीस त्रिभंग म्हणतां येईल. विठोबाची मूर्ति सरळ उभी आहे; तेव्हां हें विशेषण सध्याच्या मूर्तीस लागू पडत नाहीं. दुसरें विशेषण गोपवेषं दधानं 'हें आहे. कांहीं लोक हल्लींच्या मूर्तीस गोपवेषधारी समजतात. पण मला तें पटत नाहीं. याचें कारण मूर्तीचें वर्णन करतांना पाठीमागें दिलें असल्यानें येथें पुनरुक्ति करीत नाहीं.

९. चौंडरसानें केलेलें विठोबाचें वर्णन मागें दिलें आहे. त्यांत विठ्ठलाच्या डाव्या हातांत शंख, खांद्यांवर पदकें इत्यादि तपशील आहे. पण उजव्या हातांत कोणती वस्तू आहे हें मात्र नमूद नाहीं. तसेंच हल्लींच्या मूर्तीच्या खांद्यांवर पदकें नसून कुंडलें म्हणून खोदलेले मासे आहेत. शिवाय चौंडरसानें जीं इतर विशेषणें उपयोजिलीं

आहेत तींही सध्याच्या मूर्तीस लागू पडत नाहींत. तेव्हां त्यानें पाहिलेली व वर्णिलेली मूर्ति निराळी व प्रस्तुतची मूर्ति निराळी असावी असें वाटतें.

१०. ज्ञानदेवांचे म्हणून समजल्या जाणाऱ्या अभंगांत एके ठिकाणीं विठ्ठलाचें ' ठाण त्रिभंगी देहुडे सुंदर आठवूं । विसरूं हा ना हो रया ' व ' दंतपंक्ती झळाळ । जैसी माणिकाची किळ ' असें वर्णन आलें आहे.[१] हल्लीची मूर्ति त्रिभंगी नाहीं, तिचा पाय मुरलीधर श्रीकृष्णाप्रमाणें वाकडा नाहीं आणि तिच्या दातांना माणिकांचें तेज नाहीं. तेव्हां हें वर्णन पंढरपूरच्या विठोबाच्या हल्लींच्या मूर्तीस लागू पडत नाहीं हें उघड ठरतें. अर्थात् येथें वर्णन केलेली मूर्ति दुसरी कोणती तरी असली पाहिजे.

११. आतां नामदेवांनीं देवाचें वर्णन कसें केलें आहे तें पाहूं. 'युगें अठ्ठावीस' ही आरती नामदेवाची म्हणून मानण्यांत येते. या आरतीच्या पहिल्याच कडव्यांत ' वामांगे रखमाई दिसे दिव्य शोभा ' असें म्हटलें आहे. यावरून ही आरती करणाऱ्याच्या मनांत विठोबाच्या डाव्या बाजूस रखुमाई असल्यामुळें दिव्य शोभा दिसते असें म्हणावयाचें आहे हें उघड होतें. पण हल्लींच्या देवळांत विठोबा एकटाच आहे व तो पूर्वींपासून एकटाच उभा आहे अशाविषयीं पुंडलीक व राही–रुक्मिणी यांच्या दंतकथा प्रसिद्ध आहेत. चौंडरसानेंही देवीशिवाय देवाचें वर्णन केलें आहे. रखुमाईचें देऊळ विठोबाच्या देवळाचे बरोबर डाव्या अंगास नाहीं; वायव्येस आहे. तेव्हां येथें रखुमाईच्या देवळांतील मूर्तीला उद्देशून हें विधान केलें असें म्हणणें दूरान्वयी होतें. पंढरपुरास काकडआरतीच्या वेळीं कान्हा हरिदासाची जी आरती म्हणतात तींतही ' वामांगे रखुमाई ' असे शब्द आहेत. तात्पर्य आरतींत वर्णन केलेली देवता निराळी असें मानलें पाहिजे. नामदेवाच्या अभंगांचा म्हणून जो गाथा आहे त्यांत विठोबाविषयीं व पुढील महत्त्वाचे उल्लेख आले आहेत.

---

१ ज्ञानेश्वरांच्या अभंगांची गाथा १०-२; २८-११. दातारशास्त्री प्रत.

येर वाउगि खटपट । ठाका पंढरी वाळुवंट । हरूनि मनुष्यपण दृष्ट । चतुर्भुज करिल ॥ ९ ॥ (१०२८). कानडा विठ्ठल वो । उभा भिवरे-तीरीं । भक्तांचें आर्त वो जीवा लागलें भारी ॥ ध्रु० ॥ (१०३१). अव-ताराची राशी तो हा उभा विटेवरी । शंखचक्रगदापद्मसहित करीं ॥ १ ॥ (१०६३). नाम बरवें रूप बरवें । दर्शन बरवें कानडिया ॥ १ ॥ वेदांसी कानडें श्रुतीसी कानडें । परब्रह्म उघडें पंढरीये ॥ २ ॥ (१०७४). विठ्ठल कानडें बोलूं जाणें । त्याची भाषा पुंडलीक नेणे ॥ १ ॥ (१०८५). फेडूनि पीतांबर उभा दिगंबर । कटीं ठेवूनि कर वाळवंटीं ॥ १ ॥ (११०६).

या उताऱ्यांतील 'चतुर्भुज करिल, कानडा विठ्ठल वो, शंखचक्रगदापद्मसहित करीं, दर्शन बरवें कानडिया, विठ्ठल कानडें बोलूं जाणें, फेडूनि पीतांबर उभा दिगंबर' इत्यादि शब्द अथवा पदसमुच्चय महत्त्वाचे आहेत. यांवरून विठोबास चार आयुधें धारण करण्यासाठीं चार हात होते, पैकीं दोन हात कमरेवर होते, तो कानडा होता व पितांबर फेडून टाकल्यामुळें नागडा होता इत्यादि अनुमानें निघतात. पण यांपैकीं कोणतेंही वर्णन हल्लीच्या मूर्तीशीं जुळत नसल्यानें हीं वर्णनें दुसऱ्याच मूर्तीविषयीं असलीं पाहिजेत असें वाटूं लागतें.

१२. तुकारामबुवांच्या अभंगांत अनेक ठिकाणीं विठोबाचें वर्णन आलें आहे. पैकीं आपल्या प्रश्नाचे दृष्टीनें महत्त्वाचे उतारे पुढें देतों.

नागर गोडें बाळरूप । तें स्वरूप काळींचें ॥ १ ॥ तें हें ध्यान दिगंबर, कटीं कर मिरवती ॥ ३ ॥ सहज कटावरी हात । दहीभात शिदोरी ॥ ६ ॥ मोहरी पावा गांजिवा पाठीं । धरिली काठी ज्या काळें ॥ ७ ॥ (२२६८). असे उघडा हा विटेवरि उभा । धरूनि कटसूत्र हें भक्तिलोभा ॥ ४ ॥ (३३७७). भीमातीरीं एक वसविलें नगर । त्याचें नांव पंढरपुर रे । तेथील मोकासी चार भुजा त्यासी । बाईला सोळा हजार रे ॥ १ ॥ (३७१२). सकुमार साजिरीं कैसीं पाउलें गोजिरीं वो । कंठीं तुळसीमाळा उभा भीव-रेच्या तिरीं वो । दंत हिरया ज्योति शंखचक्र मिरवे करीं वो ॥ ३ ॥ उभारोनी बाहे भक्तां देत अभयकर वो ॥ ४ ॥ (३९४०). रत्नजडित सिंहासन । वरी बसले आपण ॥ १ ॥ कुंचे ढळती दोही बाहीं । जवळी राही-रखुमाई ॥ २ ॥ (३९७६). उभा देखिला भीमातीरीं । कर मिरविले कटा-

वरी । पाऊलें तरी समचि साजिरीं । नाम तरी अनंत अति गोड ॥ १ ॥ शंखचक्रांकित भूषणें । जडित मेखळा चिद्रत्नानें । पीतांबर उटी शोभे गोरेपणें । लोपलें तेणें रवितेज ॥ २ ॥ (४०५२)

या उताऱ्यांवरून पुढील गोष्टी सुचतात. विठोबा नग्न आहे, त्यास चार हात आहेत, दोन हात कमरेवर आहेत, दोन हातांत शंखचक्र आहेत, त्याजपाशीं दहिभाताची शिदोरी, पावा, काठी वगैरे गोपवेष दाखविणाऱ्या वस्तू आहेत, जवळ राही व रखुमाई आहेत. हें वर्णन हल्लींच्या मूर्तीशीं जमत नाहीं हें सांगावयास नकोच. सध्याच्या मूर्तीचे हातांत शंख व कमल हीं आयुधें आहेत व जवळ राही-रखुमाई नाहींत.

१३. गाथापंचकांत निळोबाची म्हणून एक गाथा आहे. तींतही या विषयाचे दृष्टीनें महत्त्वाचे असे कांहीं उद्गार आले आहेत ते येथें उद्धृत करतों.

तो हा उभा कटीं कर । राहीरुक्माईचा वर ॥ २ ॥ (३३२). कटावरी ठेविले हात । आयुधें मंडित शंखचक्र ॥ २ ॥ (३३४). हृदयीं निकेतन श्रीवत्सलांछन । मूर्ती विराजमान शंखचक्र ॥ २ ॥ (३४०). मुख लावण्याची खाणी । राही वामांगी रुक्मिणी ॥ ३ ॥ (३४७) ऐक्यरूपें हरिहर । उभा कटीं कर विटेवरी ॥ १ ॥ (३४८). तो हा सुंदर नागर । विटे उभा कटीं कर ॥ २ ॥ रमा होऊनिया दासी । नित्य सेवीत चरणांसी ॥ ३ ॥ (३५८). निळा म्हणे रुक्मिणी वामीं । त्रैलोक्यस्वामी श्रीविठ्ठल ॥४॥ (४१७).

या उताऱ्यावरून विठोबाची कल्पना करावयाची तर ती अशी होते. विठोबाचे हात कमरेवर आहेत; त्याच्या हातांत शंखचक्र हीं आयुधें आहेत; त्याच्या उजव्या व डाव्या बाजूस राही व रुक्मिणी किंवा फक्त डावीकडे रुक्मिणी आहे; त्याच्या ठिकाणीं हरिहरांचें ऐक्य अवतरलें आहे. हेंही वर्णन हल्लीच्या मूर्तीचे बाबतींत सार्थ ठरत नाहीं. कारण सध्याच्या विठोबाचे हातांत शंखचक्र नाहींत; उजवी–डावीकडे राही–रखुमाई नाहींत व हरिहरांचें ऐक्य दाखविणारी डोक्यावर शंकराचें लिंग असल्याची खूणही नाहीं. तेव्हां वरील उल्लेख हल्लीच्या मूर्तीविषयीं नसावेत हें उघड आहे.

१४. सं. १९४४ सालीं म्हणजे सुमारें ६४ वर्षांपूर्वीं गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत छापलेलें विठ्ठलपंचरत्न नांवाचें एक पुस्तक आहे. त्यांत विठ्ठलसहस्रनाम या नांवाचें एक प्रकरण आहे. त्यामधील ध्यानाचे श्लोकांत पुढील चरण आहेत.

जघनस्थकरद्वंद्वं क्षुल्लकादाममेखलं
सव्यासव्यकरोद्भासि पद्मशंखविभूषितं
दरहासस्मेरमुखं शिक्यस्कंधं दिगंबरं

किंवा

पीतांबरावृतकटी क्षुल्लकादामभूषण:
कटिविन्यस्तहस्ताब्ज: शंखपद्मविभूषित:

या दोन उताऱ्यांत पुष्कळच साम्य आहे. दोन्हीमध्यें विठोबाचे हात कमरेवर आहेत, त्यांत शंख, पद्म हीं आयुधें आहेत आणि खांद्यावर खोळ व दावें ह्या वस्तू आहेत असें सांगितलें आहे. पहिल्यांत खांद्यावर शिंकें असल्याचें नमूद आहे तर दुसऱ्यांत त्याचा उल्लेख नाहीं. पहिल्यांत विठोबा नग्न असल्याचें आहे तर दुसऱ्यांत तो पीतांबरधारी म्हणून सांगितलें आहे. हें पंचरत्न कोणत्या काळीं झालें आहे याचा पत्ता नाहीं. पण माझा कयास तें गेल्या शंभर-सवाशें वर्षांत झालें असावें असा आहे. यांतील वर्णन हल्लीच्या मूर्तीशीं जुळणारें आहे. निदान शंख व कमल हीं आयुधें तर हल्लीच्या मूर्तीचे हातांत आहेतच; पण भाविक लोक विठोबाच्या अंगावर खोळ, दावें, शिंकें इत्यादि वस्तू व जवळ काठी आहे असें समजतात आणि तसें वर्णन येथें केलें आहे. विठ्ठलभूषणकर्त्याच्या मतें विठोबाच्या डोक्यावर शिवलिंग नसून डोक्यास शिंकें अडकविलें आहे आणि तो नग्न असला तरी बाळकृष्णरूपी असल्यामुळें अपूज्य नसून पूज्यच आहे. मला विठोबाच्या डोक्यावर शिवलिंग आहे हें म्हणणें जसें पटत नाहीं तद्वत् त्याच्या डोक्यास शिक्याची दोरी आहे हेंही खरें धरवत नाहीं. विठोबा नागडा आहे कीं नाहीं याविषयीं माझें मत संदिग्ध आहे.

१५. डॉ. भगवानलाल इंद्रजी यांचें या मूर्तीविषयीं मत आहे तें

असें[1] :-हिच्या डाव्या हातांत शंख व उजव्या हातांत चक्र आहे. मूर्तीच्या कमरेस वस्त्र आहे; पण तें इतकें सूक्ष्म आहे कीं, न्याहाळून पाहिल्याशिवाय नजरेस येणार नाहीं. कमरेस कमरबंद असून त्याचें टोक उजव्या मांडीवर रुळत आहे. मूर्तीची सामान्य घडण अनहिलवाडचे चौलुक्य, देवगिरीचे यादव आणि अजमीरचे चौहान यांच्या मध्ययुगीन पद्धतीपेक्षां जुनी आहे. मूर्तीचा पोशाख व दागिने गुप्तानंतर लवकरच्याच काळांतले आहेत म्हणजे बहुधा ख्रिस्ती शकाच्या पांचव्या किंवा सहाव्या शतकानंतरचे नसावेत. हुबेहूब पंढरपूरच्या मूर्तीप्रमाणें असणारी दुसरी मूर्ति कोठें नाहीं. पण भेलशाजवळच्या उदयगिरी गुहांमध्यें एतत्सदृश पण तिसऱ्या शतकांतील दोन मूर्ति असून त्यांचे हात विठोबाप्रमाणेंच कमरेवर आणि त्यांत शंख व चक्र या वस्तू आहेत.

१६. हें वर्णन डॉ. भगवानलाल इंद्रजींनीं कशाच्या आधारानें केलें कोणास ठाऊक! पण त्यांनीं वर्णन केल्याप्रमाणें मूर्तीच्या उजव्या हातांत चक्र नाहीं; ज्यास ते कमरबंदाचें टोक म्हणत आहेत तें वस्तुतः सनाल कमळ आहे. मूर्तीच्या अंगावरचे दागिने इतके साधे आहेत कीं, त्यांची गुप्तकालच्या किंवा नंतरच्या दागिन्यांशीं तुलनाच करतां येत नाहीं. मूर्तीस वस्त्र आहे कीं नाहीं याविषयीं मी निर्णय देऊं शकत नाहीं. उदयगिरी गुहांमध्यें अशा साचाच्या मूर्ति आहेत असें डॉ. इंद्रजी म्हणतात. पण मी आर्किऑलॉजीचे रिपोर्ट्स तपासून पाहिले असतां मला कोठेंही पंढरपूरच्या विठ्ठलासारखी मूर्ती आढळली नाहीं. उदयगिरीच्या विष्णुमूर्ति चतुर्भुज असून त्यांचा फक्त एक डावा हातच काय तो कमरेवर ठेवलेला पण शंखविरहित आढळतो.[2] या एका गोष्टीशिवाय इतर कोणत्याही प्रकारचें साम्य

---

१ सोलापूर गॅझेटियर पृ. ४२४. डॉ. सालेतूर यांनीं वरील वर्णन खरें मानून विठोबाच्या प्रस्तुत मूर्तीचें अस्तित्व इ. स. च्या चौथ्या शतकांत जातें असें म्हटलें आहे; पण वरील डॉ. भगवानलाल इंद्रजींचें मतच चुकीचें असल्याबद्दल मी पुढें दाखवीत आहे. तेव्हां डॉ. सालेतूर यांच्या मताचें निराळें खंडन करण्याची जरुरी नाहीं. २ कनिंगहॅमकृत आसइ खंड १०.

या दोन ठिकाणच्या मूर्तींत नाहीं; येवढेंच नव्हे तर दोन्ही मूर्तींची कमरेवर हात ठेवण्याची पद्धत अगदीं भिन्न आहे. उदयगिरीच्या मूर्तींहूनही जास्त साम्य दाखविणारी मूर्ति महाबलिपुरम् येथील त्रिमूर्तीच्या देवळांत आहेत. त्या मूर्तींपैकीं विष्णूचा मुकुट जवळजवळ साधा, अगदीं थोडें नक्षीकाम केलेला व उंच टोपीवजा असून मूर्तीचा डावा खालचा हात कमरेवर ठेवलेला दिसत आहे. मकरकुंडलेंही असल्याचें भासतें; उलट ही मूर्ति चतुर्भुज असून अनेक बाबतींत भेद असलेली आहे.[1] पण विठ्ठलाच्या मुकुटाशीं उत्तर हिंदुस्थानांतील कुषाणशैलीच्या सूर्यमूर्तीच्या मुकुटांचें (किंवा टोपीचें) साम्य फारच जवळचें आहे, ही गोष्ट भुमरा येथील सूर्यमूर्तीचा व विठ्ठलमूर्तीचा मुकुट यांची तुलना केल्यास चांगली ध्यानांत येईल.[2] तशा प्रकारच्या मूर्ति उत्तरेंत फार सांपडतात हेंही लक्षांत घेण्यासारखें आहे. असें असलें तरी या एका साम्याखेरीज इतर बाबतींत कोणतेंच सादृश्य नसल्यानें पंढरपूरची विठ्ठलमूर्ति आतांच उल्लेखिलेल्या कोणत्याही मूर्तीच्या काळाची असणें शक्य वाटत नाहीं.

---

६ कांहीं प्रवाद

१ विठ्ठलमूर्ती विजयनगरास नेली होती काय ?

१. येथवर जें विवेचन केलें आहे त्यावरून असें दिसून येईल कीं, संतांनीं केलेलीं विठ्ठलमूर्तीचीं वर्णनें अपूर्ण तर आहेतच पण एकमेकांविरुद्ध असून हल्लींच्या मूर्तीशीं जुळत नाहींत. तेव्हां हल्लींची मूर्ती तुकारामादि संतांच्या काळीं नव्हती. डॉ. भगवानलाल इंद्रजींचें वर्णनही ऐकीव माहितीवरून लिहिलेलें दिसतें. शिवाय त्यांनीं स्वमतसमर्थनार्थ जीं उदाहरणें दिलीं आहेत तीं कोठें सांपडत नाहींत. अशा स्थितींत त्यांनीं जें विवेचन केलें आहे तें प्रमाण धरवत नाहीं.

---

१ मेमॉइर्स ऑफ दि आसइ क्र. ३३, प्रप ९. २ आसइॲरि १९२४–२५, प्रप ३६ डी.

अफजलखानानें पंढरपूरच्या देवस्थानास तसवीस दिल्याबद्दलचे कांहीं उल्लेख अस्सल कागदपत्रें व रचित ग्रंथ यांतून आले आहेत. तसेंच औरंगजेबाचा पंढरपूरच्या जवळ कित्येक वर्षें तळ होता. तेव्हां दोघांच्या तडाक्यांतून पंढरपूरची मूर्ती सुरक्षित राहिली असेल असें वाटत नाहीं. म्हणून हल्लींची मूर्ती तुकारामादि संतकालीं नव्हती असें विधान करण्यास हरकत नाहीं. येवढेंच नव्हे तर तुकारामादि संतांनीं पाहिलेली मूर्ती तरी अस्सल होती कीं नाहीं या विषयीं शंका आहे. कारण पंढरपूरची मूर्ती विजयनगरला नेली गेली होती, पण ती भानुदासानें परत आणली असा प्रवाद असून तो अंशतः खरा असावा अशी माझी समजूत आहे. म्हणून त्याचा अधिक विचार करून कांहीं फलनिष्पत्ति होते कीं काय तें पाहूं या.

२. विजयनगर येथें एक विठ्ठलाचें किंवा विठ्ठलस्वामीचें देऊळ आहे. हें आर्किऑलॉजी खात्याच्या देखरेखीखालीं असून त्याविषयीं तज्ज्ञांचा पुढीलप्रमाणें अभिप्राय आहे.

'It was begun by Krishnadevaraya in 1513 and the work was carried on by his queens and successors Achyuta and Sadashiva. However the temple was apparently never finished or consecrated. In all probability the work was stopped by the destruction of the city in 1565.' अर्थात् यांच्या मतें देऊळच पुरें झालें नव्हतें तर त्यांत मूर्ती कशी स्थापिली जाणार? पंढरपूरचा विठोबा तेथें आणला गेला नव्हता याविषयीं तज्ज्ञांनीं एक आख्यायिका दिली आहे ती अशी–

'But the God having come to look at it refused to move, saying that it was far too grand for him and that he preferred his own humbler home.' [१]

या आख्यायिकेचा विचार केला तर असें वाटतें कीं, विठोबाची मूर्ती विजयनगरास गेली असावी; पण तेथून ती पुन्हा परत आणली गेली. महीपतीनें एकनाथांचा पणजा भानुदास याजविषयीं माहिती

१ आसइॲरि १९२२–२३, पृ. ६७.

देतांना यानें अनागोंदीहून विठोबाची मूर्ती आणली असें सांगितलें आहे. पण खुद्द एकनाथांनीं आपल्या भागवत ग्रंथांत आपला पणजा भानुदास याविषयीं माहिती दिली असून तींत भानुदासानें ही गोष्ट केल्याचें कोठेंही सांगितलें नाहीं. भानुदासाचे म्हणून जे अभंग समजले जातात त्यांत या कथेशीं संबद्ध असे सारे तीन अभंग आहेत. पैकीं दोन अभंग–तिसऱ्या अभंगाची मदत घेतली नाहीं तर–याच कथेशीं निगडित आहेत असें म्हणणें कठीण दिसतें. तिसरा अभंग 'रायें कंठमाळ देवासी घातली' या चरणानें आरंभ होणारा आहे. यांतही हा 'राय' कोण याचा उलगडा नाहीं; पण महीपतीनें या गोष्टीचा संबंध विजयनगरच्या रामराजाशीं नेऊन भिडविला आहे व हा प्रसंग वर्णिला आहे. भानुदास श. १३७० मध्यें जन्मला व श. १४३५ किंवा ३६ मध्यें मेला अशी आजची समजूत आहे (पांगारकर व भावे) आणि रामराजा तर श. १४६५ च्या पूर्वी कांहीं महत्त्वाच्या हालचाली करीत असल्याचें दिसत नाहीं. तेव्हां या प्रवादांत भानुदास व विजयनगर रामराजा यांचा एकत्र संबंध आणला आहे तो चुकीचा दिसतो. पण भानुदासाच्या जवळ जवळ समकालीन म्हणजे श. १४३२ ते १४५१ पर्यंत विजयनगरीं होऊन गेलेला अत्यंत पराक्रमी राजा कृष्णराय याचे बाबतींत उपर्युक्त प्रसंग झाला असण्याचा संभव आहे. कारण त्यानें इतर ठिकाणांहून पूजनीय मूर्ती आणून त्यांची विजयनगरांत स्थापना केल्याबद्दल भरपूर पुरावा सांपडतो. तेव्हां या बाबतींत अधिक विचार केला पाहिजे.

३. या प्रकरणीं विजयनगरच्या विजयविठ्ठल किंवा विठ्ठलस्वामीचे देवळांतील व इतर लेखांतून या देवळाविषयीं किंवा विठ्ठलाविषयीं पुढील माहिती मिळते व ती विचार करण्यासारखी आहे यांत शंका नाहीं. या देवालयांतील अगदीं पहिला लेख श. १४३५ (१५१३) चा असून त्यांत श्रीकृष्णदेव व त्याच्या दोन राण्या यांनीं गोपूर उभारून विठ्ठल देवाच्या पूजेसाठीं ९९१ होन किंमतीचें एक सोन्याचें ताट, २५ रुप्याचे दिवे, २०० गाई व ४ गांवें इतकें दान केल्याचें सांगितलें आहे. याच मितीच्या दुसऱ्या एका लेखांत विठ्ठलदेवासाठीं लिंगपुरम् हें गांव व इतर देणग्या दिल्या आहेत. श. १४३८च्या एका

लेखांत कृष्णदेवानें १०० खांबांचा मंडप बांधल्याचें नमूद आहे. प्रमादी संवत्सराच्या (श. १४४१ प्रमाथी?) एका लेखांत याच कृष्णदेवानें रायदुर्ग तालुक्यापैकीं देवसमुद्र आणि इतर चार गांवें देवास दिलीं आहेत. व्यय संवत्सरांतील (१४४८) एका लेखांत कृष्णदेवानें भद्रसेट्टिहळ्ळि, शयनपुरं वगैरे गांवें व तुंगभद्रेवरील नौकांचा कर या गोष्टी देवास अर्पण केल्या आहेत. श. १४५२ च्या लेखांत हिरिय तिम्मप्प व राघवप्प यांनीं कळसाचें काम करून एक सोन्याचें ताट दिल्याचें सांगितलें आहे. श. १४५३ च्या लेखांत अच्युतरायानें कांहीं सोनें देवास वाहिल्याचें नमूद आहे. याच सालच्या दुसऱ्या एका लेखांत वेदमार्गप्रतिष्ठापनाचार्य ताळवाक तिरुमलय्य यानें कांहीं दान केल्याचा उल्लेख आहे. श. १४५५ च्या एका लेखांत मुसलमडुगु वेंकटराजु तिम्मराजु यानें आपल्या स्वतःच्या गावांतून ३०० होन व समुद्रं, अनंतपुरं वगैरे गांवांतील कांहीं जमिनी दान केल्याचें नमूद आहे. याच सालच्या एका लेखांत अच्युतरायानें स्वतः व आपला मुलगा यांच्या नांवानें कांहीं दान केलें आहे. श. १४५७ च्या लेखांत चिक्क तिम्मप्प यानें नित्यपूजे-साठीं २०० होन दान केल्याचें सांगितलें आहे. श. १४५८ च्या लेखांत एका नायुडूनें अच्युतराय व राजपुत्र चिक्कराय यांना पुण्य लागावें म्हणून १०० होन दिल्याची नोंद आहे. श. १४६५च्या लेखांत तिरुमल ताताचार्य यानें विठ्ठलासाठीं नट्टूर हें गांव व जमीन वगैरे दान केलें आहे. श. १४६६ मध्यें कोनेटि तिम्मराज यानें २ गांवें दिल्याचें एका लेखांत लिहिलें आहे. श. १४७६ च्या दोन लेखांत कांहीं सोनें दान केल्याचें व दोलोत्सवासाठीं मंडप बांधल्याचें सांगितलें आहे. श. १४८० मध्यें एक गांव दिल्याचें नमूद आहे. श. १४८३ मधील लेखांत रामसागरं येथील १० कोळग जमीन दिल्याचा उल्लेख आहे. श. १४८५ च्या लेखांत रामेश्वरं येथील १२ कोळग जमीन विठ्ठलदेवास मिळाल्याचें सांगितलें आहे. श. १४८६ च्या लेखांत विठ्ठलदेवास मुक्कुंदी अग्रहार दान केल्याचें नमूद आहे.[1]

---

१ इमप्रे पृ. ३०२ ते ३०६, क्र. ३३७, ३३८, ३४४, ३१६, ३१७, ३२२, ३४२, ३१८, ३४१, ३१९, ३१५, ३२०, ३२६, ३२८, ३२७,

वर दिलेले काल व दानें यांवरून लक्षांत येईल कीं, श. १४३५ पासून १४८६ पर्यंत तेथील विठ्ठलदेवाची पूजाअर्चा खूप जोरांत चालू होती. श. १४३५ चें पहिलें दान आहे आणि तें बरेंच मोठें आहे. यावरून असें वाटतें कीं, या सालींच कदाचित् विठ्ठलदेवाची तेथें स्थापना झाली असावी.

४. कृष्णरायाविषयीं एक महत्त्वाची माहिती उपलब्ध आहे. तीवरून त्यानें कदाचित् विठ्ठलाची मूर्ति पंढरपुराहून उचलून नेली असण्याचा संभव वाटूं लागतो. श. १४३५ सालीं कृष्णरायानें उदयगिरीचा राजा प्रतापरुद्र गजपति याजवर स्वारी केली व त्याचा उदयगिरीपर्यंत पाठलाग करून उदयगिरि गांव व त्याचे कांहीं नातेवाईक यांस हस्तगत केलें. या वेळीं त्यानें उदयगिरि येथून एक बाळकृष्णाची मूर्ति आणून ती विजयनगर येथें सामान्यतः उदयगिरि येथील देवळाच्या धर्तीचें देऊळ बांधून त्यांत स्थापन केली.[1] उदयगिरीप्रमाणेंच

३२५, ३३६, ३४०, ३३९. ३४५, ३४६. यांतील कित्येक लेख आतां साइइ भाग ४ मध्यें प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय आणखी तीन उल्लेख डॉ. सी. नारायणराव यांनीं म्हैसूर ओरिएन्टल कॉन्फरन्सच्या वृत्तान्तामध्यें (पृ.७१५ व पुढें) प्रसिद्ध झालेल्या लेखांत निदर्शनास आणले आहेत. पहिल्यांत विजयनगरच्या अच्युतरायानें श. १४५६ मध्यें (बहुधा विजयनगरच्या) विठ्ठलेश्वराला चंद्राचलां (चंद्रगिरी ?) तील तेंगूरु गांव दान केल्याचें सांगितलें आहे. दुसऱ्यांत अच्युतरायानें श. १४५९ मध्यें तुंगभद्रा तीरावरील विठ्ठलेश्वराच्या सन्निध दान केल्याचें नमूद आहे. तिसऱ्यांत विजयनगरच्या सदाशिवरायानें श. १४८७ च्या माघांत तुंगभद्रा तीरावरील विठ्ठलेश्वराच्या समोर दान केल्याचें सांगितलें आहे. या लेखांत प्रसिद्ध अळिय रामराज मेल्याचें सांगितलें असल्यानें व कालनिर्देशामुळें हा लेख राक्षसतागडीच्या लढाईनंतर सुमारें एक वर्षानें खोदलेला आहे असें ठरतें. राक्षसतागडीच्या लढाईनंतर लागलीच मुसलमानांनीं विजयनगरचा पूर्ण विध्वंस केला अशी मुसलमानी इतिहासावरून समजूत होते. पण वरच्यासारखे आणखीही लेख मिळाल्यामुळें विध्वंसासंबंधींची आपली आजची कल्पना बदलावी लागेल.

१ इमप्रे पृ. ३१२, क्र. ३९२-३ व ४१९; आसइऑरि. १९१६-१७, भाग १, पृ. १४. हिस्टॉरिकल इन्स्क्रिप्शन्स ऑफ सदर्न इंडिया पृ. २३९; साइइ व्हॉ. ४, क्र. २५४–२५५.

पंढरपूरच्या बाबतींत त्यानें केलें नसेल असें म्हणवत नाहीं. श. १४४२–४३ मध्यें कृष्णराय व विजापूरचा सुलतान इस्माईल यांची लढाई होऊन तींत इस्माईल आदिलशाहास माघार घ्यावी लागली. यापूर्वीं कित्येक वर्षें विजयनगरकर व विजापूरकर यांजमध्यें शांतता होती. तेव्हां विजयनगरच्या राजास मूर्ति घेऊन जाणें शक्य होतें. मात्र तो विठोबाची मूर्ति घेऊन गेला असल्यास भानुदासाला ती मूर्ति परत मिळाली कीं नाहीं याविषयीं शंका आहे. कदाचित् कृष्णरायानें त्या मूर्तीसारखी मूर्ति तयार करून दिली असणें शक्य आहे. हेंही ध्यानांत ठेवण्यासारखें आहे कीं, आज बाळकृष्णाची मूर्ति तेथील सफाईंत हस्तगत झाली त्याप्रमाणें ही मूर्तीही नुकतीच सांपडली आहे.[1]

१ विजयनगर येथील विठ्ठलस्वामीच्या देवळांतील विठ्ठलमूर्ति सांपडल्याचें प्रथम कै. डॉ. सी. नारायणराव यांनीं जाहीर केलें (समरी ऑफ पेपर्स, आठवी ओरिएंटल कॉन्फरन्स, म्हैसूर, पृ. ११४). नंतर इ. १९३७च्या पहिल्या मासचतुष्कांत मी संशोधनार्थ कर्नाटकांत हिंडत असतां विजयनगर येथें गेलों होतों. तेथें मला वरील मूर्ति पहावयास मिळाली. तिचें नुसतें वर्णन विजयनगरस्मारकग्रंथाच्या मराठी आवृत्तींत पृ. ३५५ वर आणि सप्रतिम वर्णन जयकर्नाटकच्या १९३७ च्या सप्टेंबरच्या अंकांत दिलें आहे. तदनंतर डॉ. सी. नारायणरावांचा लेख प्रसिद्ध झाला. त्यांत ते असें म्हणतात कीं, ' मी ती मूर्ति प्रथम पाहिली तेव्हां तिचा उजवा हात शाबूत होता आणि कमरेच्या डाव्या भागावर रुक्मिणीची सूक्ष्म मूर्ति होती.' पण ते पुन्हा दोन वर्षांनीं तेथें गेले असतां ती मूर्ति मला पाहण्यास सांपडली त्या रूपांतच त्यांनाही पहावयास मिळाली. त्यांचें वरील वादाबाबत म्हणणें असें (म्हैसूरच्या ओरिएंटल कॉन्फरन्सचें वृत्त पृ. ७१५ व पुढें) : ' हल्ली जी मूर्ति पहावयास मिळते ती विजयनगरी पद्धतीची असल्यामुळें महाराष्ट्रांतून आणली जाणें अशक्य आहे. शिवाय मूर्ति आणली जाण्याचा संभव नसून खास महाराष्ट्राचें वैशिष्टच अशी विठ्ठलभक्तिपरंपरा विजयनगरला सुरू करण्यांत आली.' पण मूर्तीची पद्धति केवळ विजयनगरी आहे असें मला वाटत नाहीं आणि विठ्ठलभक्तिपरंपरा पहिल्यापासून कर्नाटकांत होतीच. ती

५. वादिराजतीर्थ यांनीं श. १४९३ च्या सुमारास रचिलेलें तीर्थप्रबंध नांवाचें एक प्रकरण आहे. त्यामध्यें विठ्ठलस्तुतीपर असे चार श्लोक आले आहेत. पैकीं एक श्लोक असा--

चौर्यान्मातृनिबद्धचारुचरणः पापौघचौर्याद्बुधै-
र्बद्धस्त्वं पथि पुण्डरीकमुनिना जारेति संबोधितः ।
तुंगातीरगतोसि विठ्ठल दिशन्नन्याकृतिर्वांछितं
वेत्तृणां यदि मे न दास्यसि पदं त्वत्संस्थितिः कथ्यते[१] ॥

या श्लोकांत विठोबा तुंगातीरास म्हणजे विजयनगरास गेल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. तात्पर्य, मूर्ति विजयनगरास गेली असें म्हणण्यास पुष्कळ जागा आहे.

६. पंढरपूरची विठ्ठलमूर्ति कृष्णरायानें कां नेली असेल याचें नेमकें कारण सांगतां येत नसलें तरी द्वैती वैष्णव संतांनीं त्याचा आपल्या मतें उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ, सतराव्या शतकाच्या शेवटीं होऊन गेलेल्या 'श्रीद विठ्ठल' नांवाच्या कवीनें पुढील पद्य गायिलें आहे.[२]

नीनिल्लिगे बंद्या विठला एनिदु कौतुकवु ॥
मध्वद्वेषिगळु माडुव पद्धतियनु कंडु ॥
हृद्यवागदे कद्दु कळ्ळनंते एद्दिल्लिगे बंद्या ॥
मिथ्यावादिगळु निरंतर सुत्तिमुत्ति कोंडु ॥
अत्तु करेदु कूगुत्तिरे कंडु ॥
बेसत्तु बंद्या विठला ॥
श्रीदविठ्ठल निन्न सद्गुण वेदशास्त्रगळु ॥
शोधिसि नोडलु भूदेवरिगोलिदु ॥
आदरिसलु बंद्या विठला[३] ॥

तेथें नव्यानें सुरू झाली हें विधान, मी मध्ययुगीन उल्लेख दिले आहेत त्यांचा विचार करतां, सिद्ध होऊं शकत नाहीं. ही मूर्ति कृष्णदेवरायाची आहे असेंही अलीकडे प्रसिद्ध झालें आहे. (आंध्र हिस्टॉरिकल रीसर्च सोसायटीचें जर्नल–विजयनगर स्मारक अंक). १ गणपत कृष्णाजी प्रत, मुंबई, पूर्वप्रबंध, श्लोक १३. २ हा इ. १८०० च्या सुमारास होऊन गेला असें कर्नाटक कविचरितें खंड ३, पृ. १५१ वर सांगितलें आहे. ३ अरुणोदय; विजयनगर-साम्राज्यस्मारकमहोत्सवसंचिके, १९३६, पृ. १२२.

तात्पर्य, मध्वद्वेषी व मिथ्यावादी अर्थात् अद्वैतभक्तिमार्गी लोकांचें (वेदबाह्य) आचरण व गोंधळ पाहून मन खिन्न झाल्यामुळें व वेदशास्त्रादींचा उत्कर्ष पाहून आपली पसंती दाखविण्यासाठीं व ब्राह्मणांचा आदर करण्यासाठीं विठोबा तिकडे गेला अशी निदान द्वैतवादी वैष्णव भक्तांची समजूत झालेली दिसते. भक्तिपंथांत कर्ममार्गाला महत्त्व नव्हतें आणि महाराष्ट्रांत यावनी संस्कृतीचा धुडगूस चालू असल्यानें वेदविद्येचा जवळजवळ लोप झाला होता या दोन्हीविषयीं शंका नाहीं. विजयनगरास विठोबाला नेलें असतां यावनी भय नाहींसें होऊन त्याचें माहात्म्य कायम राहील या हेतूनेंच कदाचित् कृष्णरायानें मूर्ति नेली असेल. तें कांहीं असो. वरील विवेचनावरून विठ्ठलाचें विजयनगरगमन जास्तच संभवनीय ठरतें.

७. विठ्ठलाची मूर्ति पंढरपुराहून विजयनगरला गेली होती यास आणखीही पुरावा देतां येण्यासारखा आहे. प्रसिद्ध वैष्णव विठ्ठलभक्त पुरंदरदास यानें आपल्या प्रभावळींतील लोकांसह आयुष्याच्या शेवटचा काळ विजयनगर येथें घालविला असें म्हणतात.[१] तेव्हां निदान त्या काळीं तरी विठ्ठलमूर्ति विजयनगरास नेलेली असावी. तसें नसतें तर पुरंदरदास तेथें क्षणभरही राहता ना. यापूर्वी कर्नाटकांतील वैष्णव पण द्वैतवादी भक्त पंढरपुरास येत असत. पण मूर्ति विजयनगरला गेल्यामुळें ते इकडे येईनासे झाले. पुढें राक्षसतागडीच्या लढाईनंतर विजयनगरमधील इतर देवळांप्रमाणें विजयविठ्ठलाचाही उच्छेद झाला. तेव्हांपासून कर्नाटकांतील पुंडरीकविठ्ठलभक्तीची परंपरा तुटली ती अद्यापही सांधली गेली आहें असें वाटत नाहीं.

२ ज्ञानेश्वरी व विठ्ठलाचा उल्लेख

८. या वादाचा व प्रस्तुत विषयाचा फार संबंध आहे असें नाहीं;

---

१ स्वर्गीय रा. ब. नरसिंहाचार्य आपल्या कर्नाटक कविचरितेमध्यें (२।२३२) किट्टेलच्या आधारानें (Nagavarma's Prosody : Introduction pp. 62, 63) हा इ.१५३८ मध्यें विजयनगरांत होता व १५६४ मध्यें मेला असें लिहितात. तो मरेपर्यंत विजयनगरांत होता असें मानलें तर राक्षसतागडीच्या लढाईपर्यंत विठ्ठलमूर्ति विजयनगरास होती असें ठरेल.

पण वाद महत्त्वाचा आहे म्हणून त्याविषयीं थोडी चर्चा करावयाची आहे. या वादास दोन विद्वानांनीं आपापल्या परीनें उत्तरें देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांपैकीं एक विद्वान कै. गणेश कृष्ण आगाशे हे होत. त्यांच्या मतें ज्ञानेश्वरींत विठ्ठल या दैवताचा उल्लेख आला आहे. पण तो प्रत्यक्ष नसून लक्षणेनें घ्यावयाचा आहे किंवा निष्पन्न होत आहे. त्यांनीं ज्या आधारानें वरील मत प्रतिपादन केलें आहे तो आधार ज्ञानेश्वरींतील पुढील दोन ओव्यांत मिळतो असें त्यांचें म्हणणें आहे.[1] त्या ओव्या अशा:--

एक अवधानाचा पुरा । विडा पाउड भितरां ।
देउनि रिगति गाभारां । अर्थज्ञानाचां ॥४६॥
ते निजबोधें उराउरी । भेटति आत्मेयां श्रीहरी ।
परि मोक्षप्रासादिं सरी । सर्वांहीं आथि ॥४७॥ अ. १८ राज. प्रत

यांत गाभाऱ्यामध्यें जाऊन श्रीहरीस उराउरी भेटण्याच्या दृष्टांतानें आत्मज्ञानानें मोक्ष कसा मिळतो हें सांगितलें आहे. आपणांस सध्या दृष्टांताशींच कर्तव्य आहे. सामान्यत: मनुष्यें गाभाऱ्यांत जाऊन कोणाही देवाचें दर्शन घेतात तरी त्यास आलिंगन देत नाहींत. पण पंढरपुरास तरी असा प्रघात होता कीं, भक्त दर्शनासाठीं गाभाऱ्यांत गेला म्हणजे तो देवास दोन्ही हातांनीं कवटाळी म्हणजे उराउरी भेटे. कै. आगाशे म्हणतात कीं, ज्या अर्थीं हा प्रघात पंढरपूरच्या विठोबाशिवाय इतर कोणत्याही दैवताच्या बाबतींत व पंढरपुराहून इतरत्र कोठेंही आढळत नाहीं, त्या अर्थीं या दोन ओव्या लिहितांना पंढरपूरचा विठोबाविषयक प्रघातच ज्ञानेश्वरांच्या डोळ्यासमोर असला पाहिजे.

९. या वादास उत्तर देणारे दुसरे सद्गृहस्थ प्रसिद्ध तत्त्वज्ञानी प्रो. रा. द. रानडे हे होत. यांच्या मतेंही ज्ञानेश्वरींत विठोबाचा उल्लेख आला आहे येवढेंच नव्हे तर त्याच्या डोक्यावर शंकराचें लिंग आहे असाही निर्देश आहे. मात्र कै. आगाशे यांच्या म्हणण्याप्रमाणेंच ते असें म्हणतात कीं, हा उल्लेख प्रत्यक्ष नसून अप्रत्यक्ष आहे. तेही आपल्या मताच्या समर्थनार्थ पुढील ओव्यांकडे बोट दाखवितात.

१ कै. ग. कृ. आगाशे : ज्ञानेश्वरीटीका उपसंहार पृ. १९-२२

एया वरि पार्था : माझां भजनीं आस्था
तरि तेयांते मी माथां । मुगुटु करीं ॥१२॥
उत्तमासि मस्तक । खालविजे हें काये कवतिक ।
हा मानु करिति लोक । पायवणियां ॥१३॥
तरि श्रद्धावस्तूसि आदरु । करितां जाणिजे प्रकारु ।
जरि होये श्रीगुरु । सदाशिव ॥१४॥
तरि हें असो आतां । महेशातें वानितां ।
आत्मस्तुति करितां । संचारु असे ॥१५॥
येयालागि हें । म्हणितलें रमानाहें ।
अर्जुना मी वाहें । सिरिं जेयांतें[1] ॥१६॥
जो पुरुषार्थसिद्धि चौथी । घेउनि आपुलां हातीं ।
रिगाला भक्तिपंथीं । जगा देंत ॥१७॥
कैवल्याचा अधिकारी । सोडि वांधि मोक्षाची करी ।
कीं जलाचिया परीं । तलवट घे ॥ १८ ॥
म्हणौनि तो नमस्कारुं । तेयातें मुगुट करूं ।
तेयाचे टांक धरूं । कंठि आम्हि ॥ १९ ॥
तेयाचेया गुणाचीं लेणीं । लेवऊं आपुलां वाणीं ।
तेयाची कीर्ति श्रवणीं । आइकों आम्हीं ॥ २० ॥
तो पाहावा हे डोहले । म्हणूनि अचक्षू मज डोले ।
हातीचेनि करकमलें । पूजीं जेयातें ॥ २१ ॥
दोंवरि दोनि । भुजा आलों घेउनि ।
आलिंगावेया लागौनि । तेयाचें आंग ॥ २२ ॥ अ. १२ राज. प्रत

हा उतारा पुढें करून ते असें म्हणतात कीं, ज्ञानेश्वरींत लिंगधारी विठोबाचा उल्लेख आहे असें समजण्यास हरकत नाहीं.

१०. या दोन्ही मतांच्या विषयीं माझें म्हणणें असें : (१) एखाद्या वस्तूस अतिशय मान द्यावयाचा असल्यास ती वस्तू डोक्यावर धारण करतात किंवा घेतात. या कल्पनेवरूनच मराठींत डोक्यावर घेऊन

१ ज्ञानेश्वर वचनामृत पृ. ९. या पुढील सहा ओव्या श्री. रानडे यांनीं उध्दृत केल्या नसून संदर्भ समजण्यासाठीं मी दिल्या आहेत.

नाचणें, डोक्यावर बसणें, डोक्यावर चढणें वगैरे वाक्प्रचार आले आहेत. तेव्हां एखाद्यानें एखाद्याविषयीं मुकुटावर धारण करतों असें म्हटलें म्हणजे तेवढ्यानें तेथें पंढरपूरचा विठोबा व त्याच्या डोक्यावर असलेलें शिवलिंग लक्षित होतात असें कसें समजावें ? लक्षणेनें विठ्ठलाचा उल्लेख आला आहे असें जर मान्य करावयाचें असेल तर मग ज्ञानेश्वरींत अशा अनेक ओव्या सांपडू शकतील कीं, त्यांचा अर्थ लक्षणेनें पंढरपूर किंवा विठोबा यांच्याकडे लावतां येईल. उदाहरणार्थ अठराव्या अध्यायांत पुढील ओवी आहे--

लोकिं तऱ्हीं आथि ऐसें । जें दूरौनि कलशु दीसे ।
भेटीचि हातवसे । देवतेचिये ॥ ३१ ॥

या ओवींत देवालयाच्या कळसाचें दर्शन घेतलें असतां देवालयांतील देवतेचें दर्शन झालेंच असें मानण्याचा प्रघात त्या वेळीं होता असें निर्देशिलें आहे. पंढरपूरच्या देवळासंबंधीं आजही असा प्रघात चालू आहे कीं, हजारों लोक केवळ कळसाचें दर्शन होतांच परत फिरतात; कलशदर्शनानें विठोबाचें दर्शन झालें असें समजतात. पण येवढ्यावरून ही ओवी पंढरपूर व विठोबा यांना अनुलक्षून आहे असें म्हणतां येईल काय ? मला वाटतें वर सांगितलेले प्रघात फक्त पंढरपूरच्या विठोबाच्या बाबतींत आहेत व इतरत्र केव्हांही व कोठेंही नाहींत असें दाखवितां आलें पाहिजे. उलट मी कित्येक ठिकाणीं शंकराच्या भक्तांनीं शंकराच्या लिंगास कवटाळतांना पाहिलें आहे व कळस पाहिला असतां देवाचें दर्शन झालें असें मानण्याचा इतरत्रही प्रघात आहे. तेव्हां वर दोन विद्वानांनीं दिलेला पुरावा खंबीर आहे असें म्हणवत नाहीं. (२) पण माझें या बाबतींत आणखीही म्हणणें आहे. ज्ञानेश्वरांच्या अगोदर कित्येक वर्षें पंढरपूर व विठोबा यांना कांहीं अंशीं महत्त्व आलें होतें. तेव्हां अशा देवाचा लक्षणेनें उल्लेख करण्याचें कारण काय ? स्पष्ट उल्लेख काय करतां आला नसता ? विशेषतः ज्या ठिकाणीं विठ्ठलाचें नांव येण्याचा संभव फार त्या ठिकाणीं त्याचें नांव मुळींच आलें नाहीं. उदाहरणार्थ ही ओवी पहा—

कृष्ण विष्णु गोविंद । एयां नामाचे निखिल प्रबंध ।
माझि आत्मचर्चा विशद । उदंड गाति ॥२०९॥ अ. १२

विठ्ठलाची भक्ति त्या वेळीं खूप जोरांत सुरू होती व ज्ञानेश्वरही त्याचे अग्रगण्य भक्त होते तर त्यांच्या मुखांतून कृष्ण विष्णु गोविंद याबरोबर विठ्ठलाचें नांव कां न यावें ?

३ विठ्ठलाच्या डोक्यावरील शिवलिंग

११. विठोबाच्या डोक्यावर शिवलिंग आहे असा एक प्रवाद आहे. तेव्हां त्याविषयीं येथें थोडा विचार करणें अप्रस्तुत होणार नाहीं. या बाबतींत बऱ्याच संतकवींची एकवाक्यता आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. उदाहरणार्थ निवृत्तिनाथांच्या नांवावर मोडणारा एक अभंग आहे त्यांतील अंश असा–

पुंडलिकाचें भाग्य वर्णावया अमरीं । नाहीं चराचरीं ऐसा कोणी ।
विष्णुसहित शिव आणिला पंढरी। भीमातीरीं पेखणें जेणें ।४६।ध्रु.

यावरून येवढें सिद्ध होतें कीं, या निवृत्तिनाथांची पंढरपूरच्या विठोबाच्या डोक्यावर शिवलिंग आहे अशी समजूत होती. किंवा

रूप पाहातां तरी डोळसु । सुंदर पाहातां गोपवेषु ।
महिमा पाहातां महेशु । जेणें मस्तकी वंदिला ॥१०१२

असें वर्णन ज्ञानेश्वरांच्या नांवावर मोडणाऱ्या एका अभंगांत आलें आहे. यावरून हे ज्ञानदेव विठ्ठलाच्या डोक्यावर शिवलिंग आहे असें मानीत होतेसें दिसतें. नामदेवाच्या गाथेंत विठ्ठलाच्या डोक्यावर शिवलिंग असल्याचें वर्णन करणारा अभंग मला आढळला नाहीं. तुकारामाचे अभंग मी चाळून पाहिले ; पण त्यांतही विठ्ठलाच्या डोक्यावर शिवलिंग असल्याचें वर्णन भेटलें नाहीं. निळोबाच्या गाथेंत 'ऐक्यरूपे हरिहर। उभा कटी कर विटेवरी' अशा तऱ्हेचा एक अभंग आहे (क्र. ३४८). त्यावरून निळोबाची पंढरपूरच्या विठोबाच्या डोक्यावर लिंग आहे अशी भावना होती हें उघड आहे. रामदासांच्या मनाच्या श्लोकांपैकीं एकांत 'विठोनें शिरीं वाहिला देवराणा । तया अंतरीं ध्यास रे त्यासि नेणा ।।' असें म्हटलें आहे. यावरून रामदासांना पंढरपूरच्या विठोबाच्या डोक्यावर लिंग आहे ही गोष्ट कबूल होती असें दिसतें.

१२. एकंदरींत विठोबाच्या डोक्यावर शिवलिंग आहे ही समजूत

फार पूर्वीपासून चालत आली आहे हें वरील उताऱ्यांवरून स्पष्ट होत असलें तरी कित्येक वैष्णवांना ही गोष्ट मान्य नसून त्यांची बाजू विठ्ठलभूषणकर्ते श्री. गोपाळाचार्य यांनीं पुढें मांडली आहे ती अशी– श्रीपांडुरंगमस्तके शिवलिंगमस्ति इति शैवाः, तत्तुच्छं, शिक्यमौलि-विराजित इति तीर्थहेमाद्रिधृतप्रागुक्तस्कांदनिरोधात् । शिक्यमौलिः शिक्यग्रंथिः । यावरून गोपाळाचार्यांस विठोबाच्या डोक्यावर शिवलिंग आहे असें मानणारा एक पंथ असल्याचें कबूल दिसतें. पण ते वैष्णव असल्यानें त्यांनीं शिवलिंगाचें अस्तित्व कबूल करणाऱ्या सर्वांना शैव म्हणून गणलें आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें विठोबाची मूर्ति गोपवेषधारी कृष्णाची आहे असें ठरलें पाहिजे व गोपाच्या पाठीस शिकें असावेंच लागतें असेंही ठरलें पाहिजे. माझे मतें विठोबाच्या डोक्यावर शिवलिंग नाहीं. ज्याला लोक शिवलिंग म्हणून संबोधतात तो वास्तविक अत्यंत साधा असा मुकुट आहे. तशा प्रकारचे मुकुट इतरत्र असल्याचीं कांहीं उदाहरणें मी मागें दिलीं आहेत. त्यांवरून माझें म्हणणें पटण्यास अडचण पडणार नाहीं.

४ विठ्ठलाची मूर्ती जैन, बौद्ध कीं वैदिक ?

१३. पंढरपूरच्या मूर्तीविषयीं आणखी एक प्रवाद आहे. या प्रवादाचा उल्लेख इंडियन अँटिक्वेरीच्या दहाव्या भागांत आला आहे.[१] हा लेख एका मिशनऱ्यानें उपहासबुद्धीनें लिहिला असून 'हें स्थान पूर्वी बौद्धांचें होतें; आतां हिंदूंचें झालें; सध्या येथें ७५ जैन असून ते विठोबाची मूर्ति आपली देवता आहे असें म्हणतात' इत्यादि अर्थ त्यांत आहे. या लिहिण्यावरून त्याचा झोकही मूर्ति जैनांची आहे असें म्हणण्याचा दिसतो. तसेंच येथील जैनांना विठोबाच्या संस्थानांतून कांहीं मानमरातब चालू असल्याची माहिती लागते. येवढेंच नव्हे तर ती मूर्ति जैन नेमिनाथ तीर्थंकराची आहे असेंही एका जैन ग्रंथांत प्रतिपादन केल्याचें गोडबोल्यांच्या कोशावरून समजतें.[२] या प्रतिपादनास आधार म्हणून पुढील श्लोक दिले आहेत.

नेमिनाथस्य या मूर्तिस्त्रिषु लोकेषु विश्रुता ।

१ पृ. १४९; २ भारतवर्षीय अर्वाचीन कोश पृ. २८८

द्वौ हस्तौ कटिपर्य्याये स्थापयित्वा महात्मनः ॥
मूर्तिस्तिष्ठति सा सम्यक् जैनेंद्रेण च पूजिता ।
अहिंसा परमं धर्म स्थापयामास वै स च ॥
युगैस्तु मनुजाक्षीणिविप्रभूमिश्च वामके ।
मेलने धर्मराजस्य शकस्य च गतावधिः ॥
आषाढे शुक्लपक्षे तु एकादश्यां महातिथौ ।
बुधे च स्थापयामास विरोधिकृतवत्सरे ॥

आतां हे श्लोक कोणी व कोणाविषयीं केले व कोणत्या ग्रंथांत आहेत याचा पत्ता नाहीं. हात कमरेवर ठेवलेल्या व आयुधें धारण करणाऱ्या तीर्थंकरांच्या मूर्ति कोठेंही सांपडणार नाहींत. कांहींच्या मताप्रमाणें मूर्ति नग्न आहे असें मानलें तरी विठोबाच्या मूर्तीस बौद्ध किंवा जैन म्हणण्यासारखा अप्रबुद्धपणा कोणीच करणार नाहीं. कारण अशा तऱ्हेची मूर्ति त्या त्या मूर्तिप्रकरणांत कोठेंही नाहीं; तेव्हां या प्रवादांत अगदींच तथ्य नाहीं.

५ विठ्ठलाचें देऊळ व अस्पृश्य

१४. विठोबाच्या देवळासंबंधीं विचार करतांना तें देऊळ किती जुनें आहे, पूर्वीं तें कसें व कोठें होतें, त्याचा विस्तार अथवा संकोच कसा होत गेला, अस्पृश्यांना महाद्वारांत उभे राहून देवाचें दर्शन होत असे काय इत्यादि अनेक प्रश्न उत्पन्न होतात. या प्रश्नांचीं समर्पक उत्तरें देण्यास आवश्यक अशी जुनी माहिती फारशी उपलब्ध नाहीं. तरीही आहे तीवरून साधारण कल्पना करतां येते. तेव्हां येथें या मुद्याविषयीं थोडा विचार करूं.

१५. प्रो. श्री. म. माटे यांनीं आपल्या 'अस्पृष्टांचा प्रश्न' या पुस्तकांत कांहीं अस्पृश्य संतांच्या वचनाधारें असें दाखविण्याचा यत्न केला आहे कीं, महाद्वारांत उभा राहिलेला अस्पृश्य पांडुरंगास सहज पाही; एवढेंच नव्हे तर त्यास विठोबाच्या स्वरूपाचा बारीक-सारीक तपशीलही दिसे. त्यांनीं दिलेली अस्पृश्य संतवचनें यथार्थ व वस्तुस्थितिनिदर्शक मानलीं तर तत्कालीं महाद्वार व विठोबाची मूर्ति यांमधील अंतर वीस पंचवीस फुटांपेक्षां जास्त नव्हतें असें

ठरेल. मला स्वतःस प्रो. माटे यांचें म्हणणें पटत नाहीं. मी मागें विठोबाच्या मूर्तीविषयीं जीं वचनें दिलीं आहेत त्यांवरून असें स्पष्ट दिसतें कीं, ज्यांना विठोबाच्या पायांवर डोकें ठेवण्यास मुभा त्यांच्या विठोबाविषयक उद्गारांत परस्परविरोध व स्वतःचा स्वतःशीं विरोध आहे. त्यांनीं केलेलीं वर्णनें निर्णायक नाहींत. मग अस्पृश्यांसारख्या दुरून पाहणारांची कथा काय ? तेव्हां अस्पृश्य संतांचीं वचनें वस्तुस्थितिनिदर्शक मानतां येत नाहींत. शिवाय पूर्वीचें देऊळ इतकें लहान होतें हें दाखवितां आलें पाहिजे. मला तर असें वाटतें कीं, पूर्वीचें देऊळ इतर मध्ययुगीन देवळांप्रमाणें गर्भगृह, शुकनासी, भोगमंडप, महामंडप, मुखमंडप इत्यादि विभागांचें असेल व त्यामुळें हल्लींप्रमाणें पूर्वींही महाद्वार व विठोबा यांमध्यें २००–२५० फुटांचें अंतर सहज असेल. सध्या बरोबर महाद्वारासमोर विठोबाची मूर्ति येत नाहीं. शिवाय महाद्वार व विठोबा यांमध्यें इतकें अंतर आहे कीं, मूर्ति जरी अगदीं महाद्वारासमोर असती तरी तिचें अस्पष्ट दर्शनही महाद्वारांतील मनुष्यास झालें नसतें. मग तपशीलवार वर्णन कसचें करतां येणार ? चौंडरसानें जें वर्णन केलें आहे त्यावरून पूर्वीं म्हणजे निदान त्याच्या काळीं, विठोबाच्या देवळाच्या आवारांत गरुड, गणपति, क्षेत्रपाल, रुक्मिणी आणि विठ्ठल यांचीं पृथक् स्थानें होतीं असें दिसतें. अर्थात् देऊळ हल्लींइतकें मोठें असलें पाहिजे आणि तसें असल्यास महादरवाजांतून अस्पृश्यांना, देवाचें बारीक वर्णन करण्याइतकें, स्पष्ट दर्शन होणें अशक्य दिसतें. तात्पर्य, प्रो. माटे यांचें म्हणणें पटण्यासारखें नाहीं.

१६. त्यानंतर अगदीं अलीकडे प्रो. माटे यांनीं मला वाटतें हंस मासिकांत एक लेख लिहून असें प्रतिपादिल्याचें समजतें कीं, सध्याचें महाद्वार व त्याचे आंतील नगारखान्याचा तळमजला म्हणजेच पूर्वीचें देऊळ असावें. अर्थात् पूर्वीचें देऊळ अगदीं लहान केवळ गर्भागारी (One Celled) असल्यामुळें अस्पृश्यांस विठोबाचें सहज स्पष्ट दर्शन होत असावें असा त्यांच्या लिहिण्याचा रोख असावा. मला त्यांचा लेख वाचण्यास मिळाला नाहीं. तथापि मी नुकताच पंढरपुरास गेलों असतां तेथील संशोधनमंडळाच्या सभासदांची व माझी

चर्चा झाली व तीवरून मी वरील निष्कर्ष काढला आहे. मला ही कल्पना मुळींच पटत नाहीं. यांत महाद्वारापुढें आजच्या सारख्या पायऱ्या नव्हत्या किंवा असल्या तरी अस्पृश्य त्या पायऱ्या चढून महाद्वारांत येऊं शकत किंवा महाद्वाराचा भाग हल्ली इतका उंच नव्हता किंवा असला तर कदाचित् समोरचा रस्ताही तितकाच उंच होता, शिवाय मंदिर अगदींच छोटें म्हणजे केवळ गर्भागारी होतें असे अनेक पर्याय कल्पावे लागतील. केवळ कल्पनांस संशोधनांत स्थान नाहीं. पण माझें या मुद्द्यावर आणखीही म्हणणें आहे. पूर्वीचें देऊळ केवळ गर्भागारी होतें असें मानलें तर त्यास चौंडरसानें केलेल्या वास्तव वर्णनाचा विरोध येतो. चौंडरसाच्या वर्णनाचा नीट विचार केला तर देऊळ केवळ गर्भागारी असण्याची शक्यता दिसत नाहीं. त्याचे वेळीं देऊळ चांगलें मोठें असलें पाहिजे. तसेंच होयसळ राजांचा या देवतेशीं असलेला निकटचा संबंध आणि त्यांनीं हळेबीड, बेलूर इत्यादि ठिकाणीं बांधलेलीं अवाढव्य देवळें यांचा विचार करतां पंढरपुरासही पुष्कळ मोठें देऊळ असलें पाहिजे असें वाटतें. विशेषतः हळेबीड, बेलूर येथील होयसळेश्वर किंवा चन्नकेशव या देवळांतील वाहनें नंदी व गरूड यांचीं मंदिरें पाहिलीं म्हणजे महाद्वार व त्याचा आंतील भाग या ठिकाणीं विष्णुरूपी विठ्ठलाचें वाहन गरूड याचें मंदिर असण्याचीच शक्यता अधिक वाटतें. माझें हें अनुमान आहे व श्री. माटे यांचा तर्क आहे असें दोघांच्या विचारसरणींत थोडें अंतर आहे. या मुद्द्याचा अधिक विचार करण्यास साधनें नसल्यामुळें मला पूर्वी महाद्वारांत विठ्ठलाचें स्थान होतें हें म्हणणें मुळींच पटत नाहीं येवढेंच येथें नमूद करतों.

१७. याच बाबत मि. कझिन्स यांनीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, विठोबाचें मूळ देऊळ हल्लींच्या ठिकाणीं नव्हतें. सध्या महाद्वारासमोरील रस्त्याच्या कोपऱ्यावर पोलीसचौकी आहे त्या ठिकाणीं पूर्वी विठ्ठलाचें देऊळ होतें. त्यांच्या या विधानास आधार म्हणजे या चौकीची इमारत देऊळवजा व अतिशय जुनी असून तिच्या एका खांबावर श. ११९२ चा एक लेख आहे. या लेखांत विठ्ठलमंदिरांत यज्ञ केल्याचा उल्लेख असल्याच्या समजुतीवर मि.

कझिन्स यांच्या तर्काची मदार आहे. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, तो लेख इतका घाण झालेला आहे कीं, सुमारें ३५ वर्षांपूर्वी पुराणवस्तु-संशोधनखात्यानें घेतलेल्या ठशावरूनही अर्थबोध होण्याइतपत लागत नाहीं. शिवाय हा लेख पोलीसचौकीच्या मूळच्या वाटोळचा खांबा-वर नसून तिच्या भिंतींत घातलेल्या आडव्या चौकोनी खांबावर आहे. हा खांब पोलीसचौकीचा नसून आणखी कोठला तरी आहे.

---


७ उपसंहार

१. सारांश, विठोबा या देवतेची पंढरपुरास स्थापना केव्हां झाली हें निश्चित समजण्यास पुरेशीं साधनें नसलीं तरी अनुमान करण्यासारखे पुरावे आपल्यापाशीं आहेत. ज्या अर्थीं होयसळ वीर सोमेश्वराच्या लेखांत देवास षोडशोपचार पूजेसाठीं इतर कित्येक दानांबरोबर आसंदी नाडांतील हिरिय गरंज हें गांव दान केलें आहे व आसंदी नाड हा होयसळ राजांचा वतनी मुलूख होता असा कयास करतां येतो त्या अर्थीं विठोबा व होयसळ वंश यांचा विशेष जवळचा संबंध होता असें समजण्यास हरकत नाहीं. या होयसळांपैकीं अत्यंत पराक्रमी असा विष्णुवर्धन किंवा बिट्टिदेव अथवा बिट्टिग (इ. १११७–११३७) हा जैन धर्माचा त्याग करून रामानुजांच्या उपदेशावरून वैष्णव पंथाचा एकनिष्ठ उपासक बनला होता. याचा भाऊ वीर वल्लाळ यानें पराक्रमाच्या जोरावर आपल्या राज्याची हद्द भीमेपर्यंत भिडविली होती.[१] अशा स्थितींत पुंडरीक मुनि किंवा पुंडलीक भक्त याची व विष्णुवर्धनाची गांठ पडून त्याच्या विनंतीवरून त्यानें भीमेच्या कांठीं म्हणजे पंढरपूर येथें देऊळ बांधलें असण्याचा पुष्कळ संभव आहे. पूर्वी देऊळ बांध-णारानें त्यांतील देवाला आपलेंच नांव द्यावें असा प्रघात होता. या प्रघातानुसार विष्णुवर्धनानें या आपल्या उपास्य देवतेला स्वनामोद्भव असें विठ्ठल हें नांव दिलें असण्याचा संभव फार

---

१ आसइ वेस्टर्न सर्कल प्रोग्रेस रिपोर्ट १८९७–९८, पृ. ५.

१ एपि. कर्ना. व्हॉ. १२ प्रस्तावना पृ. ९



४ श्रीविठ्ठल पंढरपूर



५ श्रीविठ्ठल ? विजयनगर



६ श्रीविट्ठल तिरुपति-चित्तूर



७ श्रीविट्ठल? घारापुरी-कुलाबा

वाटतो. पुढें त्याच्या वंशजांनीं या विठ्ठल दैवताला मोठें उत्पन्न करून दिलें. तें पुष्कळ दिवस अबाधित चालावें म्हणून विस्तृत अशा आपल्या राज्यांत कोठें तरी न देतां खास आपल्या वतनी मुलखांत दिलें. सध्या तरी मला या देवतेच्या स्थापनेविषयीं यापेक्षां जास्त समाधानकारक खुलासा करतां येत नाहीं. एवंच पंढरपूरच्या विठ्ठलाचे स्थापनेचा काळ अकराव्या शतकाच्या पाठीमागें नेण्यास पुरावा नसला तरी विष्णूच्या विठ्ठल स्वरूपाची भक्ति मात्र महाराष्ट्र व सामान्यतः दक्षिण हिंदुस्थान यांमध्यें या पूर्वींही चालू होती असें घारापुरी, तिरुपति, अहोबलम् इत्यादि ठिकाणच्या मूर्तींवरून म्हणतां येतें. पंढरपूर गांवाचें मूळ नांव संस्कृतमध्यें पंडरिका व कानडींत पंडरगे असावें. याचा पांडुरंग किंवा त्याचे पर्याय यांशीं संबंध नसावा. पांडुरंग वगैरे नांवें विठोबास कशीं लावलीं गेलीं हें समजत नाहीं. विठ्ठल हें नांव शब्दशास्त्राप्रमाणें कानडीच आहे असें निश्चयानें म्हणवत नसलें तरी संस्थापकाचा विचार करतां तें कानडी मुलखांतून आलें असावें येवढें म्हणतां येईल. रखुमादेवी हा लक्ष्मी–क्ष्मादेवी या नांवाचा अपभ्रंश आहे. विठ्ठलाच्या मूर्तीचें जुनें, प्रामाणिक व पूर्ण असें वर्णन मिळत नसल्यानें मूळ मूर्ति कशी होती हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. हल्लींची मूर्ति मध्ययुगाच्या आरंभींची तर दिसत नाहींच पण मध्ययुगाच्या अखेरची तरी आहे कीं नाहीं याविषयीं शंका आहे. मूर्तीवर अनेक गंडांतरें आलीं होतीं त्यांतून ती सलामत सुटली असेल असें वाटत नाहीं. तसेंच एक मूर्ति विजयनगरला नेली गेली असावी असा संशय येतो. विठ्ठलाच्या डोक्यावर शिवलिंग नाहीं. तिचा बौद्ध किंवा जैन मूर्तींमध्यें समावेश होणार नाहीं. ज्ञानेश्वरींत विठ्ठलाचा अप्रत्यक्षही उल्लेख नाहीं. विठ्ठलाचें हल्लींचें देऊळ फार जुनें नाहीं. मूळ देवळाच्या रचनेविषयीं ठाम कल्पना करण्यास साधनें नाहींत. पण महाद्वारांत उभें राहिलें असतां विठ्ठलाचें सहज दर्शन होण्याइतकें लहान तें देऊळ होतें असें वाटत नाहीं. असें असलें तरी देवतेची स्थापना झाल्यापासून तिचें माहात्म्य सामान्यतः वाढत गेलें.

कांहीं संदर्भग्रंथ व त्यांचे संक्षेप

(एक दोन अपवाद सोडून सर्वत्र खंड व पृष्ठ असे आकडे दिले आहेत.)

आसइॲरि– आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया ॲन्युअल रिपोर्ट
आसवेइ– आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ वेस्टर्न इंडिया.
इंडि. ॲंटि.– इंडियन ॲंटिक्वेरी.
इमप्रे– इन्स्क्रिप्शन्स ऑफ दि मद्रास प्रेसिडेन्सी.
एपि. इंडि.– एपिग्राफिया इंडिका.
एपि. कर्ना.– एपिग्राफिया कर्नाटिका.
गओसी– (बॉंबे) गव्हर्नमेंट ओरिएंटल सीरीज.
गाथा– तुकारामाचा : आर्यभूषण छापखाना, पुणें १९१३. नामदेवाचा : बहुधा गाथापंचकापैकीं. आंकडा अभंगाचा.
बाबापेरो– बाळाजी बाजीराव पेशवे रोजनिशी.
बारपेरो– बाजीराव रघुनाथ पेशवे रोजनिशी.
भाइसंमंत्रै– भारत इतिहास संशोधक मंडळ त्रैमासिक.
माबपेरो– माधवराव बल्लाळ पेशवे रोजनिशी.
वनिप– वतनपत्रें, निवाडपत्रें वगैरे
शिचप्र– शिवचरित्रप्रदीप.
शिचसा– शिवचरित्रसाहित्य; खंड व लेखांक
समापेरो– सवाई माधवराव पेशवे रोजनिशी.
साइइ– साउथ इंडियन इन्स्क्रिप्शन्स.

चित्रें

श्री. ग. ह. खरे यांची साहित्यसेवा

१,२ शिवकालीन पत्रसारसंग्रह खंड १ व २ (अंशत:)–इ.स.१९३०–मू.७ रु.
३ मंडळांतील नाणीं –इ. स. १९३३ -मू. १ रु.
४, ५ शिवचरित्रसाहित्य खंड ३ (अंशत:) व ६ (पूर्णत:)
इ. स. १९३०, ३७-मू. ३ व १॥ रु.
६–९ ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड १ ते ४
–इ. स. १९३४, ३७, ३९, ४९–मू. १ ते ३ प्रत्येकीं १॥ रु.; ४ चें ३ रु.
१०–१२ दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाचीं साधनें खंड १ ते ३
–इ. स. १९३०, ३४, ४९–मू. १॥, २ व ३ रु.
१३, १४ शिवचरित्रवृत्तसंग्रह खंड २ व ३ (फार्सी साधनांचे अनुवाद)
–इ. स. १९३९, ४१–मू. प्रत्येकीं १॥ रु.
१५, १६ हिंगणे दप्तर खंड १ व २ –इ.स. १९४५, ४७–मू. प्रत्येकीं ३ रु.
१७ भोर संस्थान ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयप्रदर्शिका-इ.स. १९३५–मू. ८ आ.

१८ भोर संस्थान एतिहासिक स्थलदर्शन	,,	१९४५–मू. ८ आ.
१९ ऐतिहासिक आख्यायिका	,,	१९४४–मू. ४ आ.
२० पंढरपूरचा विठोबा	,,	१९४७–मू. ४ आ.
२१ लाठी शिक्षक भाग १	,,	१९२८–मू. २ आ.
२२ श्रीक्षेत्र आळंदी	,,	१९३१–मू. ४ आ.
२३ श्रीविठ्ठल आणि पंढरपूर (दुसरी आवृत्ति)	,,	१९५३–मू. १ रु.
२४ मूर्तिविज्ञान	,,	१९३९–मू. ५ रु.
२५ संशोधकाचा मित्र पहिला भाग	,,	१९५१–मू. ४ रु.
२६ Simhagadh (Second Edition)	,,	१९४८–मू. ४ आ.
२७ तुलादानविधि	,,	१९४८–मू. ८ आ.
२८ सिंहगड	,,	१९४८–मू. ८ आ.
२९ शनिवार वाडा (दुसरी आवृत्ति)	,,	१९५१–मू. ८ आ.
३० Explorations at Karad (अंशत:)	,,	१९४९–मू. ५ रु.
३१ पेशवे दप्तर–पत्रें : कालनिर्णय–सुधारणा	,,	१९५०–मू. ८ आ.
३२ Shanivara Palace	,,	१९५०–मू. १० आ.
३३ इतिहासकर्ते मराठे	,,	१९५१–मू. २ रु.
३४ विजयनगर सम्राट कृष्णदेवराय	,,	१९५१–मू. ४ आ.
३५ इतिहासाभ्यासवर्ग–व्याख्यानमाला	,,	१९५२–मू. ८ आ.

२१९ इंग्रजी–मराठी (५९+१६०) लेख

मुद्रक : शं. रा. दाते, यशवंत छापखाना, २००/३ सदाशिव पेठ, पुणें २.